म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय कथा
दा क्र १३८८
IRBK-0101388
IRBK-0101388
IRBK-0101388

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५(८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

AY 1972

4 MAY 2000

ग्रा. क्रं. १३८८

कपाट. ८/२
कप्पा
230

ग्रा. क्र. १३८८

गुलाब गेंद

गुलाब गेंद

Gulab Gend

सागर साहित्य २

# गुलाब गेंद

जयवंतराव ज. सरदेसाई.

लेखक गोमन्तक

IRBK-0101388
IRBK-0101388

बा. द. सातोस्कर, बी. ए.

प्रकाशक मुंबई ४.

लेखक —
जयवंतराव ज. सरदेसाई,
गोमन्तक.

प्रकाशक —
बालकृष्ण द. सातोस्कर, बी. ए.
सागर साहित्य, त्रिभुवन रोड,
मुंबई नं. ४.

— चित्रकार
सर्वोत्तम पु. दणाईत,
मुंबई नं. ४.

— मुद्रक
कृष्णाजी ना. सापळे,
रामकृष्ण प्रिं. प्रेस,
१५–१७ त्रिभुवन रोड,
मुंबई नं. ४.

पित्याच्या पवित्र स्मृतीस

व

मातेच्या प्रेमळ मूर्तीस

समर्पण

## गेंदांतील गुलाब


| | | | | |
|---|---|---|---|---|
| रजनी | ... | ... | ... | १ |
| आठवणींचे अवशेष | ... | | ... | ११ |
| आठवले शहाडे आणि कंपनी | | | ... | १८ |
| पत्करलेला पेशा | | ... | ... | २७ |
| अधःपात | | ... | ... | ३८ |
| " सोल्दाद् " | | ... | ... | ५२ |
| क्षयाची भावना | | ... | ... | ५६ |
| पहिलें पाप | | ... | ... | ६१ |
| असूयेची मजल | | ... | ... | ६९ |
| पाप आणि पुण्य | | ... | ... | ७६ |

# जयवंतराव ज. सरदेसाई यांचें वाङ्मय

## प्रकाशित

| | | |
|---|---|---|
| सुखाचे क्षण | ... | कथासंग्रह |
| गुलाब गेंद | ... | ,, |

## अप्रकाशित

| | | |
|---|---|---|
| तुषार | ... | गुजगोष्टी |
| निर्माल्य | ... | कादंबरी |
| नीतीचे निर्बंध | ... | ,, |
| पोर्तुगीज सारस्वत | ... | वाङ्मयचर्चा |

माझा ' सुखाचे क्षण ' हा कथासंग्रह प्रसिद्ध होऊन एक वर्ष पुरें होण्याच्या सुमारासच ' गुलाब गेंद ' प्रसिद्ध होण्याचा सुप्रसंग येत आहे.

' गुलाबगेंदा 'च्या अंतरंगाविषयीं मी जबाबदार असलों तरी सुंदर व कलापूर्ण बाह्यांग व मनोहर छपाई यांचें श्रेय पुस्तकाचे प्रकाशक व माझे मित्र श्री. वा. द. सातोस्कर, बी. ए. यांसच आहे. त्याबद्दल मी त्यांचे आभार मानले तर ते औपचारिक नाहीं का दिसणार ?

माझ्या लेखनाविषयीं मी कांहींच लिहित नाहीं. रसिक वाचक त्याचें मोल ठरवतीलच. मात्र चोखंदळ म्हणविणाऱ्या टीकाकारांस मला एवढेंच सांगावेंसें वाटतें कीं टीका म्हणजे लेखकास उचलून धरणें नव्हे किंवा नामोहरम करणेंही नव्हे. टीका ही लेखकास मार्गदर्शक झाली पाहिजे.

माझ्या ' सुखाचे क्षण ' या कथासंग्रहाचें जें महाराष्ट्रीय रसिकांनीं कौतुक केलें व डेक्कन व्हर्नाक्युलर सोसायटीनें पारितोषिक देऊन गौरव केला त्याबद्दल मी रसिकांचा व सोसायटीचा ऋणी आहें.

मुरगांव–गोवा
२०।१२।३५

जयवंतराव सरदेसाई.

‘ कांट्यावांचुनि गुलाब नाहीं ’ ही म्हण सार्थ करण्याकरितांच पुस्तकाला हें ठिगळ जोडीत आहें. कांटा बोंचल्याची जाणीव झाली नाहीं, तर गुलाबाचा उपभोग घेतल्याचं समाधान तरी रसिकाला कसं व्हावं?

‘ गुलाब गेंदा ’च्या प्रकाशनाकडे, एकाचीं तीन प्रतिबिंबें दाखवणाऱ्या व्यवहाराच्या भिंगांतून न पाहातां फक्त मित्रत्वाच्या नात्यानेंच पाहून श्री. जयवंतराव सरदेसाई यांनीं कथासंग्रहाच्या प्रसिद्धीस आपली संमति दिली. लेखक–प्रकाशकांचे संबंध नोटिस, खटला, कोर्ट, मारामारी, असल्या शब्दांच्या साहचर्यानें कलुषित झालेल्या ह्या सध्याच्या कालांत सरदेसायांनीं कथांची गुणानुक्रमानें निवड करण्याचें कामही प्रकाशकावरच सोंपवावें ही गोष्ट उल्लेखनीय नव्हे का?

माझे चित्रकार मित्र श्री. स. पु. दणाईत यांनीं ‘ गुलाब गेंदा ’ला साजेसें चित्र काढून संग्रहाचें बाह्यांग सजविलें. पुस्तकावरील चित्राला अर्थ नसतो ही समजूत नाहींशी करण्याचे त्यांचे प्रयत्न, आतांपर्यंत प्रसिद्ध झालेलीं त्यांचीं ८–१० पुस्तकांवरील चित्रें पाहिल्यास सहज दिसून येतात. कवि-प्रतिभा रसिकतेला–विविधरंगी, निसर्गप्रेमी, रसिकतेला गुलाबगेंद अर्पण करीत आहे, हा प्रस्तुत चित्रांतील विषय मनोहर नाहीं असें कोण म्हणेल?

मुंबई.
२०।१।३६.

वा. द. सातोस्कर.

# रजनी

मोटर भरवेगांत जात होती. आपलें इच्छित गांठण्यास धडपडणाऱ्या ध्येयवादी माणसाच्या अधीरतेची उपमाच तिला शोभली असती. रस्त्यांतील खांचखळग्याची, उन्हातान्हाची, आणि प्रसंगीं आपल्या देहाची सुद्धां क्षिति न बाळगतां ती धांवत होती. आजूबाजूच्या सुंदर व रुक्ष वस्तू, रम्य देखावे भराभर मागें पडत होते आणि हळूहळू अदृश्य होत होते. कालाच्या अनंत ओघांतून आपण आपल्या आयुष्याचा मार्ग असाच भरवेगांत नाहीं का आक्रमिला ! आणि तो मार्ग आक्रमीत असतांना आपल्या आयुष्यांतील बरेवाईट रम्य रुक्ष प्रसंग असेच नाहीं का मागें पडले ! आणि मग हळुहळू असेच नाहीं का अंतर्धान पावले ? केवढें विलक्षण साम्य हें !

रजनीच्या मनांत पण असेच विचार चालले होते. पुढच्या सीटवर तिचे वडील बसले होते आणि मागच्या सीटवर ती रेलून बसली होती. मनाचा वेग कुणाला मोजतां येईल का ?

हिरव्याचार शेतांतून गेलेला रस्ता आतां संपला होता. साधारण तुरळक झाडीनें व्यापलेल्या प्रदेशांतून तिची मोटार जात होती.

आपल्याहि आयुष्यांत असेंच नाहीं का घडलें ? शैशवावस्थेंतला तो अतुलनीय आनंद, शाळाकॉलेजांतले ते रम्य देखावे आतां मागें पडले होते आणि आतां आपण तुडवीत आहों तो प्रांत किती निराळा !

कॉलेजांतले ते सुखाचे सुदिन तिला आठवले. तें कॉलेज, त्या मैत्रिणी, ते प्रोफेसर, ते मित्र—आणि त्या मित्रमैत्रिणींच्या वलयांत उठून दिसणारी ती दिनकराची बाणेदार व धीरोदात्त मूर्ति, तिला मागणी घालण्याचा त्याचा तो

तिच्या मतें ठरलेला उद्धटपणा आणि त्याला आपण दिलेलें खरमरीत उत्तर, सगळ्या सगळ्या आठवणींचे चित्रफलक तिच्या स्मृतीच्या दिवाणखान्यांत हारीनें मांडून ठेवलेले होते. कितीतरी सुखदायक होत्या त्या आठवणी ! आणि त्या मानानें आजच्यां स्थितींत केवढें अंतर पडलें हें ! अनंत आकाशांत कल्पनेच्या पंखांनीं स्वैर भराऱ्या घेणारें आपलें मन आतां सत्यसृष्टीच्या दगड धोंड्यांनीं व्यापलेल्या आणि कांट्याकुट्यांनीं भरलेल्या जगांत पदोपदीं कसें अडखळतें हें !

तपास बसलेल्या योग्याचें चित्त क्षणभर चलित व्हावें तशी भरधांव जाणारी मोटार थांबली. ब्रेकचा कर्रर्र आवाज झाला. रजनी भानावर आली. तिनें ड्रायव्हरकडे आश्चर्यानें पाहिलें. तिच्या स्फुरणाऱ्या ओंठांवरून ती कांहींतरी बोलावयास जात होती. पण तिच्या वडिलांच्या शब्दांच्या खड्या स्वरांत तिच्या मनींचे बोल विरून गेले.

" काय रे नारू ! काय झालं तुला ? मोटार बंद कशी पडली ? " ते करड्या हुकमी आवाजांत म्हणाले.

" नळींत थोडा केर आलाय साहेब. काढून टाकतों दोन मिनिटांत. " दिलगिरीच्या आवाजांत ड्रायव्हर पुटपुटला.

" काय बुवा या अनपेक्षित अडचणी येतात ! अरे, आम्हांला वेळेवर पोंचायला पाहिजे ना बक्षिससमारंभाला !" ते चरफडले. चार अस्सल इंग्रजी शिव्या हांसडण्यास त्यांनीं कमी केलें नाहीं; पण त्याचा काय उपयोग !

रजनी मनाशींच म्हणाली, " खरंच, आपल्या आयुष्यांत असेच अनपेक्षित योगायोग नाहीं का येत ? गेल्या सहा महिन्यांत आपल्या आयुष्यांत असेच अकल्पित योगायोग कांहीं थोडेथोडके आले नाहींत. बी. ए. ची परीक्षा आटोपून आपण घरीं येऊन कुठं स्थिरस्थावर होतों न होतों तोंच बाबांची अनपेक्षित व अचानक बदली झाली. आणि इथं बेळगांवास येऊन कुठं चार महिने होतात तों दिनकराची व आपली कितीं अकल्पितपणें भेट झाली ! बाबांच्या हातून आपल्या हायस्कूलचा बक्षिससमारंभ साजरा करा म्हणून बाबांना आमंत्रण देण्यास ते आमच्या बंगल्यांत आले. बाबा अ क्लीस गेल्यामुळें आपण पाहुण्यास ' बसा ' म्हणून सांगण्यासाठीं दिवाण

न्यांत गेलों, तों दिनकर ! आपणास पाहतांच त्यांचा चेहरा किती फुलून आला—आश्चर्याबरोबरच हास्याच्या लहरी त्यांच्या चेहऱ्यावर कशा उमटून निघून गेल्या ! खरंच त्या दिवशीं तो किती गोड हंसला अन् वागला ! आणि त्याचें तें गोड हंसणें, तो सुंदर चेहरा व रुबाबदार शरीरयष्टि पाहून आपणास किती आनंद वाटला ! कॉलेजांतले ते पुन्हा न येणारे दिवस व त्या दिवसांच्या नेहमीं येणाऱ्या आठवणी कशा अगदीं ताज्या झाल्या आणि त्या अवस्थेंत आपण किती मोकळेपणानें बोललों !"

मोटार थडथडली, आणि त्या धक्क्यानें तिच्या विचारांची नाजुक माला तुटली. शॉफरनें हँडल आंत टाकलें व एका हातानें मोटारचें दार लावीत त्यानें पेट्रोलवर पाय दाबला. मोटार भर वेगानें पुन्हा निघाली. जणूं मिळालेल्या विश्रांतीनें ती पुन्हा ताजीतवानी झाली होती.

आणि आतां तर रस्ता इतक्या रुक्ष प्रदेशांतून जात होता, कीं रजनीला त्या भकास व उजाड देखाव्याकडे पहावेचना. काळ्या कभिन्न दगडांनीं भरलेला, सांवली देणाऱ्या झाडाचें नांव नसलेला तो प्रदेश ! अगदीं दूरवर सुद्धां पाण्याचें टिपूस दिसत नव्हतें, कीं नजरेस सुखविणारा हिरवा रंग दिसत नव्हता.

आपल्या आयुष्यांत तर असला रखरखीत उन्हाळा आपणास तुडवावा लागणार नाहीं ना ? तिच्या अंगावर शहारे आले. छे ! किती भयंकर कल्पनाचित्र आपण उभें केलें हें ! ती पुन्हा बाहेर पाहूं लागली. त्या खडकाळ जमिनीवर पावसाळ्यांत वाढलेलें खुरटें गवत आग लागून जळून गेलें होतें, आणि त्यांत विखुरलेलीं कांटेरी झुडपें त्या आगीच्या धगीनें पार करपून गेलीं होतीं; त्यांचा पर्णभार करपून झडून गेला होता. आणि त्या निष्पर्ण फांद्यांचा तो शुष्क सांगाडा म्हणजे एखाद्या महत्वाकांक्षी तरुणाच्या पिकलेल्या आकांक्षांचें प्रतीकसें तिला वाटूं लागलें. अशाच कांहीं झुडपांतून कोंवळे अंकुर बाहेर डोकावत होते. रजनीस वाटलें, निराशेनें करपलेल्या हृदयांतून नव्या आशेचे [illegible]ग असेच डोकावत असतील का ?

[illegible]रण नसतांना तिला दिनकरची आठवण झाली. आपण त्याची मागणी [illegible]गरल्यानंतर आपणास तो किती निराश दिसला ! मग ? त्याच्या हृदयांत

नव्या आशांचे अंकूर पुन्हां उगवले असतील का ? आणि त्यानें पुन्हा लग्न केलें असेल का ? छे ! त्या दिवशीं आपण त्याला तें विचारलेंच नाहीं. हजारदां आपणास विचारावेंसें वाटलें, प्रश्न जिभेवर आला, पण आपणास कांहीं धीर झाला नाहीं. विस्मृतीची खपली धरलेली जखम पुन्हा ताजी होईल म्हणून आपण त्यावेळीं टाळाटाळ केली खरी, पण आज अगदीं ही बातमी हळुवारपणें काढून घ्यावयाचीच. तिनें निश्चय देखील करून टाकला.

मोटर हायस्कूलच्या दरवाज्यांत पोचतांच दिनकरनें आपल्या सहकारी मित्रांसह मामलेदारसाहेबांचें स्वागत केलें. समारंभाचा सगळा कार्यक्रम सुरळीत व सुव्यवस्थित पार पडला. रजनी परत फिरण्याची तयारी करूं लागली. दिनकर मात्र मामलेदारसाहेबांच्या कानाशीं कांहींसें कुजबुजत होता. रजनीनें त्यांच्याकडे हंसत पाहिलें. ते पण रजनीकडे पाहून हंसले.

" रजनी, दिनकरपंत काय म्हणतात तें ऐकलंस कां ? "

" काय तें बाबा ? " रजनीनें संभ्रमानें हंसत विचारलें.

" विशेष नाहीं कांहीं ! साहेबांनीं गरिबाच्या झोंपडींत पायधूळ झाडावी म्हणून विनंति करीत होतों. "

" मग काय म्हणतात बाबा ? "

" साहेब कांहींच बोलत नाहींत. तेव्हां रजनीताई, तुम्हींच आमची ओळख स्मरून आमच्या वतीनं साहेबांस वशिला लावला पाहिजे. " दिनकर हंसत म्हणाला.

" त्यांत काय मोठं आलंय ! वशिला वगैरे जाड जाड शब्द नकोत. चला बाबा दिनकररावांच्या घरीं. वहिनीला तरी अनायासें पहायला सांपडेल." रजनीनें दिनकरकडे रोंखून पाहिलें.

दिनकराचें तें छोटें घरकूल पाहून मामलेदारसाहेब तर अगदीं गारेगार झाले. घर सुंदर आणि स्वच्छ राखायला पैसाच पाहिजे अशांतली गोष्ट नाहीं, हें साहेबांस प्रत्यक्ष अनुभवानें पटलें. शेणानेंच कां होईना, पण सुंदर तऱ्हेनें सारवलेल्या जमिनी पाहून साहेब फार खूष झाले. ते म्हणाले सुद्धां—

" खरंच दिनकरराव, तुमच्या घरच्या या काळ्या कुळकुळीत व तुकतुकीत जमिनी पाहून संगमरवरी जमिनींचीं तोंडंसुद्धां पांढरीं फटफटीत पडतील." आणि आपल्या या कोटीनें ते मजलेदार हंसले.

रजनी तर कुतुहलानें व समाधाननें साऱ्या गोष्टी पहात होती. त्याच्या त्या साध्या फर्निचरचीच कां होईना पण ती आकर्षक मांडणी, त्याच्या स्वभावास साजणारा तो भिंतींचा रंग, भिंतींवर टांगलेल्या कशिदाच्या सुंदर तसबिरा, व्हरांड्यांत हारीनें ठेवलेल्या गुलाबाच्या कुंड्या, लहानशा बागेंत मोगरा व जाईचे सुंदर कुंज, मंगलोरी कौलें उभीं पुरून केलेल्या निरनिराळ्या आकारांचे जमिनीचे विभाग, त्यांच्यांत वाढवलेली गालिच्यासारखी हिरवळ व फुललेले ताटवे, साध्याच तारेचें केलेलें कंपाउंड, एक ना दोन, प्रत्येक कृतींत उभयतां पतिपत्नींची कलाप्रियता व रसिकता दिसत होती. रजनी बागेचें सौंदर्य पाहून त्यांतच रमून गेली. इतक्यांत दिनकरच एका हातांत चहाचें ताट घेऊन दिवाणखान्यांत आला आणि त्याच्यामागून बालदिवाकराचा हात धरून संध्या आंत आली.

" या आमच्या राणीसरकार बरं रजनीताई ! " संध्येकडे प्रेमळ दृष्टिक्षेप करीत दिनकर म्हणाला, " हो, राणीसरकार म्हणण्यास काय हरकत आहे ? आमच्या गृहराज्याची ही राणी आणि मी राजा ! " दिनकरानें संध्येची ओळख करून दिली.

संध्येनें किंचित् मान वेळावली व ती मोहकपणें हंसली.

रजनीला तें दृश्य अतिशय रम्य वाटलें.

सर्वांचा फराळ सावकाश व यथासांग झाला. बालदिवाकराचे बोबडे बोल व गाणीं ऐकून सगळीं मनमुराद हंसलीं. रजनीला तर तो फारच आवडला. तिनें परत जाईपर्यंत त्याचे कितीदां तरी मुके घेतले. मग तिलाच काय वाटलें कुणास ठाऊक, पण ती जरा ओशाळली व विषयांतर करण्यासाठीं म्हणून संध्येस घेऊन बागेंत गेली.

सायंकाळीं जेव्हां रजनी परत फिरली तेव्हां सकाळच्या आपल्या त्याच जागेवर बसली होती. सायंकाळच्या मंद वाऱ्याच्या झुळुका खात मोटार सावकाश जात होती. आणि रजनी दिनकराच्या सुखाच्या संसाराचें सावकाश-

पणें पृथक्करण करीत होती. रजनीचे वडील अधून मधून बोलत होते पण तीसुद्धां दिनकरचीच स्तुति. “ काय पण कर्तबगार पुरुष ! मनुष्य असावा तर या दिनकरासारखा ! घरची गरिबी असतांनासुद्धां आपल्या स्वतःच्या कर्तबगारीवर आपल्या ध्येयानुरुप आंखलेल्या कार्यांत त्यानें यश मिळविलें. आज त्यानें चालविलेल्या हायस्कुलांत चारशें विद्यार्थी शिकताहेत. गांवचें सरकारी हायस्कूल बंद पडण्याची वेळ आली आहे. आणि सरकारी हायस्कूल बंद पडलें तर ती ग्रँट दिनकरपंतांच्या शाळेस मिळवून देण्याची देखील मी तो न सांगतांसुद्धां खटपट करीन. ” रजनीचे वडील म्हणाले.

“ हं ! ” रजनी नुसती हंसली.

तिला अभिमान वाटला. एवढ्या कर्तबगार तरुणानें आपणास एकदां मागणी घातली होती—पण ? आपण त्या वेळचें त्याचें दारिद्र्य लक्षांत घेऊन त्याला झिडकारलें. पदवीच्या जोरावर व श्रीमंतीच्या सामर्थ्यावर एखादा आय्. सी. एस्. अगर बॅरिस्टर नवरा मिळवूं असें आपणास त्या वेळीं वाटलें, पण श्रीमंतींत व अधिकाराच्या कक्षेंत याहूनही अधिक सुख असूं शकेल का ? त्या वेळीं पुरुषांच्या पुरुषार्थाचा सुप्त परमेश्वर केव्हांतरी जागा होईल व दिनकरास उत्कर्षाच्या शिखरावर नेऊन हां हां म्हणतां बसवील ही कल्पनासुद्धां आपणास त्या वेळीं शिवली नाहीं ! पण आतां काय त्याचें ! रजनी सुस्कारली. मोटरच्या गर्रर आवाजांत तिचा सुस्कारा मिळून गेला.

रजनीच्या वडिलांची दिनकराच्या स्तुतीची टकळी मधून मधून सारखी फिरतच होती. रजनीस ती ऐकून आनंद होत होता; परंतु अंतःकरणांत कुठं तरी अगदीं खोल जागीं दुःख होत होतें.

“ पण बाबा, दोन दिवसांच्या ओळखीनें आणि कांहीं तासांच्या सहवासानें दिनकरपंतांनीं तुम्हांस पुरें भारून टाकलें आहे. एवढ्यावरूनच त्यांची इतकी स्तुति करणें योग्य नव्हे, कदाचित्— ”

“ छे छे, रजनी, काय भकलीस तूं हें ! गुणी माणसास पारखण्यांत माझा अंदाज सहसा चुकत नाहीं, हें तूं विसरतेस. आणि सारा गांव त्याच्या वतीनें साक्ष देतो आहे ना ? ”

रजनी उगीच राहिली.

" खरंच रजनी, त्या दिनकरनें मला पुरतें भारून टाकलें आहे. वेडेंच केलें आहे म्हणेनास ? तरुण असावा तर असा तडफदार आणि कर्तबगार ! माझ्यासारख्या गरिबींतून वर आलेल्या मनुष्यास त्याच्याविषयीं अभिमानच वाटेल. रजनी, खरं सांगतों, दिनकरपंत जर अविवाहित असते, आणि तुझी संमति असती तर मीं त्याला माझा जांवई केला असता. " ते गंभीरपणें म्हणाले.

रजनी मनाशींच म्हणाली, " पण आतां काय त्याचें ? "

पंचपक्वान्नाचें समोर आलेलें ताट केवळ दुराग्रहानें तिनें एक वेळ लाथाडलें होतें आणि तींच विखुरलेलीं शितें संध्येनें आपल्या पदरांत गोळा केलीं होतीं. त्यावर आतां तिचा हक्क कसा पोंचणार ?

रजनी घरीं आली. दोन पत्रें दोघांची वाट पहात होतीं. रजनीच्या वडिलांनीं आपलें पत्र घेतलें व रजनी आपलें पत्र घेऊन कपडे उतरावयास आंत गेली.

रजनीनें कपडे उतरण्यापूर्वींच तिचे वडील खोलीच्या दरवाज्यापाशीं आले. " पोरी, आतां मला तूं बक्षिस दिलें पाहिजेस वरं ! कसला फक्कड जांवई शोधून काढला आहे मी ! हें पत्र आलंय त्याचं कीं तूं पसंत आहेस म्हणून !"

" काय म्हणतां बाबा तुम्ही ? मला कुणी पहावयास आला नाहीं, कीं तुम्ही पण मला कोणाला दाखवावयास नेलंलं नाहीं. आणि हें काय काढलेंत मधेंच ! ' रजनी थट्टेनें हंसत म्हणाली.

" अग, गतसालीं ते गाडगीळ आय्. सी. एस्. होऊन आले ना ? त्यांच्याकडे माझ्या एका मित्राकडून मीं प्रश्न टाकला होता. त्याचें हें आज होकारार्थी उत्तर आलें. हुंड्याचा आंकडा आणि माझी इस्टेट त्या मित्रांनीं उच्चारतांच झाला बेटा कबूल. आणि भरीस तुझा फोटो आणि बी. ए. ची पदवी तोंडावर फेंकतांच काय करतो बिचारा ! गेला गारीगार होऊन ! मुलगी देखील पहाण्याचें तें दिखाऊ प्रदर्शन नको म्हणाला. बराच उदारमतवादी दिसतो बेटा ! " ते समाधानानें जातां जातां हंसले.

रजनीला मात्र चमत्कारिक वाटलें. इतकें मोठें, शिकलेला सवरलेला आणि तेंही युरोपांत जाऊन शिकलेला एक आय्. सी. एस्. आपणास न

पहातां सुद्धां पत्करावयास तयार होतो याचा अर्थ काय ? बावांच्या संपत्तीच्या लकाकीनें याचे डोळे दिपले, कीं माझ्या पदवीची झांपड त्याच्या डोळ्यांवर आली !

ती विचारांत पडली. कपडे बदलण्याचें अगर आलेलें पत्र वाचण्याचें सुद्धां भान तिला राहिलें नाहीं. आपल्या भावी संसाराचें कल्पनाचित्र एखाद्या लहान पोरानें वेड्यावांकड्या रेघोट्यांनीं तयार केलेल्या चित्रासारखें तिला वाटलें. सैंपाकीणबाई चहाचा कप घेऊन खोलींत आली, तेव्हां ती भानावर आली.

चहाचा कप स्टुलावर ठेवून तिनें तें मघां आलेलें पत्र उघडून वाचलें.

तिला त्या मैत्रिणीनें आपल्या संसारांतल्या पुष्कळशा गोष्टी लिहिल्या होत्या. पण साऱ्या दुःखदायक. रजनीस अत्यंत वाईट वाटलें. तिनें तें पत्र अर्धेंच वाचलें. तिच्या मनःचक्षूंसमोर एक मोठें प्रश्नचिन्ह उभें राहिलें.

" आणि माझ्या वांट्यास देवानें काय वाढून ठेवलें आहे, देवा तुला माहित ! " ती पुटपुटली व पुढें वाचूं लागली.

पत्रांतल्या एका पॅरिग्राफनें रजनीच्या नाजूक मनास जबरदस्त धक्का बसला. तो पॅरिग्राफ असा होता.

" खरेंच रजनी, तूं आज तरी सुखी आहेस; कारण तूं स्वतंत्र आहेस. विवाहाच्या सोनेरी श्रृंखला तुझ्या पायांत अजून पडलेल्या नाहींत. यावरून मी विवाहसंस्थेविरुद्ध आहें असा भलताच गैरसमज करून घेऊं नकोस ! दोन जीव लग्नानं जर एकजीव झाले तर त्याहून दुसरा स्वर्ग कुठं असणार ? पण विवाहाच्या सांपळ्यांत सांपडतांना, नव्हे जाणूनबुजून प्रवेश करतांना, अकालीं अनुभवानें वृद्ध झालेल्या या प्रेमळ मैत्रिणीचा उपदेश विसरूं नकोस. तुझ्या विवाहाचा जेव्हां प्रश्न येईल तेव्हां पदव्यांची झूल व सोन्याचें घुंगरूं घातलेल्या एखाद्या नंदीबैलावर माझ्याप्रमाणें भाळून जाऊं नकोस. या मोठ्या (?) माणसांच्या संसारांत आम्हां लग्नाच्या बायकांना त्यांनीं फेंकून दिलेल्या सिगारेटच्या जळक्या थोटकाचीहि किंमत नसते. जन्माचा जोडीदार निवडतांना पदवीच्या चकाकीनें अगर संपत्तीच्या धुरानें डोळे

मिटूं नकोस. अशा मिटल्या डोळ्यांनीं जन्माचा जोडीदार निवडलास तर मिटल्या डोळ्यांनींच डोळे मिटेपर्यंत तुला जगावें लागेल, हें पुरें लक्षांत ठेव.

" परवांचा माझ्या संसारांतील संस्मरणीय प्रसंग, तुला—माझ्या जिव्हाळ्याच्या मैत्रिणीला—लिहिल्यावांचून कशी राहूं ? संस्मरणीय प्रसंग म्हणे हृदयावर कोरून रहातात. पण या माझ्या संस्मरणीय प्रसंगानें माझ्या हृदयाच्या चिंधड्या केल्या आहेत, यावरून त्याची संस्मरणीयता (?) किती थोर होती याची कल्पनाच कर ! नेहमींप्रमाणें साडेअकरा वाजतां तिकडून क्लबांतून येणें झालें—मला त्यांत विशेष नवल असें कांहींच वाटलें नाहीं; कारण, तें तर नित्याचेंच होतें ! सदा मरे त्यास कोण रडे !— विषदेखील संवयीनें पचतें म्हणतात, मग हें हालाहल मी मुकाट्यानें पीत होतें यांत काय नवल !

" मोटारचा हॉर्न ऐकतांच मी दरवाजाशीं आलें. मोटारींतून प्रथम तिकडे उतरायचं झालं; त्यानंतर एका युरोपियन तरुणीस तिकडून हात देऊन उतरायचं झालं आणि त्यामागून श्री. गाडगीळ उतरले. तुला कदाचित् हे गाडगीळ माहीत नसतील. हो, असणार कुठून ? पण ते गतसालींच आय. सी. एस्. चें सुवर्णकवच मिळविलेले एक तरुण व अविवाहित गृहस्थ आहेत. इतकी माहिती मला वाटतं तुला पुरे.

" दोघे त्या तरुणीस मध्यें घालून घराच्या पायऱ्या चढत होते. वादळांत सांपडलेल्या पोंफळीप्रमाणं दोघांचे तोल जात होते. माझ्या अंगाचा भडका उडाला, वाटलें दार लावून घेऊन यांना हाकलून द्यावं. पण रजनी, आपल्या अळवाची खाज का आपणास समजत नाहीं ! मीं उगीच राहिलें. मीं जर दार बंद केलं असतं तर दुसऱ्या दिवसापासून माझ्या सत्तेच्या घराचं दार मला बंद झालं असतं. " मान सांगावा जनांत आणि अपमान गिळावा मनांत " असें कायसें म्हणतात ना ? सारी रात्र त्यांनीं घातलेला बीभत्स धुमाकूळ मीं माझ्या डोळ्यांनीं पाहिला आणि जो पहावला नाहीं तो ऐकला.

" मीं सारी रात्र रडून काढली. आम्हां बायकांना देवानं रडण्याशिवाय हृदय हलकं करण्यास दुसरं कसलं साधन ठेवलं आहे ? रागावूं नकोस; तुला लिहून मात्र तेवढं हृदय हलकं झालं आहे, हें कसं नाकबूल करूं ?

" वडिलांच्या प्रेमाच्या सावलींत सुखानं वाढणाऱ्या लतेस माझ्या या दुःखी सुस्काऱ्यांचें वाळवंटी वारे सहन होणार नाहींत. पण संसाराच्या सहारा वाळवंटानं पोळलेल्या या दुर्भागी जिवाचे अनुभव तुला खास मार्गदर्शक होतील. या एकाच सदिच्छेनं मी तुला त्रास देत आहें. "

रजनीच्या डोळ्यांतून ओघळणाऱ्या अश्रूंस प्रणालीची उपमाच शोभली असती. चेहऱ्यावर व्यापून राहिलेलें कारुण्य दगडी हृदयाच्या माणसांस सुद्धां रडवण्यास समर्थ होतें.

" आणि माझ्याकरितां देवा, तूं काय वाढून ठेवलें आहेस ? " तिच्या तोंडून शब्दसुद्धां उमटले नाहींत.

सैंपाकीण चहाचा रिकामा कप नेण्याकरितां म्हणून आली होती.

" ताई, तुम्हीं चहा घेतला नाहीं अजून ! "

रजनीनें हातानेंच ' नको ' म्हणून सांगितलें. तिला बोलवत नव्हतें, तिचा कंठ भरून आला होता.

**रजनी !**

मार्च १९३५

कपी 2360

# आठवणींचे अवशेष

पन्नास पाऊणशें वर्षांमागची गोष्ट ही. आजच्या तरुण गोमंतकांतली नव्हे. आजच्या गोमंतकांत शेंसेस कायद्यानें प्रतिबंध केलेला आहे. स्त्रीपुरुषांस येथें समान हक्क आहेत. तरीपण आजच्या गोमंतकाचे सगळे सद्गुण जुन्या गोमंतकाचे अवशेष आहेत हें विसरून चालायचें नाहीं.

फट्बाब हे एका जुन्या पण वैभवसंपन्न घराण्यांत जन्मलेले होते. त्या काळच्या मानानें त्यांचें शिक्षणही बरेंच झालेलें होतें. संतवाङ्मयाचा त्यांचा अभ्यास दांडगा होता. दररोज ज्ञानेश्वरीचा अध्याय वाचल्याशिवाय या वीस वर्षांत त्यांनीं एकदांही अन्नग्रहण केलेलें नव्हतें. तरीपण चंद्रावर डाग हें असावयाचेच ! गर्भश्रीमंतांच्या अंगांत नेहमींच वास करणारी रंगेलवृत्तीही त्यांच्यांत भरपूर होती.

काल्या–जत्रांस जाऊन 'फोल्ग'* मारण्याची प्रवृत्ति आजच्या तरुणांत नसली तरी त्या काळच्या श्रीमंतांत विशेष होती. त्यामुळें श्रीमंगेशाची पौर्णिमेची जत्रा, म्हाडदोळची षष्टी, कवळेंची पंचमी, वगैरे उत्सव म्हणजे लक्ष्मीपुत्रांची छोटींशीं संमेलनेंच होतीं. श्रीमंतांनीं एखादें 'अंगवस्त्र' ठेवणें त्याकाळीं आजच्यासारखें दूषणास्पद लेखलें न जातां उलट भूषणास्पदच समजण्याची वहिवाट होती. श्रीमंतांनीं जर एकादी कलावंतीण ठेवायची नाहीं तर मग ठेवायची तरी कुणी ? आणि मग त्या वर्गाची उपजीविका तरी व्हावयाची कुणाच्या आधारावर ?

---

* फोल्ग–मजा.

असे त्यांचे प्रामाणिक आचार, विचार व समज होते. पण या जगांत अक्षय काय टिकून राहिलें आहे? सारें जगच जर प्रत्यहीं वदलत आहे तर मग आचार, विचार आणि समज यांची महती ती काय?

दुपारची वामकुक्षी आटोपल्यावर फटुबाव पान खाण्याकरितां नेहमींच्या टेबलाकडे वळले, पण तेथें नेहमींप्रमाणें तयार केलेलें पान नव्हतें. आणि असणार कसें? उद्यां शेवंतीची शेंस होती. तिला यावयाला आज कसं मिळणार?

ते जरा बेचैनच झाले. श्रीमंतीच्या सावलींत वाढलेल्या माणसास मना विरुद्ध घडलेली अगदीं क्षुल्लक गोष्ट सुद्धां बेचैन करायला पुरेशी असते. जणुं काय, एखाद्या खिळ्यावांचून अडून बसणारें प्रचंड यंत्रच!

त्यांनीं स्वतःच पान करून खाल्लें व ते गच्चीवरील आरामखुर्चीवर जाऊन पडले. संध्याकाळच्या मधुर व थंड वायुलहरींनीं त्यांच्या मनावरील विमनस्कतेचा पडदा उडवून दिला.

रस्त्यावरून शेवंतीच्या शेंसेचें आमंत्रण वाजत जात होतें. वाजंत्री चांगल्यांपैकीं होते आणि सनईवाला तर नांवाजलेला होता. फटुबावांच्या आवडीची व आपल्या ठेवणींतली भैरवी तो फारच गोड तऱ्हेनें वाजवीत होता. त्यांच्या या संगीताच्या आवडीमुळेंच केशर कलावंतिणीवर त्यांची मर्जी बसली होती. परंतु तो इतिहास पुढें येणारच आहे.

फटुबावांची वृत्ति खुलली पण। ती क्षणभरच! अस्पष्ट होत जाणाऱ्या सनईच्या सुरांबरोबर फटुबावांची आनंदी वृत्तीही विरत चालली होती. वाजंत्री वाटेनें निघून गेले. परंतु फटुबावांचें समाधानही त्यांनीं हिरावून नेलें. जणूं काय फटुबावांच्या समाधानाचें साधन त्यांच्याच हातांत होतें.

उद्यां शेवंतीची शेंस!

फटुबावांस तें पूर्ण माहित होतें, इतकेंच नव्हे तर त्यांच्याच अनुमतीनें शेंसेचा मुहूर्तदिन ठरविण्यांत आलेला होता. मग?

फटुबावांस विचार करण्याजोगें त्यांत काय होतें?

कुणास ठाऊक! पण वरिक एवढें खरें कीं ते विचारचक्रांत गुरफटत होते.

मनुष्याच्या आयुष्यांत कांहीं क्षण असे येतात कीं, अनपेक्षित घडून आलेल्या क्षुल्लक प्रसंगांनीं त्याच्या मनांत क्रांति घडते.

शेवंतीची आणि शेंस? त्यांना जरा चमत्कारिक वाटलें.

पण शेंस म्हणजे काय?

शेंस म्हणजे शेंस—याशिवाय दुसरा अर्थ तिला नाहीं. उद्यांपासून शेवंतीस वेश्याव्यवसायाची दीक्षा देण्यांत येणार!

आणि परवां—?

परवां माझी लाडकी मुलगी शेवंती—पण शेवंती माझी मुलगी—!

कशी होईल? ती केशरची मुलगी आहे. पण तिचा पिता मीच नाहीं का?

तर मग परवां माझी मुलगी हजार माणसांस तृप्त करण्याकरतां आपल्या देहाचं दुकान उघडील!

—आणि मग बाजारांतील माल कुणीही पैसा टाकून विकत घ्यावा अशी तिची स्थिती होईल. कदाचित् हजारों रोगांनीं विखारलेलें तें ओंगळ शरीर—

"छे! छे!" फटुबाबांना विचारच करवेना. त्यांच्या चक्षूंसमोर शेवंतीचा विद्रूप चेहरा दिसूं लागला.

विचारांचा विसर पाडण्याकरतां ते येरझारा घालूं लागले. पण आठवणींनीं त्यांना किती तरी वर्षें मागें नेलें.

❧

पहिली पत्नी निवर्तल्यावर फटुबाब दुसऱ्या लग्नाच्या भानगडींत पडलेच नाहींत. वय एरव्हीं तरुण होतें. परंतु दोन मुलें पदरीं असल्यामुळें त्यांनीं तो बेत केव्हांच मनांत आणला नाहीं. याच विरहावस्थेंतल्या कुठल्याशा वर्षीं ते शिरोड्याच्या जत्रेस गेले होते. संगीताची त्यांना मुळचीच फार आवड. आणि पुष्कळशा ऐकलेल्या गाण्यांनी ती वाढीस लागलेली.

कामाक्षीच्या पालखीपुढें केशर गात होती, आणि गात असलेली भैरवी तर त्यांच्या भारी आवडीची! केशर कलावंतीण गाणारी चांगली आणि त्या दिवशीं तिचा गळाही उत्तम लागलेला. फटुबाबांस ती चीज फारच आवडली, त्यांनी तिला मुद्दाम ती परत म्हणण्यास सांगून देखील पाठविलें. त्यावेळीं केशर अगदीं ज्वानींतील पोर होती.

—आणि त्या दिवसापासून फटुबाबांस केशरचें रूप, गूण, स्वभाव सर्व कांहीं आवडूं लागलें. आणि आपल्या भाटांत त्यानीं तिला घर बांधून देऊन ' ठेवली. '

केशरही त्यांच्याशीं आजपर्यंत अत्यंत इमानानं वागली. त्यावेळीं कांहीं कलावंतीणींचीं घरें सुद्धां घरंदाज असत. केवळ पैसा त्यांना भुरळ घालूं शकत नसे. यजमानाकरितां सर्वस्वत्याग करण्याची सुद्धां प्रसंगीं त्या जातीची तयारी असे. परंतु त्या काळाबरोबर तो वेळ निघून गेला आणि आतां त्या रमणीय आठवणींचे अवशेष तेवढे राहिले.

या केशर कलावंतीणीच्या आणि फटुबाबांच्या सहवासाचें मूर्त स्वरूप म्हणजेच शेवंती.

शेवंती अगर केशर जेव्हां फटुबाबांच्या घरीं येत, त्यावेळीं अत्यंत अदबीनें आपली पायरी ओळखूनच त्या वागत असत. केशरची वेषभूषा अगर केशभूषा एकाद्या घरंदाज स्त्रीला शोभण्यासारखी होती; त्यामुळें परक्यानें पाहिलें तर त्यास केशर म्हणजे फटुबाबांजी बायकोच वाटायची !

अजून फटुबाबांच्या येरझारा बंद झाल्या नव्हत्या, आणि त्यांची विचारशृंखलाही तुटली नव्हती. शेंसेचें वाजत गेलेलें आमन्त्रंण परत येत होतें. त्या आवाजानें त्यांचे विचार पुन्हां मूळपदावर आले.

" छे ! इतकं जिवाला लावून कोण घेतोय ! " फटुबाब समाधान मानून घेत होते.

शेवंती म्हणजे माझी कांहीं सख्खी मुलगी नव्हे, माझी मुलगी म्हणजे केंकऱ्यांच्या इथं दिलेली शांता. पोर्तुगालास बॅरिस्टर होण्यास गेलेला माझा मुलगा प्रभाकर—

—जरा वेळ त्यांना समाधान वाटल्यासारखें दिसलें.

—पण लगेच त्यांच्या मनांत दुसरा विचार आला.

—शांता आणि शेवंती मला सारख्याच नाहींत का ? दोघीही माझ्याच मुली ! एक माझ्या पत्नीच्या तर दुसरी केशरच्या पोटीं जन्माला आली—

—पण माझी सीता ? ती माझी लग्नाची बायको होती, ती कांहीं केशरसारखी ठेवलेली नव्हे.

—त आपल्या मनाचं हरतऱ्हेनें समाधान करून घेण्याचा प्रयत्न करीत होते, पण सदसद्विवेकबुद्धि त्यांना सारखी टोंचीतच होती.

—केशर माझी लग्नाची बायको नसली म्हणून काय झालं ? माझी पत्नी सीता ज्या इमानानं आणि प्रेमानं माझ्याशीं वागली, तितक्याच निष्ठेनं आणि पावित्र्यानं केशर माझ्याशीं वागली नाहीं कां ? नुसत्या मंत्रांनी लग्नाला जास्त पावित्र्य येत नसतं. सीता माझ्याशीं प्रेमानं वागली यांत कांहीं मोठंसं नव्हे. तें तिचं कर्तव्यच होतें. शिवाय तिचे माझे हितसंबंध एकच ! पण केशरची गोष्ट तशी कुठं होती ? उद्यां हांकलून दिली तर तिला मुकाट्यानं जावं लागणार हें ठाऊक असूनसुद्धां ती माझ्याशीं एकनिष्ठ प्रेमानं वागली यांतच तिच्या मनाचं थोरपण सिद्ध नाहीं का झालं ?

—हा दुसरा विचार त्यांना जास्त पटला.

—मग ?

—आतां कसं करायचं ?

—शेवंती जर माझी मुलगी तर तिची शेंस घालून तिचा अधःपात मी माझ्याच हातानें करूं ? मी माझ्या मुलीस व्यभिचारदीक्षा देऊं ?

—छे ! छे ! !

—मला जसा माझा प्रभा आणि शांता तशीच शेवंतीही.

—मग आतां उपाय ?

त्यांना कांहींच सुचेना. रात्रींचें जेवण कसेंबसें उरकून त्यांनीं अंथरुणावर तर अंग टाकलें. पण अंथरुण म्हणजे कांहीं विचार–विकारांचा विसर पाडणारें स्थान नव्हे. तसें व्हायला झोंपच हवी.

त्या दिवशीं किती तरी रात्रपर्यंत ते अंथरुणांत तळमळत होते. सुंदर शिसवी पलंग, वर गुडघाभर परांची गादी, काश्मिरी शालीचं पांघरुण, आणि मजेदार थंडीचे दिवस , यांतील कांहींच त्यांना समाधान देत नव्हतें. शेवटीं त्यानीं एक विचार निश्चित केला, तेव्हांच त्यांना कुठं स्वस्थ झोंप लागली.

दुसऱ्या दिवशीं उठल्यावरोबर त्यांनीं केशरास निरोप पाठविला.

"शेवंतीची शेंस घालायची नाहीं !"

नऊ वाजेपर्यंत फटुबाबांना कांहीं धीर धरवला नाहीं. पांच मिनिटें आधींच ते आपल्या पिढीजात वकीलाच्या घरीं गेले. थंडीचे दिवस असल्यामुळें तो म्हातारा नुकताच कुठें उठला होता. त्यानें धडपडत कपडे बदलले आणि फटुबाबांस आणून दिवाणखान्यांत बसवून घेतलें. फटुबाबांसारखीं चारच अशिलें म्हणजे त्याची वर्षाची बेगमी होती.

धंदेवाईकाच्या अगत्यानें त्यांनीं फटुबाबांची विचारपूस चालवली.

" हें बघा दोतोर, मला आज आणि आतां माझ्या इष्टेटीच्या वांटण्या करायच्या आहेत. "

" पण सिंजोर फटुबाब, इतकी गडबडशी ? "

" अहो पिकलं पान केव्हां पडेल याचा नेम नाहीं. मनाजोगतं देखल्या डोळां झालं म्हणजे आपलं बरं. " मघांचा उतावळेपणा स्मिताच्या आवरणाखालीं दडवीत फटुबाब म्हणाले.

" तुमच्या वांटण्या त्या काय करायच्या ? प्रभाकरबाबांना देणार ना सारी इस्टेट ? कीं शांताताईंना ठेवणार कांहीं हिस्सा ? इनमीन दोन मुलें त्यांत वांटणी ती काय करायची ? " म्हातारा हंसत हंसत म्हणाला.

फटुबाबांनीं टेबलावरचा कागदाचा ताव हातीं घेतला व त्यावर कांहीं लिहून वकिलाच्या हातीं दिला.

" आँ ! " म्हाताऱ्यानें तोंड वासलें.

" माझ्या इस्टेटीचा अर्धा भाग मी माझी मुलगी शेवंती इला देत असून राहिलेली अर्धी प्रभाकर व शांता यांना समभाग वांटून देत आहे. " म्हाताऱ्यानें कागद वाचला.

" सिंजोर फटुबाब, हें काय करतां तुम्हीं ? " तो वकील म्हणत होता.

" दोतोर ! " फटुबाब म्हणाले " उद्यां माझा प्रभाकर पोर्तुगालहून जुवीज देलेगादचा हुद्दा घेऊन येईल; त्याला माझ्या संपत्तीची पर्वा नाहीं. माझी शांता माझ्यापेक्षांही थोरामोठ्या श्रीमंताच्या घरीं पडलेली आहे, तिला माझ्या इस्टेटीचा अभिलाष नाहीं. आतां राहातां राहिली माझी शेवंती, तिला मात्र आपला पिढीजाद धंदा चालवावा लागेल. पोटाची आग मारण्याकरितां शीलावर निखारे ठेवावे लागतील, आणि त्याच्या अंगारानें माझीच नव्हे तर माझ्या पूर्वजांची पुण्याईसुद्धां जळून खाक होईल.

सगळा विचार मी केला आहे; फक्त आतां रजिस्ट्रारकडे जाऊन तुम्हीं पुढची तजवीज करा आणि सहीच्या वेळीं तेवढें मला बोलवा म्हणजे झालें."

फटुबाबांचा आवाज सद्गदित झाला. तरी पण ते बोलत होते—

"दोतोर! मला खात्री आहे कीं तिच्या रूपगुणांवर आणि माझ्या म्हणजे आतां तिच्या संपत्तीच्या बळावर तिचें लग्न एखाद्या सुविद्य व सुशील तरुणाबरोबर मी लावूं शकेन. तरी बरं देवानंच मला बुद्धि दिली. नाहीं तर उद्यां माझ्या शेवंतीची शेंस होती. उद्यां शेवंती पतित होणार होती."

—आणि, आणि—

फटुबाबांच्या डोळ्यांतून अश्रू ओघळले, आणि त्यांतच त्यांना बोलून दाखवितां न येणारे प्रेमाचे बोल सांठविलेले होते.

**आठवणींचे अवशेष**

सप्टेंबर १९३५

# आठवले शहाडे आणि कंपनी

माझी मुंबईतील ती पहिलीच खेप. मुंबईत जें काय असेल नसेल तेवढें पहायचें हा माझा प्रवासास निघतांना प्रमुख हेतू होता. परंतु त्या आठ दिवसाच्या रजेंत काय काय म्हणून पाहून संपविणार? तरी पण कोटांतली ती गंभीर व शिस्तवार घाई, भुलेश्वर, मोतीबाजारकडील अव्यवस्थित धांवपळ, भायखळा, परळ विभागांतील ती गलिच्छ वस्ती, महालक्ष्मी, जुहू येथील सौंदर्य सगळें कांहीं पाहून घेतलें. मलबारहिल पाहिला, तेथून सूर्योदयाचें सौंदर्य मनमुराद न्याहाळलें. चौपाटी पाहून घेतली. गोव्यांत असतांना चौपाटीविषयीं फार ऐकलें होतें. परंतु ती पाहिल्यानंतर न पाहिली असती तर बरें झालें असतें असें वाटायला लागलें. कारण एकाद्या व्यक्तीं-विषयीं, वस्तूविषयीं अगर स्थळाविषयीं जी एक उच्च व अभिनव कल्पना आपण करतों ती वास्तवांत यथातथ्य उतरली नाहीं म्हणजे माणसाला फार वाईट वाटत असतें. त्यापेक्षां आपण कल्पनेच्या कुंचल्यानें चितारलेल्या चित्रांबरोबर रमण्यांत फार आनंद असतो.

परत गोव्यास निघण्याचा दिवस उद्यांवर येऊन ठेपला. एवढ्या थोरल्या मुंबईस मी आलों, परत जातांना बरोबर कांहीं नेलं नाहीं तर गंगेवर जाऊन स्नान न करतांच परतण्याचा प्रकार होईल. घरीं गेल्याबरोबर ताई जवळ येईल; तिला एकादें सुंदर पातळ नेलं नाहीं तर तिला काय वाटेल? माझा छोटा पुतण्या, तो तर मी घरीं जातांच 'तात्या मुंबईहून मला काय आणलंत' हा प्रश्न सर्वांत प्रथम विचारून मला लाजवील. आणि माझ्या प्रेमळ आईस कांहीं तरी खरेदी करणें भागच होतें. मी गिरगांवांतच उतरलों होतों

माझ्या लेह्याकडे. बाळकृष्ण नांव त्याचं. त्याला आठ दिवस माझ्याबरोबर धांवपळ करावी लागली. मला वाईट वाटे त्याबद्दल, पण उपाय नव्हता. मी तरी काय करणार? माझी मुंबईत कुठें विशेष ओळख नव्हती. नि एकटाच कुठें जाणार नी काय बघणार? मुंबईकर सोबत्याशिवाय मुंबई पाहण्यास निघणें म्हणजे सुकाणू नसलेली होडी समुद्रांत ढकलण्यासारखें हास्यास्पद नाहीं कां?

शेवटीं बाळकृष्णास घेऊन निघालोंच मी. त्याची फारशी इच्छा नव्हती बाहेर पडण्याची. दोन महिन्यांवर आलेल्या बी. ए. परीक्षेच्या अभ्यासांत तो गर्क झाला होता. पण मी बळेंच त्याला ओढलें. करणार काय, माझा मित्र होण्याचें पातक त्यानें केलें होतें.

गिरगांवकरांना कांहीं कापडचोपड खरेदी करायचें असलें कीं त्यांचें एक पेटंट दुकान आहे. आपलं चालले 'आठवले शहाडे कंपनींत.'

आम्ही दुकानांत गेलों तेव्हां गिऱ्हाईकांची ये जा साधारण बरी होती. म्हणण्यासारखी गर्दी नसल्यामुळें त्यांनीं आम्हांस बसण्यास खुर्च्या दिल्या.

माझ्या इच्छेनुरूप दुकानदार निरनिराळीं फॅन्सी पातळें दाखवीत होता व त्यावरोबरच त्या त्या मालाच्या चांगुलपणाचीं स्तुतिस्तोत्रेंही तो आळवीत होता. मलाही त्यांतलीं कांहीं आवडलीं होतीं, पण त्यांतून कुठलीं निवडायचीं तें ठरत नव्हतें.

माझी मनस्थिति त्या हुषार विक्रेत्याच्या नजरेंतून सुटली नाहीं. तो किंचित् हंसला, जणुं हें असें व्हायचेंच असें त्याला सुचवायचें होतें.

"असं होतं हो-" मी प्रस्ताव केला-" आमची निवड होते पुरुषी धाटणीची आणि बायकांची असते निराळीच, त्यानं हा घोंटाळा होतो."

इतक्यांत दुकानाच्या पायऱ्या चटचट चढत दोन तीन तरुण मुली दुकानांत घुसल्या व थेट आमच्या शेजारीं येऊन उभ्या राहिल्या; अर्थात विक्रेत्याचें आमच्याकडील लक्ष कमी झालें.

"आपल्याला काय देऊं?" त्यानें प्रश्न केला.

"गेल्या आठवड्यांत तुमच्याकडे तीं बदामी अन् कोल्हाटी रंगाचीं पातळं आलीं नव्हतीं का? त्यांतलं मीं एक घेतलं होतं; आठवतं कां? तसलीं घ्यावयाचीं आहेत आम्हाला." त्या मुलींपैकीं ती पाणीदार डोळ्याची, पण

पाण्याशिवाय वाढत असलेल्या केळीसारखी कृश दिसणारी एक गोरीपान मुलगी म्हणाली.

दुकानदारानें आमच्यापुढें टाकलेल्या पातळांच्या राशींतून आठ–दहा पातळें त्यांच्यापुढें टाकलीं. शेजारींच मी तीनचार पातळें निवडून ठेवलीं होती.

" मला असलीं पाहिजेत. " मी निवडलेल्या पातळांकडे तिनं बोट केलं.

" तुम्हीं घेतलीं आहेत का हो तीं ? " तिनें मला प्रश्न केला.

" मी अजून तशीं घेतलीं आहेत असं नाहीं, पण निवडून ठेवलीं आहेत." एवढंच मी घुटमळत उत्तर दिलें; मला कल्पना नव्हती कीं ती अनोळखी मुलगी मला ऐकदम असा प्रश्न करील म्हणून.

इतक्यांत त्या नमुन्याचीं पातळें शोधायला गेलेला गडी त्या रंगाचीं पातळें नाहींत अशी बातमी घेऊन आला.

" वा ! बरेच आहांत कीं ? " ती कायसें पुढें पुटपुटली. मला का दुकानदाराला उद्देशून कोणास ठाऊक.

" पण काय हो, हीं चारही पातळें तुम्हाला पाहिजेत का ? " तिनें पुनः मला प्रश्न टाकला. तिच्या नजरेंत तीं फार भरलीं असावींत.

" तें असें आहे "—मी सुरवात केली, " मला माझ्या वहिणीकरितां दोन व आईकरतां एक अशीं तीन पातळें घ्यावयाचीं आहेत. पण नीट निवड करतां येत नाहीं. जरा घोंटाळ्यांत पडलों आहे खरा. "

" अस्सं, मग मी देतें निवडून, चालेल ? "

" काय विचारतां, आंधळा कांहीं दोन डोळे मागत नाहीं. "

ती खुदकन् हंसली. तिच्या गालांवरच्या लाडिक खळ्यांत माझें अवधान क्षणभर लुप्त झालें.

" रागाऊं नका. तुमची बहीण जास्त गोरी आहे का ? " तिनें विचारलें.

" कां ? "

" म्हणजे कोणता रंग तिला जास्त खुलेल हें चटकन् लक्षांत येईल. "

" अं, अं, आहे आपली साधारण—"

" म्हणजे माझ्याइतकी गोरी आहे का ? "

" तुमच्यापेक्षां जरा कमी. "

" म्हणजे आपल्याइतकी का ? "

" हो, पण बायको माणूस असल्यामुळें जास्त उजळ दिसते."

" तर मग तुम्हीं हा मोतिया रंग पसंत करा—" आपल्या नेसत्या पातळाचा पदर उजव्या खांद्यामधून माझ्या पुढें करीत म्हणाली. खरेंच, तें नेसलेलें पातळ तिला फार खुलून दिसत होतें.

" आणि दुसरा—" ती पुढें म्हणाली.

" कुठला ग उषे—" ती आपल्या सोबतिणीस डिंचवून म्हणाली. " मला वाटतं हा बदामी रंग तिला साजून दिसेल नाहीं ?"

" ताईच्या दोन पातळांची निवड तर झाली, आतां एक आईकरतां तेवढं घ्यायचं राहिलं." मीं म्हणालों.

" हो तुमच्या आईकरतां नाहीं ?" ती जरा विचारांत पडल्यासारखी दिसली.

" मग तुम्ही त्यांना एक छानसं लुगडंच घ्या. मी सांगतें. मुलींना जशीं फॅन्सी पातळें आवडत असतांत तशीं पोक्त बायकांना लुगडीं जास्त प्रिय असतात. मी परवां मामींकरतां एक लुगडें खरेदी केलें, आणि त्यांनाही तें भारी आवडलं. तुम्हीही तसलंच घ्या. तुमच्या आईना तें खात्रीनें आवडेल."

शेवटीं तिच्याच आवडीनें लुगडें खरेदी झालें, आणि मीं त्यांचे आभार मानूनही मोकळा झालों.

आमचें खरेदीचें बिल तयार होत होतें. बाळकृष्ण या बाबतींत माहितगार असल्याळें तो किंमतींत जरा घासाघीस करीत होता.

त्या मोकळ्या स्वभावाच्या मुलीबद्दल मला फार कौतुक वाटलें. इतका स्वभाव मुलींच्या जातींत मी फारसा पाहिला नव्हता. परंतु कुठंसं वाचल्याचं आठवलं, पॅरिस शहरांत म्हणे अशाच तरुणी असतात, आणि त्यांचं काम म्हणजे गिऱ्हाईकांच्या गळ्यांत असाच बेमालूम रितीनें माल बांधायचा. मालाच्या किंमतीप्रमाणें त्यांचें ठराविक कमिशन असतें.

पण छे, मुंबईत पॅरिस यावयास शतकांचा अवधि होता. मी समाधान मानून घेतलें. त्या प्रेमळ मुलींविषयीं भलता संशय घ्यावयास मन तयार होत नव्हतें.

त्या मुलीनेंही आपणास हवीं तीं पातळें भराभर निवडलीं. आम्हीं निघण्यापूर्वी ती आपलें बिल चुकतें करून मोकळी झाली.

दुकानांतल्या भव्य आरशांत आमचें दोघांचेंच प्रतिबिंब पडलें होतें. जणूं काय पेस्टलचा भव्य फोटोच. ती खुदकन् हंसली, मलाही पण हंसूं आलें. मी आपण होऊन बाजूला सरलों.

" हें पहा दुकानदार आमचें बंडल इथेंच ठेवा, मी परत येतांना घेऊन जाईन. " त्या निघून गेल्या.

दुकानाच्या पायऱ्या उतरतांना तिच्या मैत्रिणी तिला कांहीं तरी म्हणाल्या व ती आमच्याकडे पाहून पुन्हां एकदां हंसली.

आमच्या खरेदीचें बंडल बांधून ठेवण्यास सांगून आम्हीही बाहेर पडलों. भुलेश्वरास आम्हांस कांहीं घ्यावयाचें होतें, क्रॉफर्ड मार्केटांत कांहीं फळें पण खरेदी करायचीं होतीं.

तिकडून यावयाला आम्हांला साडेआठ वाजले. व्हिक्टोरिया करूनच आलों आम्ही. दुकानाच्या दारांत गाडी थांबवून आम्हीं गडबडीनें उतरलों. कारण गाडी ठरवतांना गाडीवाल्यास आम्हीं कांहींच सांगितलें नव्हतें, आणि गाडी खडी करण्याचा आपला करार नाहीं म्हणून तो कुरकुरत होता.

दुकानांतल्या गड्यानें आमचें सामान गाडींत ठेवलें व गाडी चालूं लागली. आणलेलें सामान कसेंबसें खोलींत टाकून आम्ही बाहेर पडलों. कारण रिगलांत 'रोनल्ड कोल्मन' आला होता त्याची भेट घेणें अवश्य होतें. चार दिवसांकरितां मुंबईस आलेल्या पाहुण्यास मुंबईचा भरपूर उपभोग घेतल्याशिवाय कशी चैन पडणार ?

आणि काय मजेदार योगायोग, संध्याकाळचीच मुलगी तिथें हजर. तिच्याबरोबर आतां मघांच्या मैत्रिणी नव्हत्या. फक्त एक तरुण होता, आणि तो आमच्या बाळकृष्णाचा कॉलेजमित्र. खेळ सुरू होण्यापूर्वीच आमचा परस्पर परिचय समारंभ उरकला.

बाळकृष्णानें माझी ओळख प्रथम करून दिली.

" हे माझे मित्र, गोमन्तकीय कादंबरीकार श्रीकांत आठवले. यांच्या कादंबऱ्या तुम्ही वाचल्या असतीलच. "

खेळाच्या सुरवातीची घंटा खणखणून वाजली.

आणि नंतर तो वसंतकडे वळून म्हणाला, " हे वसंतराव शहाडे. बी. ए. क्लासांत मजबरोबर आहेत. "

" ही माझी चुलत बहीण ललिता शहाडे, आर्ट स्कुलांत असते." वसंतरावांनीं आपल्या चुलत बहिणीची ओळख करून दिली.

मी ललितेकडे पाहून मान हलवून जरा हंसलों.

" तुमची अन् ललितेची ओळख आहे का ?" वसंतरावांनीं मला प्रश्न केला.

" ओळख आहे, पण परिचय नव्हता, तो आतां झाला." ललिता म्हणाली.

" म्हणजे ? "

ललितेनेंच मग दुकानांतील सगळी हकिगत सांगितली.

सिनेमाच्या मखमली पडद्यावर रंग बदलत होते, आणि माझ्या मनांत ललितेच्या मोकळ्या स्वभावाविषयीं, सौंदर्याविषयीं वगैरे विचार घोळत होते. शो संपल्यावर उद्यांच्या जाण्याची जाणीव झाली. सगळ्या सामानाची आवरा आवर करतां दोन वाजून गेले. पातळांचें बुंडल ट्रंकेंत मावेना म्हणून मीं तें फोडलें; पण काय चमत्कार,—आम्हीं घेतलेलीं पातळें त्यांत नव्हतीं, आई-करतां घेतलेलें लुगडेंहि त्यांत नव्हतें.

मी आणि बाळकृष्ण एकमेकांच्या तोंडाकडे पाहात होतों. शेवटीं खो खो हंसून झालेली फजिती आम्हींच व्यक्त केली.

" बाळकृष्ण, मला वाटतं ललितेकडे आमचें बंडल पोचलें असलें पाहिजे, कारण हीं पातळें त्यांनीं घेतलीं होतीं. नाहीं आठवत तुला ? "

" हो खात्रीनें; तसंच झालं असेल. पण त्याला आतां उपाय नाहीं. दुकानदारसुद्धां या वेळीं स्वस्थ निजला असेल आपल्या घरीं. "

शेवटीं आमचें फारसें नुकसान झालें नाहीं असें गृहीत धरून आम्हीं अंथरुणावर पडलों. दुसऱ्या दिवशीं पहांटेला आपणांस उठायचें आहे,या काळजीनेंच प्रथम झोंप यावयाला उशीर लागतो. नुकतीच कुठें डोळ्यांवर झोंप येत होती तों बाळकृष्ण म्हणाला, " श्रीकांत, ललिता उद्यां कोंकणांत जाणार म्हणून म्हणत होती ना ? कदाचित् तुझी आणि तिची बोटीवर भेट होईल."

" आणि तीं पातळें त्या दुसऱ्या मुलींनीं घेतलीं असलीं म्हणजे—? " माझा प्रश्न योग्य होता.

पुनः एकदां मनमुराद हंसून घेऊन आम्हीं झोंपी गेलों.

मला पोंचवायला बाळकृष्ण बोटीवर आला होता. बोट सुटण्यास अजून बराच अवकाश होता. डेकच्या कठड्यावर रेलून आम्हीं बोलत होतों.

ललिता अजून कशी आली नाहीं ? " मी सहज प्रश्न केला.

" ती आज येणार नाहीं. " मला खिजविण्याकरतां गंभीरपणाचा आव आणीत पुढें बाळकृष्ण छद्मीपणें म्हणाला, " श्रीकांत, ललितेची आठवणशी तुला कां झाली ? "

" सहज. ती येणार म्हणून म्हणत होती, आणि आली असती तर आमच्या पातळांचा तलास लागणें सोईस्कर झालें असतें. "

बाळकृष्णास मी अडवलें. पण शब्दांनीं अडवलें म्हणून भावना कांहीं लपून राहात नाहींत.

बोटीची कर्कश शिटी झाली. आपापल्या माणसांस पोंचविण्यास आलेले आप्त व मित्र हळुहळू निघून जाऊं लागले. बाळकृष्णही जातों म्हणत होता.

इतक्यांत वसंत व ललिता घाईघाईनें धक्क्यावर आलीं, आणि म्हणतां म्हणतां बोटीवर चढलीं देखील.

धक्क्यावर उतरण्यास जाणाऱ्या बाळकृष्णास या दृश्यानें धक्काच बसला. मीहि त्याच्याकडे विजयी नजरेनें पाहिलें.

माझा हात हातांत घेऊन बाळकृष्ण पुटपुटला." कॉंग्रॅच्युलेशन्स बेट्या !" कारण वसंत आम्हीं उभे होतों तेथें येत होता. आणि ललिता सामान लावून घेत होती.

" Fortunate enough to have your company. ( बोटीच्या या कंटाळवाण्या प्रवासांत तुमची सोबत मिळाली, बरं झालं. )" वसंतशीं हस्तांदोलन करीत मी म्हटलें.

" पण श्रीकांत, मी येत नाहीं, आमच्या ललितेला जरा जपून न्या. वेंगुर्लें बंदरावर तिला तिचे वडील उतरून घ्यावयाला येतील. "

" म्हणजे ? " मी आश्चर्यानें म्हणालों.

" तें असं झालं, आमचे बाबा येणार होते ललितेला पोंचवायला. परंतु पहांटेस त्यांच्या एका मित्राची पुण्याहून तार आली कीं आपण येत आहोंत

म्हणून. दोन दिवस थांबावयास ही कांहीं कबूल होत नाहीं. हिच्या वडिलांची तार आली आहे कीं, आपण सावंतवाडीहून ललितेस उतरून घ्यायला वेंगुर्ल्यास येतों. यांत आम्हांला तोड निघत नव्हती. पण ललितेनंच तुम्हीं आज जाणार आहांत तेव्हां तुमची सोबत आपणास पुष्कळ होईल असं सुचविलं."

अजून बोट सुटण्यास थोडा अवकाश होता. तरी पण पोंचविण्यास आलेल्या मंडळीची बहुतेक पांगापांग झाली होती. बाळकृष्ण व वसंत मात्र गप्पा छाटीत अजून आमच्याजवळ होते. बोट बरोबर केव्हां सुटते, शिडी काढल्यानंतर उडी कशी मारावी वगैरे शास्त्र, त्यांना बरेंच अवगत होतें.

"तुमचं कांहीं हरवलं आहे का?" माझ्याकडे पहात ललितेनें प्रश्न केला.

"माझं?"

"हो!"

"कांहीं आठवत नाहीं."

"श्रीकांतांचं काय हरवलं आहे तें ते छाती चांचपून पहात आहेत, यावरून नाहीं का कळत?" माझीं बोटं खमिसाच्या मधल्या बटणाशीं चाळा करीत होतीं, त्यावर भाष्य करीत वसंत म्हणाला.

"छे छे, हरवलेलं तें इथेंच सुखरूप आहे बरें!" मी हंसत म्हटलें.

"इथेंच?" ललितेकडे पहात बाळकृष्ण चावटपणानें म्हणाला.

आम्ही सगळीं मनमुराद हंसलों.

नंतर बंडलांच्या अदलाबदलीची मजेदार हकिगत आम्हांस सविस्तर कळली.

"सुटलों बुवा" बाळकृष्ण उद्गारला. "पातळांच्या अदलाबदलीमुळें आमच्या श्रीकांताचें लक्ष ठिकाणावरच नव्हतें सकाळपासून—" त्याला थट्टेची उकळी आली होती.

"बस्स, बस्स, पुरे झाला चावटपणा." त्याला गप्प करण्याकरतां मी दटावलें.

पण तो कुठला गप्प रहायला! तो म्हणाला.—

पण बोटीच्या शिटींत त्याचे शब्द कोणालाच ऐकूं गेले नाहींत.

वोटीनें नांगर उचलला. तसदीबद्दल माफी, ओळख ठेवण्याबद्दल विनंति, वगैरे शब्दांची खैरात करीत वसंतनें धक्क्यावर उडी मारली. बाळकृष्णानेंही त्याचेंच अनुकरण केलें.

डेकवर मी अन् ललिता दोघेंच उभीं होतों. वरच्या मजल्यावर गर्दी मुळीं नव्हतीच. दोन तीन इसम अंथरूण पसरून त्यावर देह पसरीत होते.

धक्क्यावर बाळकृष्ण आणि वसंत उभे होते. दोघांत कायसें संभाषण झालें आणि ते खदखदून हंसूं लागले. प्रश्नचिन्हांकित चेहरे करून आम्हीं एक-मेकांकडे व त्या दोघांकडे आळीपाळीनें पहात होतों.

"काय झालं हंसायला ?" आम्हीं दोघांनीही बरोबरच प्रश्न केला.

"बाळकृष्ण म्हणतो, आठवले शहाडे आणि कंपनी." वसंत म्हणाला. माझें आठवले आडनांव अन् ललितेचं शहाडे या नांवावर त्यांनीं ही कोटी केली होती.

"मी नाहीं हो ललितातार्इ, तुमचा वसंतच म्हणतो असं." बाळकृष्ण कांगावखोरपणानें म्हणाला.

"इकडे आठवले आहेत अन् शहाडेही आहेत पण कंपनी—" मीं म्हटलें.

"मनांत असलं तर तसं व्हावयास उशीर नाहीं." मोठ्यानें हंसत ते म्हणाले.

बोट हळुहळू धक्का सोडून जाऊं लागली, पाण्याच्या खळबळींत व वाऱ्याच्या झोतांत त्यांचें हंसणें ऐकूं येत नव्हतें, चेहेरेही स्पष्ट दिसत नव्हते, ते हवेंत उडवीत असलेले हातरुमाल तेवढे दिसत होते. मीं वोटींत नजर फिरविली. ललिता अगदीं टक लावून माझ्याकडे पहात होती.

'आठवले शहाडे आणि कंपनी' हें नांव माझ्या सुखस्मृतींच्या कोशांत मात्र चिरंजीव झालें आहे.

**आठवले शहाडे आणि कंपनी**

फेब्रुवारी १९३५

# पत्करलेला पेशा

खऱ्या शुद्ध प्रेमाची परीक्षा मनुष्यास क्वचित् प्रसंगींच पहावयास मिळते. केवळ प्रेमाकरतां मनुष्यजात केवढा स्वार्थत्याग करूं शकते याचें प्रत्यंतर पहाण्याचा प्रसंग हरघडी येत नाहीं. मेघांच्या गडगडाटांत एखाद-दुसरी वीज चमकते किंवा ओसाड वाळवंटांत जसे तुरळक ओयासीस सांपडतात, तसेंच या संसाराच्या सफरींतसुद्धां असले कसोटीचे प्रसंग फारच थोडे येत असतात. आणि असल्याच एका सुंदर व उदात्त प्रसंगाचें चित्र माझ्या मनःचक्षूंसमोर नेहमीं उभें रहातें. माझ्या आयुष्यांत तरी तसला प्रसंग मीं पाहिलेला नाहीं व पुढेंहि पहावयास मिळणार नाहीं असें मला अजून वाटतें.

प्रथमच जेव्हां मीं XXX शहरीं सेन्ट जॉन कॉलेजमध्यें गेलों, तेव्हांच्या माझ्या मनःस्थितीचें वर्णन करणें, तिचें शब्दचित्र रेखाटणें, माझ्या शक्तीपलीकडे आहे. माझ्या जवळजवळ खेडेवजा गांवच्या स्कुलांत प्राथमिक शिक्षण घेऊन पुढील शिक्षणक्रमास मी शहरांत गेलों. प्रथम शहरच्या अवाढव्यतेचा परिणाम तर माझ्यावर झालाच होता. त्यांत आणखी जेव्हां मीं कॉलेजांत प्रवेश केला तेव्हां तर इतका भांबावून गेलों, कीं इतर मुलांनीं मला जवळ जवळ वेड्यांतच काढलें. प्राणिसंग्रहालयांतील अनोळखी प्राण्यास आपण ज्या विस्मयानें पहातों त्याप्रमाणें इतर मुलें माझ्याकडे पाहून आपापसांत हंसत, कुजबुजत व डोळे मिचकावीत. उपमाच देऊन त्या वेळची माझी भांबावलेली मनःस्थिति वर्णन करावयाची झाल्यास डबक्यालाच सर्व जग समजणारा बेडूक समुद्रांत पडला तेव्हां सागराच्या अवाढव्यतेची कल्पना होऊन त्यास जें वाटलें तेंच हुबेहूब मलाहि वाटलें.

कॉलेजांतील प्रोफेसरांविषयीं मला आदर वाटण्याऐवजीं भीतीच जास्त वाटे. कारण प्रत्येकजण आपापल्या कुऱ्यांत ! अधिकारधुंद धनी आपल्या नोकराशीं ज्या बेपर्वाइनें, बेफिकीरपणानें वागतो तशीच किंबहुना त्याहीपेक्षां जास्त बेपर्वाई प्रोफेसरांच्या वर्तनांत दिसे. माझी मनःस्थिति फार विचित्र झाली. या कॉलेजांत आणि या असल्या प्रोफेसरांच्या अध्यापनांत मी आणखी पांच वर्षें शिकणार ! मला निराशेनें हंसूं आलें, आणि हा पुढचा आयुष्यक्रम पाहून माझी छाती दडपून गेली. अशा परिस्थितींत आमचे इंग्रजीचे प्रोफेसर फादर जोन्स म्हणजे मला देवच वाटले. त्यांचा तो सुंदर, नाजुक व दाढीमिशाविरहित असलेला गुळगुळीत चेहरा, तरुण वय, गोड बोलण्याची विलक्षण शैली, प्रेमळ वागणूक व त्याहिपेक्षां शिकविण्याची कळकळीची पद्धति, या त्यांच्या सर्व गुणसमुच्चयानें ते माझे प्रथम दिवसापासूनच आवडते झाले. इतर प्रोफेसरांविषयीं जर मला आदरयुक्त भय वाटे तर त्यांच्याविषयीं मला आपुलकीचें प्रेम वाटे. अगदीं पहिल्या दिवसापासून मला त्यांच्याविषयीं आत्मीय भावना वाटूं लागली.

दिवसांमागून दिवस गेले. कॉलेजचा कंटाळवाणा जीवनक्रम माझ्या पूर्ण पचनीं पडला. पहिल्या वर्षीं खेडवळ म्हणून ओळखला जाणारा मी, दुसऱ्या वर्षीं अप्-टु-डेट म्हणून ओळखला जाऊं लागलों. प्रोफेसरांविषयींची भीति पार कुठल्या कुठं निघून गेली आणि त्यांचे गुणदोष पूर्णपणें कळल्यामुळें खासगी संभाषणांत ते थट्टेचा विषय होऊन बसले. इतकें झालें तरीहि फादर जोन्सविषयीं वाटणारा पूज्यभाव मात्र कायम राहिला; एवढेंच नव्हे तर शुक्लेंदुप्रमाणें वाढतच गेला. एकदां एखादा मनुष्य आपणास आवडूं लागला कीं, त्याचे दोषसुद्धां गुणासारखे वाटतात. लोहचुंबकाकडे लोखंड आपण होऊन जातें कीं तोच त्याला ओढून नेतो हें जसें आपल्याला कळत नाहीं, तसाच प्रकार फादर जोन्स व माझ्यामध्यें घडला. मी त्यांच्यावर जसें प्रेम करीत होतों तसेंच ते पण माझ्यावर करीत.

दुसऱ्या वर्षींच आमच्यामध्यें आणखी एका विद्यार्थिनीची भर पडली. ती म्हणजे मार्झिता डीसूझा ही होय. गत सालीं इंटरच्या परीक्षेस आजारामुळें तिला बसतां न आल्यामुळें ती एक वर्ष मागें राहिली होती. आणि योगा-

योगाची गोष्ट अशी कीं, तिला पाहिल्यापासून तिच्याविषयीं माझें अगदीं अनुकूल मत झालें. कॉलेजांत इतक्या विद्यार्थिनी होत्या, पण त्यांपैकीं एकी-कडेहि माझें असें लक्ष आकर्षित झालें नव्हतें. आणि अगदीं असेंच प्रोफे-सरांविषयींहि माझ्या बाबतींत झालें होते. एवढ्या मोठ्या प्रोफेसरांच्या तांड्यांत फक्त फादर जोन्सच मला आवडत. एवढ्या मोठ्या कॉलेजांत या दोनच व्यक्तींविषयीं मला प्रेम म्हणा, आपुलकीची भावना म्हणा, पण कांहीं विशेष वाटत होतें एवढें खास. पण फिरून फिरून एकच प्रश्न माझ्या मनांत उभा राही, आणि मी स्वतःलाच प्रश्न करींत असें, ' फादर जोन्स आणि मार्झिता या दोनच व्यक्तींविषयीं मला प्रेम कां वाटावें ? ' कदाचित यांत कांहीं ईश्वरी घटना तर नसेल ?

मार्झिता पहिल्याच बांकावर होती. यंदा तिच्याशिवाय आणखी दहा-पंधरा मुली आमच्या क्लासांत होत्या. आणि त्यांतील पांच सहा तर फार सुंदर होत्या. परंतु मार्झिता ती मार्झिताच. जाई, जुई, चंपक, मोगरा इत्यादि आपआपल्यापरी सुंदर सुंदर फुलांत गुलाबच उठून दिसतो, तसा तिचा वर्ण सांवळा असूनसुद्धां शंभर मुलींत ती उठून दिसे. आणि फादर जोन्ससुद्धां आपले तास शिकवितांना नेमके तिच्यापुढें उभे राहून शिकवि-तात, हें थोड्याच दिवसांत इतर विद्यार्थ्यांप्रमाणें माझ्याहि लक्षांत आलें. ते इंग्लिश भाषेचे प्रोफेसर असल्यामुळें कविता शिकवितांना त्यांत ते इतके रंगून जात, कीं मला राहून राहून वाटे हा एवढा शंभर नंबरी रसिक, धर्मो-पदेशकाच्या शुष्क वातावरणांत कसा पडला ? भावनाप्रधान व शृंगारिक कविता तर परिणामकारक तऱ्हेनें शिकविण्यांत त्यांचा एवढा हातखंडा होता कीं, या काळ्या झग्यांत ही रसिकता कशी राहूं शकते याचें आश्चर्य मी नेहमींच करीत असें. पाद्री म्हटला म्हणजे सर्वसंगपरित्याग केलेला, बायबलच्या मननांत वेळ घालविणारा व शुष्क आयुष्यक्रमास सरावलेला एक प्राणी—एवढीच माझी पाद्रीविषयीं कल्पना होती.

हल्लीं कॉलेजांत ज्याच्या त्याच्या तोंडीं एकच विषय झाला होता. आणि तो म्हणजे फादर जोन्स व मार्झिता यांची दाट मैत्री.

कॉलेजांत आपला तास शिकवतांना ते तिच्यासमोर उभे राहून शिकवतात, तिच्याकडे पाहून हंसतात, ती पण अधूनमधून त्यांच्या घरीं येते जाते, एक ना दोन—असे अनेक पुरावे आपल्या म्हणण्याच्या पुष्टीसाठीं विद्यार्थीवर्ग पुढें करी. बाकी मला मात्र तसें वाटत नव्हतें. फादर जोन्स-सारख्या तरुण, हौशी व रसिक मनुष्यानें एखाद्या मुलीसमोर एटिकेट, किंवा एक लकब अगर संवय म्हणून उभें रहाणें, किंवा किंचित् हंसणें यांत माझ्या दृष्टीनें कांहींच पाप नव्हतें. परंतु म्हणतात ना, नदीचें तोंड एक वेळ बांधतां येईल, परंतु जगाचें—या द्विजिव्ह जगाचें तोंड कोण बंद करणार?

असेच दिवस जात होते, आणि मुलांच्या कुजबुजींत भर पडत होती.

तिच्या मैत्रिणी तिला घालून पाडून डिंवचण्याची सुसंधि कधींच दवडीत नसत. साधीभोळी व उदार आणि उघड्या अंतःकरणाची मार्गिता तीं बोलणीं मुकाट्यानें ऐकून घेत असे. एकीनें म्हणावें, "तुझं बाई काय! तूं प्रोफेसरांच्या मर्जींतील मुलगी! तुला कसली आली आहे परीक्षेची भीति!"

दुसरीनें दुजोरा द्यावा, "आणि तुझं इंग्लिश अगर कोणताही विषय कच्चा असला तर खुद्द प्रोफेसर जोन्स तुला घरीं नेऊन शिकवतील!"

तिला हीं छद्मी बोलणीं समजत नसत, आणि अशा वेळीं गोड संभ्रमानें अगर दुसऱ्या एखादे वेळीं किंचित् भ्रुकुटिभंग करून ती मान वेळावीत असे. अशा वेळीं माझा समज चुकीचा नसेल ना, असें मला वाटूं लागे.

फादर जोन्सच्या घरीं माझी बरीच ये-जा होती; मला कांहीं पुस्तकें पाहिजे असलीं कीं मी त्यांच्या समृद्ध अशा लायब्ररीकडे धांव घेई, व ते पण मोठ्या आनंदानें मला परवानगी देत.

त्यांच्या घरांत पाय ठेवतांच उजव्या बाजूस त्यांचा उत्तम तऱ्हेनें सजविलेला दिवाणखाना होता, व डाव्या बाजूस त्यांची लायब्ररी होती. त्यांत धर्मविषयक ग्रंथांपेक्षां इतर पुस्तकें पुष्कळ पटींनीं जास्त होतीं. विशेषतः काव्य, कादंबरी, संगीत, चित्रकला इत्यादि विषयांवरील पुस्तकांचा भरणा विशेष होता. लायब्ररीची खोली पण पश्चिमाभिमुख असल्यामुळें सुंदर व शीतल वायुलहरींची उणीव तेथें केव्हांच नसे. खोलीच्या मध्यभागीं भलें मोठें वाटोळें टेबल असून त्याच्याभोंवतीं पांचसहा उंची मखमालीनें मढ-

विलेल्या खुर्च्या होत्या. सभोंवतीं भिंतींस टेकून ठेवलेल्या सागवानी सुंदर कपाटांत अगदीं नवीन चकचकीत बाइंडिंगचीं पुस्तकें दिसत होतीं. स्वस्थ पडून वाचावयाची इच्छा झाल्यास तेथें दोन झुलत्या आरामखुर्च्या पण होत्या. एवंच, वाचनापेक्षां या जागेचा मोहच जास्त पडण्यासारखा होता.

आणि मी पण जात असें तो वाचण्यापेक्षां त्यांच्या विद्वत्ताप्रचुर व रसिक संभाषणाचा मोह मला आवरत नसे म्हणून.

असाच एक दिवस, हो—शनिवारच होता तो! त्या दिवशीं मी दुपारींच त्यांच्या घरीं गेलों. नुकतेच चार वाजून गेले होते. येतांना उन्हाचा बराच त्रास झाला; तरीपण त्यांच्या निवासस्थानांत पोंचतांच बंगल्याबाहेरच्या थंडगार छायेंतच माझ्या त्रासाचा परिहार झाला. पायऱ्या चढून मी व्हरांड्यांत पाय ठेवला, पण दरवाजा बंद. मला आश्चर्यच वाटलें. सदासर्वकाळ उघडा असणारा दरवाजा आज बंद केला होता! आजपर्यंतचा माझा अनुभव असा होता, कीं त्यांचा दरवाजा फारच झालें तर फक्त लोटून घेतलेला असावयाचा; परंतु आज तो आंतून कडी लावून बंद केलेला होता. मिनिट दोन मिनिटें मी आश्चर्यानें वेड्यासारखा दरवाजाकडे पहातच राहिलों; व शेवटीं जरा वाट पहावी म्हणून त्यांच्या त्या लांबच लांब व्हरांड्यांत येरझारा घालूं लागलों. शेवटीं याहि गोष्टीचा कंटाळा आला म्हणून व्हरां-ड्याच्या एक टोंकाला कठड्यावर रेलून बागेंतील फुलझाडांकडे पाहूं लागलों.

अशा स्थितींत पांचदहा मिनिटें तरी गेलीं असतील. मी फुलें पहाण्यां-तच रमून गेलों होतों. बागेंतील बहुतेक फुलझाडांवर फुलें विकसलीं होतीं. निरनिराळ्या आकाराचीं, रंगाचीं व सुवासाचीं—परंतु एका बाजूस असलेल्या एका गुलाबाच्या गेंदबाज झाडाकडे माझें लक्ष वेधलें. त्या झाडाला एकच फूल फुललें होतें, आणि एक भ्रमर त्याच्याभोंवतीं घिरट्या घालून प्रिया-राधन करीत होता. प्रियकरणीला वश करण्यांत त्याला यश आलें असावें!

कारण नसतांच त्या फुलाला पाहून मला मार्झिताची आठवण झाली. तिची आठवण व्हावयास आणि दरवाजा उघडल्याचा आवाज कानीं पडण्यास एकच गांठ पडली. मी तंद्रींतून जागा झालों आणि दरवाजाकडे पाहूं लागलों. परंतु पहातों तें दृश्य जागृतावस्थेंत कीं स्वप्नांत याचा उलगडाच मला होईना! माझे डोळे तर मला फसवीत नाहींत ना? अशी मला शंका

वाटली. कदाचित् मनांत आलेल्या विचारांचें भडक चित्र तर मनश्चक्षूंसमोर उभें राहिलें नाहीं ना? पण छे! ही सत्यसृष्टींतलीच गोष्ट होती!

फादर जोन्स आणि मार्झिता हातांत हात घालून दरवाज्यांत उभीं होतीं. तिचे दोन्ही हात घट्ट धरून तिच्याकडे ते अनिमिष नजरेनें पहात होते. त्यांची नजर माझ्यावर जाण्यापूर्वीच मी आडोशास उभा राहिलों. पुढचा सर्व प्रकार मला दिसत होता. मीं मुद्दाम तो पहात होतों किंवा पहाण्यास लपून उभा राहिलों होतों अशांतला भाग मुळींच नव्हता. उलट, मला तेथून जाणें शक्य असल्यास मीं गेलोंहि असतों; परंतु तें शक्य नव्हतें. तेथून जावयाचें झाल्यास त्यांच्या अंगावरून जाण्याखेरीज वाट नव्हती. प्राप्त परिस्थितीशीं तोंड देत मी उभा होतों.

फादर जोन्सच्या या निवास–स्थानाभोंवतीं दाट झाडें छायेकरतां राखून ठेवलीं असल्यामुळें रस्त्यावरील इसमांस घरांतलें कांहींच दिसण्याचा संभव नव्हता म्हणून ठीक होतें. नाहीं तर त्यांचा चाललेला थट्टाविनोद उघड्या हवेंत करण्याजोगा नव्हता.

शेवटीं ती जाण्याकरितां निघाली. परंतु जातां जातां तिचा एक हात त्यांनीं पकडला. ती आपला हात सोडवून घेण्याचा दिखाऊ व निष्फळ प्रयत्न करीत होती. शेवटीं ती जास्तच चुळबूळ करूं लागली. तेव्हां त्यांनीं तिच्या हातास असा एक हिसडा मारला, कीं ती त्यांच्यावर जोरानें आदळली. सुसंधीचा फायदा घेण्यास ते तयार होतेच. त्यांनीं तिला घट्ट आवळून धरलें व दोनहि गालांचें चुंबन घेतलें.

माझ्या अंगावर सर्रकन कांटा उभा राहिला. मी कांहीं सोंवळा भट नव्हतों. हा प्रकार जर इतर कोणाकडूनहि झाला असता तर मला त्यांत आश्चर्य वाटलें नसतें. आगीच्यापुढें तूप वितळलें अगर पाण्यानें अग्नी विझला तर त्यांत आश्चर्य कोणतें? हें असें व्हावयाचेंच. परंतु पाण्यानें अग्नी प्रज्ज्वलित झाला हेंच तर आश्चर्य!

सबंध आयुष्य ब्रह्मचर्यांत वेंचण्याचा संकल्प करूनच या पाद्रीच्या पेशांत पडावयाचें असतें; आणि एकदां का हा पेशा पत्करला कीं मग काळ्या दगडावरची रेघ. जन्म असेपर्यंत त्यांतच आयुष्य खलास करावयाचें. इतर सुखोपभोगांकडे पहावयाचें सुद्धां नाहीं.

शेवटीं एकदां मार्जिता निघून गेली; पण जातांनासुद्धां तिनें किती तरी वेळ त्यांच्याकडे वळून वळून पाहिलें. फादर जोन्ससुद्धां ती गेली त्या वाटेकडे बराच वेळ पहात उभे होते. ती दृष्टिपथांतून निसटल्यावर ते घरांत गेले. मीं पण थोड्या वेळानें बागेला वळसा घालून पायांतील स्लीपर खाड् खाड् वाजवीत पुन्हां पायऱ्या चढून व्हरांड्यांत आलों. जणुं काय हा मी नुकताच येतों आहें. हा माझा डाव छान जमला. कोण आला हें पहाण्यास ते पुन्हां दरवाजांत आले; आणि मला पहातांच हंसून माझें स्वागत करून मला त्यांनीं आपल्या लायब्ररींत नेलें. नेहमींप्रमाणें आमच्या संभाषणास सुरवात झाली. आज ते बरेच आनंदांत होते. त्यांच्या या आनंदाचें कारण मला माहीत होतें.

असेच आणखी दोन महिने केव्हांच निघून गेले. आमचा सांच्यांतला आयुष्यक्रम रुळलेल्या मार्गानें व आनंदानें जात होता. नवल विशेष असें कांहींच घडलें नाहीं. प्रोफेसरांच्या घरीं मीं आतां बहुतकरून जात नसें. त्यांच्या वर्तनाविषयीं माझ्या मनांत एक प्रकारची उगीच अढी बसली होती.आणि केव्हां चुकून गेलोंच तर तेव्हां मला तेथें प्रोफेसरांशिवाय कोणीच आढळत नसे.

एक दिवस असाच कॉलेजांतील व्हरांड्यांतून येतांना एक विचित्रसें संभाषण मीं एकलें. लेडीज रूममधून आवाज येत होता. दार लोटलेलें होतें. कुणी तरी हलक्या आवाजांत बोलत होतें—

" मार्जिता ! ह्या दिवसांत तूं बरीच वाळलेली दिसतेस ! "

" छे ! कुठं ग ? "

" मला बाई तुझं चिन्ह ठीक दिसत नाहीं ! "

स्मिताचा सूक्ष्म ध्वनि माझ्या कानांवर आला. संभाषण संपलें व मीं पुढें चालूं लागलों. परंतु एकच गोष्ट माझ्या डोळ्यांपुढें नाचूं लागली—

" असं तर नव्हे ! " बेसावधपणें माझ्या तोंडांतून उद्गार बाहेर पडले.

" कायरे बुवा ! असं काय म्हणतोस ? " माझ्यामागून येणाऱ्या एका मित्रानें माझ्या पाठीवर थाप मारीत म्हटलें.

" छे ! कधीं ? " मी हंसून वेळ मारून नेली.

आणखी कांहीं दिवस निघून गेले. एक नवलाची गोष्ट घडली. मार्झितानें कॉलेज सोडलें. विद्यार्थ्यांस बोलावयास एक विषय सांपडला. कांहीं दिवस या विषयाची जारीनें चर्चा झाली. तशीच कांहीं दिवसांनीं ती बंदहि पडली. परंतु मीं मात्र या चर्चेत भाग घेतला नाहीं कीं ती गोष्ट विसरलोंहि नाहीं.

एक दिवस मी आणि फादर जोन्स असेच त्यांच्या लायब्ररींत बोलत बसलों असतां बागेच्या दारांत एक व्हिक्टोरिया येऊन थांबली. मी आणि ते खिडकींतून पाहूं लागलों. मार्झिता खालीं उतरली. तिला पहातांच विस्मयाचा एक झटकाच मला बसला. तिची चर्या मला विलक्षण दिसली. शरीर कृश झालें होतें. गालांवरची लाली पार अश्रूंनीं धुवून गेल्यासारखी दिसत होती. चेहरा काळवंडलेला व कारुण्यपूर्ण दिसत होता. नजर जमिनी-वर खिळली होती. ती गाडींतून उतरून सरळ आम्हीं बसलों होतों त्या खोलींत आली व एका खुर्चीवर बसली. मी कपाटाच्या आडोशास इतका वेळ असल्यामुळें तिनें मला पाहिलें नव्हतें. आतां मला पहातांच ती चमकल्यासारखी झाली.

मी जावयास निघालों, परंतु फादरनीं मला बसवलें.

“ तूं पण बैस ! तूं मला परका नाहींस; मी तुला केव्हांहि परका मानलं नाहीं. ” ते म्हणाले. मी मुकाट्यानें बसलों.

मघांशीं संभाषणाच्या वेळीं त्यांचा आनंदी व प्रसन्न चेहरा आतां पार काळवंडून गेला होता.

मार्झिताची नजर जमिनीवर खिळली होती. ती तिनें हळूच उचलली व अशा नजरेनें तिनें फादरकडे पाहिलें कीं न बोलतांच तिचा भाव आम्हीं समजलों.

“ मार्झिताचा इतिहास तुम्हांस कळला का ? ” त्यांनीं विचारलें.

मी उगाच राहिलों. मला कुठून ठाऊक असणार ? तरी पण माझें एक अनुमान होतें. तेंच पुढें सांगूं लागले—

“ ती आतां माझं पाप आपल्या पोटांत वागवीत आहे—आणि पुढील मार्ग विचारण्यास आतां इथं आली आहे ! ”

क्षण—दोन क्षण स्तब्धतेंत गेले.

“ तुम्हांला काय वाटतें ? मी हा प्रश्न कसा सोडवावा ? ’ त्यांनीं विचारलें.

मी काय उत्तर देणार ? मी उगाच राहिलों.

“ कल्पना करा ! माझ्या जागीं तुम्ही असतां तर तुम्हीं काय केलं असतं ? ”

“ मीं तिच्याशीं लग्न केलं असतं. परंतु माझ्यांत आणि तुमच्यांत जमीन-अस्मानचं अंतर आहे हें विसरून चालायचं नाहीं. तुम्हीं पत्करलेला हा पाद्रीचा पेशा तुम्हास तसं कसं करूं देईल ? तुम्ही पाद्री नसतां तर काय छान झालं असतं ! हा प्रश्न इतका बिकट तुम्हांला वाटला नसता. तुम्हींच तो सहज सोडवला असता. ” मी म्हणालों.

“ परंतु आपणास आतां प्राप्त परिस्थितींतूनच मार्ग काढायला पाहिजे.”

“ सर ! माझ्या क्षुद्र मनोवृत्तीची मला क्षमा करा. परंतु अन्य उपाय नाहीं म्हणूनच हा उपाय मला सुचवावा लागतो आहे—”

“ सांग— सांग पण काय तो ! ”

“ यांचं लग्न तुमच्या समाजांतील योग्य वराशीं जमवून द्यावं. ”

“ छे छे ! माझा एवढा अधःपात झाला तेवढा पुरे झाला. त्यावर आणखी पापाचा कळस ठेवण्याची माझी इच्छा नाहीं.” ते निश्चयानें म्हणाले.

मी आश्चर्यचकित होऊन मनांत विरमलों. आपल्या अंगावरील जबाबदारी अनायासें नाहींशी होते म्हणून त्यांना आनंद वाटावयास हवा होता.

‘ मग हे करणार तरी काय ? ’ माझ्या मनांत विचार आला.

मार्झिता शून्य नजरेनें बाहेर पहात होती. तिच्या भावी भवितव्यतेचा प्रश्न चालू होता. निकालाकडे नजर लावून बसलेल्या अपराध्यासारखी तिची मनःस्थिति झाली होती. फादर जोन्स आपल्याच विचारांत गढून गेले होते.

“ मार्झिता, माझं ठरलं ! माझा ठाम निश्चय झाला. ” त्यांचा आवाज सद्गदित झाला.

मार्झितानें मान उचलली, पण ती बोलली नाहीं. नजरेनें तिनें ‘ काय ?’ असा प्रश्न केला.

मी पण विस्मयानें त्यांच्याकडे पाहूं लागलों. प्रस्तुत संकटांतून सुटण्यास त्यांनीं कोणता उपाय शोधून काढला हें पहाण्याची मला उत्सुकता वाटूं लागली.

क्षणभर स्तब्धतेंत गेला. एखाद्या उदात्त चित्रास साजेशी पार्श्वभूमि चितारण्याची आवश्यकता असते तशीच ही गंभीर शान्तता होती.

" मार्झिताबरोबर मी लग्न करणार ! "

" आं ! " माझ्या तोंडून आश्चर्योद्गार बाहेर पडला.

मार्झिता पण त्यांच्या तोंडाकडे टकमकां पहात होती. तिच्या चेहऱ्यावर आनंद, आश्चर्य, दुःख इत्यादि मनोविकारांचें मिश्रण झालें होतें.

" पण तुम्हांस लग्न कसं करतां येणार ? तुम्ही रोमन–कॅथोलिक पंथाचे आहांत ! " मीं म्हटलें.

" हा पाद्रीचा पेशा सोडून गृहस्थाश्रमाची दीक्षा मी घेणार आहें. त्यामुळं मी जननिंदेस पात्र होईन; पोपसाहेब मला धर्मांतून, समाजांतून बहिष्कृत करतील; कदाचित् ही प्रोफेसरची जागाहि मला मिळणार नाहीं. परंतु हरकत नाहीं. प्रेमाशीं प्रतारणा करून पापाचे पर्वत शिरावर घेण्या-पेक्षां व अंतःकरणाची शांतता कायमची घालवून बसण्यापेक्षां मी करतों हेंच योग्य असं तुम्हांसहि वाटेल ! "

त्यांचा प्रत्येक शब्द पूर्ण विचार करूनच बोलल्यासारखा वाटत होता.

मी आश्चर्यातिरेकानें त्यांच्या धीरोदात्त मुखाकडे टकमकां पहात राहिलों. एकवचनी राम, सत्यप्रतिज्ञ हरिश्चंद्र यांच्या युगांत तर आम्ही नाहीं ना ! असं मला वाटूं लागलें. माझे डोळे अश्रूंनीं भरून आले; परंतु ते अश्रू आनंदाचे होते कीं दुःखाचे होते तें मलाच कळलें नाहीं. मी तशा मनःस्थितींतच नव्हतों.

पत्करलेला पेशा !

डिसेंबर १९३२

# अधःपात

प्रतिभा दारांतच उभी होती. दिवाणखान्यांतील घड्याळानें पांचाचे टोले दिले. पांढरपेशा वस्तीचा हा भाग असल्यामुळें कामावरून येणाऱ्या नोकरांची रस्त्यांत रहदारी होती. शाळाही नुकतीच सुटल्यामुळें पोरें हंसत खिदळत घरीं येत होतीं. तिनें दूर अंतरावरदेखील निरखून पाहिलें, पण ती ज्या व्यक्तीची इतक्या आतुरतेनें वाट पहात होती, ती कांहीं तिच्या दृष्टिपथांत आली नाहीं. आतां रहदारी कमी कमी होत चालली होती. ती एक लांब सुस्कारा सोडून आंत गेली व जरा वेळानें पूर्वीच्याच जागीं येऊन उभी राहिली. आतां रस्त्यांत मघांशीं वागडणारीं पोरें नव्हतीं, व त्यामुळें जिकडे तिकडे हंसरीं फुलें उमललेल्या बागेप्रमाणें दिसणारा तो रस्ता आतां खिन्न दिसत होता. पोट प्रत्येकाच्या पाठीवर निर्दयपणें फटकारे मारीत असल्यामुळें जो जीवनार्थ कलह चालला आहे त्याचें थोडेंसें प्रतिबिंब रस्त्यावरही दिसत होतें. दूधवाला दुधाच्या रिकाम्या चरव्या घेऊन जात होता. सायंकाळीं निघणारें एक दैनिक घेऊन एक पोरगा ओरडत चालला होता. पोस्टाचा शिपाई पण आपलें काम बजावून परत येत होता. प्रत्येकजण आपापल्या व्यवसायांत मग्न होता.

प्रतिभा वाट पाहून दमली. परंतु हा तिचा नित्यक्रमच असल्यामुळें तो तिच्या बऱ्याच अंगवळणीं पडला होता; परंतु आज तिच्या निर्दय नशिबाला तिची थोडीशी दया आली. रस्त्याच्या टोंकाला वळसा घालून प्रभाकर येत होता. खिन्न प्रतिभेची कळी थोडीशी उमलली. ओंठाच्या पाकळ्या थोड्या अलग होऊं लागल्या आणि प्रभाकर जेव्हां ओटीच्या पायऱ्या चढून

वर आला, तेव्हां तें वदनसुमन पूर्ण उमललें. तिनें सुहास्य-वदनानें त्याचें स्वागत केलें; परंतु पाषाणहृदयी प्रभाकर एक तीव्र तिरस्कारदर्शक कोप-कटाक्ष फेंकून आपल्या खोलींत चालता झाला. बिचारी प्रतिभा स्तंभितच झाली ! काळ्याकुट्ट मेघांतून शीतल जलधारांची अपेक्षा करावी आणि विजेचा लोळ अंगावर यावा तसें बिचारीस झालें ! चिमणीएवढें तोंड करून ती स्वयंपाकघरांत गेली. ताटांत फराळाचें घालून ठेवलेंच होतें, किटलींत दूध-साखर व चहा घालून तिनें आधणाचें उकळतें पाणी ओतलें व ताजा चहा तयार केला, आणि एका हातांत किटली व दुसऱ्या हातांत फराळाचें ताट घेऊन ती प्रभाकराच्या खोलींत आली. प्रभाकर कपडे घालून आराम-खुर्चीवर पडला होता. प्रतिभेनें चहाची किटली जवळच्या मेजावर ठेवली व जवळचेंच एक स्टूल त्याच्या खुर्चीजवळ ओढून तिनें त्यावर फराळाचें ताट ठेवलें व कपांत चहा ओतीत लडिवाळपणानें म्हटलें,

" आज जरा नेहमींपेक्षां लवकर यायचं झालं, नाहीं का ? "

" मग ? आलों लवकर-कां ? तुला वाईट का वाटलं मी लवकर आलों म्हणून ? " प्रभाकरानें तिरस्कारानें विचारलें. प्रतिभेला अत्यंत वाईट वाटलें. आपण प्रेमानें विचारलेल्या प्रश्नास असें तुसडें उत्तर येईल अशी तिची बिलकुल कल्पना नव्हती.

" असं कसं बरं म्हणतां ? आपण लवकर आलां तर मला कसं नको होईल ? आपण नेहमीं-निदान आजच्याइतक्या लवकर आलां तर मला किती तरी आनंद होईल; मी आपल्याला भाग्यवान् समजेन ! " प्रतिभा सद्गदित स्वरानें म्हणाली. या वेळीं तिचा चेहरा इतका कारुण्यपूर्ण झाला होता कीं, कोणाचेंही अंतःकरण चट्कन् पाझरलें असतें. पण प्रभाकराचें हृदय मात्र पाषाणाची कठोरता धारण करीत होतें.

" मग इथं लवकर येऊन काय करूं म्हणतेस ? ऑफिसच्या कटकटींतून सुटल्यावर दोन तास क्लबांत मजेनें घालवण्यास मिळाले तर तेवढाच मनाला विरंगुळा वाटतो. तेंसुद्धां समाधान मला मिळूं नये असं का तुला वाटतं ? " तिरस्कार, राग इत्यादि मनोविकारांच्या भडकलेल्या वृत्तींत तिरसटपणानें प्रभाकर म्हणाला.

प्रतिभेचें हृदय शतशः विदीर्ण झालें. चाबकाच्या फटकाऱ्याखालीं तिला लोळवली असती अगर सर्वांगास जखमा करून मिठाचें पाणी त्यावर ओतलें असतें तरीसुद्धां तिनें तें सोसलें असतें; पण हृदय चिरणारे हे वाग्बाण सहन करण्याचें सामर्थ्य तिच्या अंगांत नव्हतें.

" पण चहा घ्यायचा ना आतां ? निवत चाललाय तो ! " अंतःकरणांत उठलेला आगीचा डोंब तेथेंच दडपून अळेंबळें स्मित धारण करून प्रतिभेनें विषय बदलला.

" एवढ्यानेंच पोट भरलें, नको आहे मला आणखी. " मघांचाच रुक्ष-पणा स्वरांत कायम ठेवून प्रभाकरानें उत्तर दिलें.

" असा त्रागा काय बरं करायचा ? थोडासा तरी घ्या ना—नुकताच तयार केला आहे हा. आणि तो बशींतील शिरा पण ताजा आहे. " प्रतिभा आर्जवी स्वरानें म्हणाली.

" नको म्हणतों आहें ना ! मीं घेतला चहा हॉटेलांत. उगाच मघांपासून कटकट चालविली आहे. चल हें घेऊन, मला जरा स्वस्थ पडूं दे. जरा लवकर आलों तर हिचा आणखी हा त्रास ! " प्रभाकर भिंवया चढवीत म्हणाला व त्यानें फराळाचें ताट जरा पुढें ढकललें.

प्रतिभेनें चहाचें साहित्य उचललें व जड निश्वास सोडून ती आंत निघून गेली.

प्रभाकर ती जाईपर्यंत त्याच चढविलेल्या भिंवयांनीं तिच्याकडे रोंखून पहात होता. ती दृष्टिआड होतांच त्या खालीं आल्या. त्यानें शेल्फवरील एक कवितांचें पुस्तक उचललें व पडल्या-पडल्या तें चाळावयास सुरवात केली.

प्रतिभेनें चहाची किटली खालीं ठेवण्यास आणि कला आंत येण्यास एकच गांठ पडली.

" घ्या बाई तुमचं हें अवखळ पोर ! कसा मेला अगदीं जीव भंडावून सोडलान्. " कलेनें आपल्या कडेवरच्या वसंतास प्रतिभेकडे देत म्हटलें.

" बघितलंस प्रतिभे ! तूं घेतांच गुलाम कसा हंसायला लागला तो ! गुलांमा, आईपेक्षां माई तुला जास्त आवडते नाहीं ? " कलेनें हळुवारपणानें वसंताच्या गालाचा चिमटा घेत म्हटलें.

प्रतिभा स्वस्थ उभी होती. चिंतेचीं अभ्रें व दुःखाचे मेघ तिच्या चेहऱ्या-वर इतस्ततः फिरत होते; पण हें कलेच्या लक्षांत मुळींच आलें नाहीं. ती आपल्या मुलाकडेच अनिमिष लोचनांनीं पहात होती.

" प्रतिभे ! परक्यानं पाहिलं तर हा तुझा मुलगा नाहीं असं कोण म्हणेल ? "

तरीही प्रतिभा स्वस्थच होती. आतां कुठें कलेचें लक्ष तिच्याकडे वळलें.

" काय झालं, प्रतिभे, आज विशेष ? " कलेनें भयमिश्रित स्वरानें व उत्सुकतेनें विचारलें. प्रतिभेचा कंठ दाटून आला, डोळे पाण्यानें भरून आले व गालांवरून ओघळलेही. डोळ्यांच्या सरोवरांतून पाण्याचे पाट वाहूं लागले. त्यांस बांध घालणें तिला शक्य झालें नाहीं.

" सांग ना ग ? असं काय वरं करतेस ? " कलेनें कळवळून विचारलें.

प्रतिभेला तरी हृदय मोकळें करावयास जागा पाहिजेच होती. तिनें आजचा सर्व वृत्तान्त सांगितला. कलेला फार वाईट वाटलें. तिचे डोळेसुद्धां पाण्यानें भरून आले. तिच्या डोळ्यांपुढें सारा बालपणाचा चित्रपट दिसूं लागला; ' अरेरे ! अशा सुकुमार फुलाची अशी अवस्था व्हावी ना ? जें फूल देवानें मस्तकीं वहावें तें असें पायांखालीं तुडवलें जात आहे ! कोंब-ड्याच्या हातीं माणिक ! ' असे विचार तिच्या मनांत आले; पण ती कांहीं बोलली नाहीं.

जराशानें कला वसंतास तेथेंच ठेवून निघून गेली. एकाच घरांत एकमेकांस जोडून दोघांचीं बिऱ्हाडें होतीं व त्यामुळें छोट्या वसंताकडे दोनही बिऱ्हा-डांचें स्वामित्व आलें होतें. प्रतिभा विचार करीत होती. शेजारीं वसंत तांदूळ शिपडीत खेळत होता, त्याकडे तिचें लक्ष नव्हतें. ती मनाशींच म्हणत होती—' कला व मी बरोबर शिकलों, वाढलों. तिच्यापेक्षां मी विद्येंत, रूपांत व इतर सर्व बाबतींत सरस असतांना तिचा संसार सुखाचा झाला. तिच्या कडेवर मूलदेखील खेळूं लागलें. आणि—? ' तिला पुढें विचा-रच करवेना. ती सायंकाळच्या स्वैंपाकास लागली.

रात्रीं जेवणाचे वेळींही तोच प्रकार झाला. प्रभाकर चिडत–चरफडत कसेबसे चार घांस जेवून–जेवून कसचे कोंबून–आपल्या खोलींत बाजेवर जाऊन पडला.

प्रतिभेनें डोळ्यांतील पाण्याबरोबर दोन घांस खाल्ले, उष्टीं भांडीं मोरींत टाकलीं व तीही खोलींत आली.

प्रभाकर कायसें वाचीत होता. त्याच्या उशाशेजारीं स्टँडवर दिवा जळत होता. दिव्याच्या निळ्या चिमणीमुळें खोलीभर निळा, सौम्य व सुंदर प्रकाश पडला होता. प्रभाकरच्या चेहऱ्यावर तर अशा मजेदार तऱ्हेनें किरण पडले होते कीं, त्यामुळें त्याचा मूळचाच रुबाबदार व सुंदर चेहरा जास्त सुंदर दिसत होता. प्रतिभेला तर तें दृश्य इतकें मोहक वाटलें कीं, झटकन् जाऊन त्याच्या त्या भव्य कपाळाचें चुंबन घ्यावें अशी तिला इच्छा झाली. ती पुढें झाली, पण लग्न झाल्यादिवसापासून एकही दिवस तिच्याशीं नीट न वागणाऱ्या प्रभाकराचें तिला भय वाटलें. ती मागें सरली.

तिनें आपलें अंथरूण खालीं जमिनीवर घातलें व पांघरण्याची चादर मुद्दाम जोरानें झटकली. हेतू हा कीं, प्रभाकरास आपल्या आगमनाची वर्दी लागावी. तिचा अंदाज खरा ठरला. चादर झटकतांना झालेला ‘ फड ’ आवाज प्रभाकरानें ऐकला व त्याची वाचन–समाधि भंग पावली. त्यानें मान वळवली व त्याच्या प्रशांत असलेल्या चेहऱ्यावर तिरस्काराच्या आंठ्या पडल्या. त्यानें प्रतिभेकडे पाठ फिरवली व तो दुसऱ्या कुशीवर वळला. दिव्याचा स्टँड त्या बाजूनें ओढून घेऊन तो पुन्हां वाचूं लागला. दिवा दुसऱ्या बाजूस ठेवण्यांत त्याचा दुसरा एक हेतु होता, व तो हा कीं, प्रतिभेवर अंधार पडावा. जणुं काय ती अंधारांत असल्यावर आपणास तिकडे लक्ष देण्याची जरुरीच नाहीं.

प्रतिभा बराच वेळ त्याच्या पायांशीं जाऊन उभी राहिली. प्रभाकरानें तिच्याकडे नुसतें वळून देखील पाहिलें नाहीं. जवळ जवळ त्या स्थितींत ती अर्धा तास उभी राहिली. घड्याळांत साडे–अकराचा ठोका पडला व ती जड अंतःकरणानें अंथरुणावर जाऊन पडली.

ती झोंपली असेल अशा विचारानें प्रभाकरानें दिवा मालवला व सिगार पेटवून तिचे झुरके घेत त्यानें खांद्यापर्यंत पांघरूण ओढून घेतलें.

प्रतिभा जागीच होती. पुरुषांनीं सिगार ओढणें तिला आवडत नव्हतें. त्यापासून तोंडाला एक उग्र दर्प येतो असें तिला वाटत होतें. परंतु आपलें साधें म्हणणें ऐकून घ्यावयास प्रभाकर तयार नाहीं, मग सिगार सोडावयाचा आग्रह कुठला! ती डोळे फाडफाडून पलंगाकडे पहात होती; परंतु त्या दाट अंधारांत फक्त जळणाऱ्या सिगारशिवाय तिला कांहीं दिसत नव्हतें. जणुं काय खदिरांगारासारखे डोळे करून तो तिजकडे पहात होता.

थोड्या वेळानें त्यानें तें राहिलेलें हातांतील थोटुक फेंकून दिलें व पांघरूण डोक्यावरून घेऊन तो झोंपला. पण प्रतिभा मात्र न दिसणाऱ्या पलंगाकडे सारखी पहात होती. बाहेर सोसाट्याचा वारा वहात होता, पाऊसही जोरानें पडत होता. व मधून मधून विजा कडाडत होत्या. पण याहीपेक्षां भयंकर विचारांचे वादळी वारे तिच्या मस्तकांत घोंघावत होते. डोळ्यांतून पावसाच्या सरींसारखे अश्रूंचे सर पडत होते व वाईट कल्पनांच्या विजा अंग चाटून जात होत्या.

'पुनर्जन्मावर माझा विश्वास नाहीं; पण असा कोणता अपराध मीं त्या जन्मीं केला होता म्हणून त्याचीं हीं कटु फळें मी भोगीत आहें?' तिनें विचारशक्तीला ताण दिला व तो अपराध शोधून काढण्यास गतायुष्याचें सिंहावलोकन ती करूं लागली.

प्रतिभेस आपल्या बाल्यावस्थेची स्पष्ट आठवण नव्हती; परंतु जी कांहीं अंधुक अंधुक अशी होती त्यावरून तिचें बालपण बरेंच लाडांत गेलें होतें असें म्हणण्यास हरकत नव्हती. शाळेंतील आयुष्यापासून पुढची तिला अगदीं स्पष्ट अशी आठवण होती. शाळेंत नेहमीं पहिल्या इयत्तेपासून सातव्या इयत्तेपर्यंत पहिला नंबर तिनें केव्हांच सोडला नाहीं. शाळेंत निबंध-लेखन व काव्यगायन या विषयांत तिला कितीदां तरी पारितोषिकें मिळालीं होतीं. एकदां तर एका बड्या सामन्यांत दोन-चारशें मुलांमध्यें नमस्कार, काव्यगायन, वगैरे विषयांत मूल्यवान सुवर्णपदकें तिला मिळालीं होतीं. मास्तरांनीं नेहमीं तिच्या वडिलांजवळ तिचें चोख वर्तन व अभ्यास यांविषयीं प्रशंसोद्गार काढावे. त्या वेळीं तर तिच्या वडिलांनीं

आनंदभरानें तिला हृदयाशीं कवटाळावी व मुकेसुद्धां घ्यावे. आपल्याला मुलगा नाहीं याबद्दलचें त्यांना प्रतिभेकडे पाहून वाईटसुद्धां वाटत नसे. घरांत पैशाची टंचाई नसल्यामुळें तिला उंची वस्त्राभरणें वापरावयास मिळत. एवंच, तिचें बालपण फारच सुखांत गेलें. या सुखास गालबोट म्हणूनच कीं काय, प्रतिभेला आई नव्हती; परंतु त्याचें तिला विशेष वाईट वाटत नव्हतें. कारण तिनें आईस केव्हांच पाहिलें नव्हतें. तिची आई ती अगदीं लहान असतांना वारली होती. शिवाय मातृप्रेमाची उणीव निरतिशय पितृप्रेमामुळें तिला केव्हांच भासली नाहीं.

गोमंतकांतील परिस्थितीप्रमाणें मराठी शिक्षण संपतांच पोर्तुगीज शिक्षण॰ एका खाजगी शिक्षकाच्या हाताखालीं होऊन ती प्राथमिक पोर्तुगीज शिक्षणाच्या सेगुंदग्रावच्या परीक्षेंत उत्तम तऱ्हेनें पास झाली. लेखी व त्याहीपेक्षां तोंडी परीक्षा तिनें इतकी छान दिली कीं, प्रत्यक्ष परीक्षकांनीं तिच्या वडिलांजवळ आनंदोद्गार काढले. आतां प्रतिभेची शैशवावस्था संपली व ती तारुण्याच्या बागेंत बागडूं लागली; अर्थात शिक्षणाला पुढें इथें वाव नसल्यामुळें त्याला फांटा मिळाला. परंतु त्यामुळें तिचें बिलकूल नुकसान झालें नाहीं. तिच्या वडिलांचा प्रचंड ग्रंथसंग्रह तिच्याच ताब्यांत होता. महाराष्ट्रांतील सर्व प्रमुख नियतकालिकें त्यांना येत असत. शिवाय ते उत्कृष्ट लेखकही असल्यामुळें कितीतरी चांगलीं चांगलीं पुस्तकें त्यांच्याकडे अभिप्रायार्थ येत आणि जें चांगलें पुस्तक त्यांच्याजवळ नसे तें प्रतिभा मुद्दाम मागवून आणीत असे. या सर्व कारणानीं तिचें वाचन बरेंच झालें होतें. वडिलांच्या लेखनाची नियतकालिकांस पाठवण्याची कॉपी तीच करत असल्यामुळें तिला लेखनाचाही थोडा फार नाद होता.

वयोमानाप्रमाणें तिचें यौवन आतां भर—ज्वानींत आलें होतें. मूळचाच गोंडस व मोहक चेहरा आतां प्रफुल्ल कमलाप्रमाणें सुंदर दिसत होता. तिचा प्रत्येक अवयव अगदीं प्रमाणशीर—रेखींव होता असें नव्हे, तरी तारुण्यानें मुसमुसलेला प्रत्येक अवयव गोंडस वाटत होता. सौंदर्यही बेताचेंच असलें तरी त्यास एक प्रकारचा तजेला होता. रूप, गुण, विद्वत्ता व श्रीमंती या गुण—चतुष्टयावर कोणाही तरुणाचा व त्याच्या आईबापांचा मनोदुर्ग काबीज करणें फारसें कठीण नव्हतें; परंतु तिच्या वडिलांना नवऱ्यामुलांत कांहींना कांहीं वैगुण्य दिसे!

कोण घरचा संपन्न नाहीं म्हणून त्यांस पसंत नव्हता, तर कोण विद्वान नाहीं म्हणून पसंत नव्हता; कोण देहानें अगदीं किरकोळ, तर कोणाची नीतिमत्ता हिणकस; शेवटीं प्रभाकराचें स्थळ त्यांना मनासारखें मिळालें असें म्हणण्यास हरकत नव्हती. प्रभाकराचें घराणें जरी प्रतिभेच्या तोडीचें नव्हतें तरी बरेंच खानदानीचें व कुलीन होतें. प्रभाकर तर यंदा लिसेव सेंत्रालांतून पहिल्या दोन शिष्यवृत्त्या मिळवून पदवीधर होऊन बाहेर पडला होता. पण नुसतीं बक्षिसें मिळवलीं म्हणून आपली मुलगी त्यास देण्याइतके ते मूर्ख नव्हते; पण प्रभाकर नुसता पुस्तकांतील किडा नव्हता. तो सर्व शारीरिक खेळांत प्रवीण होता. डिबेटिंग सोसायटींत त्याच्याइतका होतकरू वक्ता कोणीही नव्हता. आणि दुसरी गोष्ट म्हणजे तो उत्तम लेखक होता. महाराष्ट्रांतील सर्व प्रमुख मासिकांत त्याचे लेख, लघुकथा व कधींमधीं कविताही पण प्रसिद्ध होत. असा 'अष्टपैलू' जांवई प्रतिभेच्या वडिलांनीं दवडला नाहीं. त्यांनीं शब्द टाकतांच प्रभाकराच्या वडिलांनीं आनंदानें संमति दिली. एवढा मोठा गृहस्थ आपण होऊन आपली एकुलती एक सुंदर शिकली–सवरलेली व भरपूर हुंडा आणणारी मुलगी देऊं करतो यापेक्षां आणखी काय पाहिजे ? आणि पुढें–मागें प्रतिभेबरोबर तिच्या वडिलांची सर्व संपत्तीही पण आपल्या घरीं येईल याबद्दल त्यांची खात्री होती. मग सर्व बाजूंनीं श्रेयस्कर अशा या सोयरसंबंधास हरकत कोण घेणार? प्रभाकर मात्र थोडा कुरकुरत होता; परंतु वडिलांच्या करड्या स्वभावामुळें आपली स्पष्ट नापसंती दाखवण्याचें धैर्य त्याला झालें नाहीं. सभांत आवेशानें बोलणारा प्रभाकर वडिलांपुढें येतांच मौन स्वीकारीत असे. बालपणींच वडिलांच्या करारी व बाणेदार स्वभावाची चांगली ओळख पटल्यामुळें तो त्यांच्याशीं वचकून वागत असे. बालपणींच्या कोंवळ्या मनावरचे ते संस्कार वाढत्या वयाबरोबर कांहीं पुसून गेले नाहींत.

प्रभाकर 'आधुनिक तरुण' असल्यामुळें आपण आपल्या सहधर्मचारिणीची निवड 'दौलत' कादंबरींतल्या अविनाशप्रमाणें अगर 'जादूगारांत'ल्या आनंदरावाप्रामणें करावी, असें त्याच्या काव्यप्रिय मनास वाटे. अशा परिस्थितींत प्रतिभेचा व त्याचा संबंध जोडून येण्याची चिन्हें दिसूं लागलीं. त्यानें थोडी कुरकूर केली; पण घरांतील प्रत्येक इसमानें, इतकेंच नव्हे

तर मित्रांनींही त्यास वेड्यांत काढलें. प्रतिभा कोणत्याही बाबतींत प्रभाकरास साजेशी–साजेशीच नव्हे तर जास्त योग्यतेची–होती हेंच त्याचें उत्तर.

प्रभाकरास दुसरा मार्ग नव्हता. लग्नाची सर्व तयारी अल्पावधींतच जय्यत झाली. आतां प्रतिभेच्या वडिलांस पत्र लिहून हें लग्न मोडावें असेंही त्यास वाटलें; पण वडिलांच्या जमदग्नी अवतारापुढें जाण्यास त्याचें कमकुवत मन धजत नव्हतें. त्यानें एका शब्दानें जर आपली नापसंति तिच्या वडिलांस कळविली असती तर त्यांनीं हा लग्नसंबंध मोडून टाकला असता. त्यांना मुलगी ‘उजवायाची’ नसून तिला सर्वतोपरी योग्य होईल व ती सुखांत राहील अशाच जागीं ते तिला देणार होते. मोठमोठीं श्रीमंत स्थळें याच कारणास्तव त्यांनीं सोडलीं होतीं.

शेवटीं लग्न झालें. एवढा मोठा कडाक्याचा लग्नसमारंभ पणजी शहरांत बऱ्याच वर्षांत झाला नव्हता. हुंड्यापांड्याविषयीं तर विचारावयास नको. वरपक्षानें कोणत्याही गोष्टीची इच्छा दर्शविण्याचा अवकाश, त्यांची ती आकांक्षा पूर्ण होई. प्रभाकराची तर इच्छा कल्पवृक्ष समोर असल्याप्रमाणें पूर्ण होत असे. त्याला देण्याकरितां म्हणून मुद्दाम जर्मनीहून साडेचारशें रुपयांचा पलंग आणला गेला होता, यावरून बाकीची कल्पना करतां येईल.

इतकें जरी झालें तरी ‘कडु कारलें, तुपांत तळलें, साखरेंत घोळलें, तरी कडु तें कडूच’ म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. प्रभाकरानें प्रतिभा आपल्या वधुनिवडीच्या आड आली म्हणून मनांत अढी धरली व तिचें रूपांतर हळुहळू तिरस्कारांत होऊं लागलें.

लग्नानंतर प्रभाकरास थोड्याच महिन्यांनीं एक लठ्ठ पगाराची नोकरी चालून आली. सुनेचा पायगुण म्हणून सगळ्या घरच्या मंडळींनीं तिला धन्यवाद दिले व तिचें कौतुक केलें. सासू–सासऱ्यांची ती जीव कीं प्राण होऊन बसली. परंतु प्रभाकराचें मन मात्र तिच्याविषयीं निवळलें नाहीं. त्याचें हें तिरसटपणाचें वर्तन पाहून त्याच्या आईबापांस फार वाईट वाटे. आतां नोकरीच्या निमित्तानें त्यानें घरीं येण्याचेंसुद्धां बहुतेक वर्ज केलें होतें!

होतो हा प्रकार नीट नव्हे असें वाटून त्याच्या वडिलांनीं प्रतिभेस सासूबरोबर पणजीस आणून प्रभाकरास बिऱ्हाड थाटून दिलें व तीं दोघें घरीं

निघून गेलीं; हेतु हा कीं, प्रतिभेसारख्या सर्वगुणसंपन्न पोरीवर थोड्याच दिवसांच्या नित्य सहवासानें प्रभाकराचें प्रेम बसेल. प्रतिभेसहि तसेंच वाटलें. आपण हरप्रयत्नांनीं प्रभाकराचें मन आपल्याकडे आकर्षण करून घेऊं असा तिला आत्मविश्वास होता; पण अनुभव मात्र निराळा आला! रंभाही अशाच आत्मविश्वासानें शुकदेवाकडे गेली होती; पण—

प्रतिभा जड अंत:करणानें दारांतच उभी राहून दूर अंतरावर अदृश्य होत जाणाऱ्या प्रभाकराच्या मूर्तीकडे पहात होती. आज क्षुल्लक कारणावरून निर्दयपणें त्यानें तिला वाक्ताडण केलें. असला हा मुका मार तिच्या अंगवळणीं पडत चालला होता तरी तिला तो सहन होत नव्हता. असलीं बोलणीं ऐकण्याची तिला संवय नव्हती.

आज शनिवार असल्यामुळें प्रभाकर ऑफिसांतून दुपारींच आला. प्रतिभेनें दिलेल्या चहाचा एकच घोंट घेऊन त्यानें बाकीचा फेंकून दिला व ट्रंकमधून रेशमी शर्ट व ब्लेझरचा कोट काढला. जुन्या खमिसाचीं बटणें काढून त्या शर्टास लावलीं. त्यानें कपडे केले व टोपीस ब्रश मारत तो आरशासमोर उभा राहिला. त्याच्या पाठीमागच्यां दारांत प्रतिभा उभी होती व हें सगळें पहात होती. टोपी डोकीवर ठेवून दोन्ही बाजूंच्या केंसांच्या बटा बोटांनीं कानशिलावरून टोपींत घालीत तो आरशाकडून परतला.

"आज मी कांहीं घरीं पोंचणार नाहीं." प्रभाकरानें नेहमींच्या तिरसटपणानें कपाळास आंठ्यांचें जाळें पसरवीत म्हटलें.

गरीब विचारी प्रतिभा!—कितीही शिकलीसवरली तरी हिंदु बायको! तरीसुद्धां तिनें धीर करून विचारलें.

"कुठं दूर का जायचं आहे आज?"

"कुठं का जाईना मी—! तुला कांहीं माझा कोणी एक्झिक्यूटर नेमलें नाहीं, प्रत्येक गोष्टीचा जाब देण्याला!" प्रभाकर म्हणाला.

प्रतिभेनें मान खालीं घातली. आपण जाणून-बुजून मुद्दाम आपला अपमान करून घेतला याची तिला तीव्र जाणीव झाली. ती आंत जाऊं लागली. पण पुन्हा त्याला काय वाटलें कुणास ठाऊक—तोच पुढें म्हणाला, "आज मंगेशीस पौर्णिमेचा उत्सव आहे. मला गेलं पाहिजे."

प्रतिभा आंत जात होती ती परत फिरली. "आपण गेलां तर मला इथं सोबत कुणाचीच नाहीं. कलासुद्धां कालच माहेरीं गेली. या एवढ्या मोठ्या घरांत मी एकटी कशी वरं राहूं?" प्रतिभेनें निरुपाय म्हणून सांगितलें.

तिला बोलावयास नको होतें. आपल्या शब्दांवर प्रभाकर आपणास उणें उत्तरदेखील देईल हें तिला ठाऊक होतें. त्यापेक्षां न बोललेलेंच काय वाईट? पण वस्तुस्थितीची जाणीव करून दिली पाहिजेना.

"कोण खायला बसलंय तुला इथं? आणि जर कोणी आलाच तर मी काय करणार? काय शिंचा त्रास हा बुवा!--वर्षा-सहा-माही कुठं जाणार असलों तर हिची ही अडचण नसेल तिथून तयार!" प्रभाकरानें त्रागा करण्यास सुरवात केली. प्रतिभा खालीं मान घालून मुकाट्यानें आंत गेली. तरीसुद्धां तो अद्वातद्वा बोलत होता. आणि इतकेंही करून तो निघून गेलाच. जणुं काय प्रतिभा म्हणजे अन्नावारी विकत घेतलेली गुलामच!

समोरच्या खिडकींतून प्रभाकराची अदृश्य होत जाणारी मूर्ति ती पहात होती. हळुहळू ती दृष्टिपथांतून दूर झाली. तिनें एक लांब सुस्कारा सोडला! जणूं काय एकादी बोट पुष्कळ वेळ उभी राहिल्यावर आंतील पाणी जोरानें सोडून रस्ता आक्रमण्यास सुरवात करते. आणि खरोखरच तिचें हृदय थोडें हलकेंहि झालें. इतक्यांत प्रभाकर ज्या रस्त्यानें गेला होता, त्याच रस्त्यानें दुसरी एक व्यक्ति येऊं लागली. ती म्हणजे तिच्या मैत्रिणीचा—कलेचा नवरा कमलाकर.

सुहास्य—वदनानें घराच्या पायऱ्या चढत कमलाकरानें प्रतिभेस विचारलें, "काय वहिनी, प्रभाकराची मार्गप्रतीक्षा चालली आहे वाटतं?"

तो कपडे काढावयास आपल्या बिऱ्हाडीं गेला.

प्रतिभेच्या मनांत पुन्हा विचार घोळूं लागले. ती शेजारच्या कला—कमलाकराचा सुखाचा संसार पहात होती. कलेपेक्षां आपण कोणत्या गोष्टींत कमी आहोंत! अगर प्रभाकर तरी कमलाकरापेक्षां कोणत्या बाबतींत श्रेष्ठ आहे म्हणून आमच्या व कलेच्या संसारांत एवढें अंतर असावें? त्यांनीं आपली संसारांतील सफर सुखानं साजरी करावी आणि आपणास मात्र सहारा वाळवंटांतून प्रवास करण्याची पाळी यावी! यांत दोष कोणाचा? तिला आपला दोष तर कांहींसुद्धां दिसत नव्हता.

कमलाकर नवे कपडे चढवून बाहेर येत होता. त्याचा तो रुबाबदार, मोहक व हंसरा चेहरा पाहून तिची दृष्टि क्षणभर त्याच्या चेहऱ्यावर खिळली. कमलाकर जर आपला पति असता तर आपला संसार किती सुखाचा झाला असता, याचें मोहक चित्र तिच्या डोळ्यांसमोर दिसूं लागलें. तिला क्षणभर आनंद झाला; पण तो क्षणभरच ! तिनें आपल्या कमकुवत मनाची खूप निर्भत्सना केली. कमलाकर कठड्यावर पाय ठेवून स्लीपर पुशीत होता व तोंडानें कुठल्याशा पदाचा चरण गुणगुणत होता.

"काय वहिनी, आज बऱ्याच चिंताक्रांत दिसतां तुम्ही ?" कमलाकरानें कठड्यावरून पाय काढीत विचारलें.

"छे, छे, कसली चिंता ?" ती तंद्रींतून भानावर आली. थोडा वेळ थांबून विषयांतर करीत ती म्हणाली, "आज कुठं स्वारी परिट–घडीचे कपडे करून ?"

"मडगांवीं जातों आज. थोडंसं काम आहे." कमलाकरानें उत्तर दिलें.

"आजच जायला पाहिजे का...?"

"हो म्हणाना...तसं विशेष कांहीं काम नाहीं. पण कां—?" कमलाकरानें प्रश्न केला.

"नाहीं...सहज." प्रतिभेनें उत्तर दिलें; पण तें अंतःकरणापासून दिलेलें नव्हतें हें त्यानें ताडलें.

"तरी पण सांगा ना..." कमलाकरानें आग्रहच केला.

"तुम्हीही गेलांत तर मला सोबत कुणाचीच नाहीं...म्हणायचं झालं कीं तुम्ही आज घरीं असणार, आणि म्हणूनच स्वारी श्रीमंगेशीं गेली. तुम्हीही जाणार असें तिकडे कळलं असतं तर जायचं झालं नसतं..." प्रतिभेनें पतीची अंतःकरणाविरुद्ध तरफदारी केली.

"हरकत नाहीं. काळजी करूं नका तुम्ही. उद्यां प्रभाकर घरीं आल्यावर मी जाइन मडगांवला, नाहीं तर पुढच्या शनिवारीं जाईन, त्यांत काय मोठंसं..."

कमलाकर कपडे काढावयास म्हणून खोलींत गेला; पण लगेच परत फिरला.

"वहिनी, कपडे मी केलेच आहेत तेव्हां जरा बाहेरून फिरून येतों, चहा वगैरे घेऊन." कमलाकरानें सांगितलें.

" बाहेर जाणार तर जाच तुम्ही पण घरांत चहा तयार आहे. थोडा घेऊनच जा......" प्रतिभा उत्तराची वाट न पहातां आंत गेली व मघाशीं प्रभाकराकरितां तयार केलेला चहा तसाच किटलींत होता तो तिनें कपांत ओतला, व बशींत फराळाचें घेऊन ती बाहेर आली.

कमलाकरानें तिच्या हातांतूनच चहा घेतला व फराळ खातांना तिच्या सुग्रणपणाची तारीफ करीत त्यानें चहा संपविला. आपण श्रम करून केलेल्या चहा–फराळाचें चीज आतां झालें असें तिला वाटलें.

दुसरा दिवस रविवार. प्रभाकर आजही मंगेशीहून परत आला नाहीं. कमलाकरानें मडगांवास जाण्याचा बेत प्रतिभा 'नको' म्हणत असतांही तहकूब केला.

प्रतिभेनें आज स्वतःकरितां म्हणून मुद्दाम स्वयंपाक केलाच नाहीं. ती दिव्याजवळ कायसें वाचीत होती. वर विजेचा पंखा भिरभिरत होता व तिचे केंस भुरुभुरु उडत होते. इतक्यांत कमलाकर आंत आला. आपल्या बिऱ्हाडाची किल्ली त्यानें प्रतिभेच्या बिऱ्हाडीं ठेवली होती व ती घेण्याकरितां म्हणून तो आंत आला होता. त्यानें किल्ली मागितली. प्रतिभेनें ती काढून दिली; पण त्याचें लक्ष टेबलावरील ताज्या टपालाकडे वळलें. वरच 'वसुंधरे'चा अंक पडला होता. त्याच्या मुखपृष्ठावर ' आमचीं कॉलेजें ' लेखमाला सुरू झाल्यांबद्दल मजकूर होता. तो आंत आला, त्यानें टोपी काढली, शेजारच्या खुर्चीवर पडल्या पडल्याच ती लेखमाला तो वाचूं लागला.

प्रतिभा समोरच्या खुर्चीवर बसून कायसें वाचीत होती. वाचीत होती म्हणण्यापेक्षां तिनें पुस्तक उघडें करून हातांत घेतलें होतें म्हणणें ठीक होईल. अनिमिष लोचनांनीं त्याच्या रुबाबदार सौंदर्याचें पान ती करीत होती. हळुहळू तिच्या मनावरचा ताबा सुटूं लागला. तिनें पुस्तक मिटून खालीं ठेवलें. पण नजर मात्र ढळवली नाहीं. कमलाकरानें दुसरें पान उलटलें. त्याचें तिच्याकडे लक्ष नव्हतें. बऱ्याच वेळानें तो तिचा निरोप घेऊन आपल्या खोलींत निजावयास गेला.

तो निघून गेला पण प्रतिभेस नवी दृष्टि देऊन गेला.

रात्र झाली म्हणून प्रतिभेनें दिवा मालवला व ती बाजेवर जाऊन पडली. परंतु मनाचा वारू वायुवेगानें चौखूर धांवूं लागला. तिनें स्वतंत्र व निर्भयपणें घालवलेलें बालपण आणि आजचें बंदिवान जिणें ! तिचें तिलाच हंसूं आलें.

दारुण निराशेंतील तें हास्य होतें. भयंकर गडगडाटांत वीज चमकावी तसें विचार–विकारांच्या तुंबळ युद्धांत उडालेलें तें निराशेचें हंसूं होतें !

प्रतिभा अंथरुणावर पडल्या पडल्या विचार करीत होती–'नाहीं–आतां मला हें मुळींच सहन होत नाहीं.–माझ्या बरोबरची, माझ्यापेक्षां दोन वर्षांनीं लहान असलेली कला आज दोन मुलांचा संसार सजवून बसली आहे. आणि मी ?–लहान मुलांची मला किती आवड ?–एव्हांना कलेप्रमाणें दोन मुलें माझ्या कडेवर खेळलीं नसतीं का ? मी आजन्म ब्रह्मचर्य कसें बरें पाळूं शकेन ?–आजन्म इंद्रियदमन करण्याचें तपःसामर्थ्य माझ्या दुबळ्या अंगांत नाहीं.–अंगांत मुसमुसणारें तारुण्य मला स्वस्थ कसें बरें बसूं देईल ?–आतां असेच कमलाकरांचे पाय धरूं का ?'

प्रतिभा क्षणभर गोंधळली, दचकली–पण क्षणभरच. 'पण काय हरकत आहे ? माझा अधःपात होईल एवढंच ना ? हंः ! मग त्याला जबाबदार कोण ? सर्वस्वी हेच–प्रभाकरच ना ?'

तिच्या अंतःकरणांत धुमसणारा अग्नी पेट घेऊं लागला. आतां फक्त ज्वालामुखीचा उद्रेक होण्याचा अवकाश काय तो राहिला होता. स्वतंत्र विचारांत वाढलेल्या प्रतिभेनें इतके दिवस मनाचा सर्व बाजूंनीं कोंडमारा करून घेतला होता. पण आतां हें कोंडलेलें पाणी बंधाऱ्यावरून वाहूं लागलें.

प्रभाकर जेवून सिगारेटचे झुरके घेत आरामखुर्चीवर पडला होता. प्रतिभा आजहि जेवली नाहीं. स्वैंपाकघरांत सर्व कांहीं अस्ताव्यस्त पडलें होतें. भात–भाजीचीं भांडीं उघडीं पडलीं होतीं व तव्यावरचे मासळीचे तुकडे मांजरें खात होतीं.

प्रभाकर निजावयास जाण्याच्या तयारींत होता. इतक्यांत प्रतिभा सरळ त्याच्यापुढें येऊन उभी राहिली. त्यानें तिरस्कारानें परिपूर्ण असा कटाक्ष तिच्याकडे फेंकला पण तो बोथट होऊन खालीं पडला. आज प्रतिभा नेहमींची राहिली नव्हती. तिनें त्याची बिलकुल पर्वा न करतां करड्या आवाजांत विचारलें. आज तिच्या अंगांत कुठचा देवचार संचरला होता कोणास ठाऊक !

"तुम्ही हें असंच चालूं ठेवणार का ?"

"असंच म्हणजे ?" प्रभाकर किंचित् नरमला. आज कांहीं हें प्रकरण नेहमींचें नाहीं याबद्दल त्याची खात्री झाली.

"मी तुम्हांस स्पष्टच सागतें–मला माझ्या वडिलांनी अन्नावारी मोलकरीण म्हणून कांहीं तुम्हांस विकलें नाहीं. तुमच्याचप्रमाणें मलाहि सर्व मनोविकार आहेत. मी सारा जन्म हा असा संन्याशिणीप्रमाणें घालवावा असं का तुमचं मत आहे ? माझ्यांत तुम्हांस असं कोणतं वैगुण्य दिसलं म्हणून तुम्हीं माझे असे हाल चालविले आहेत ?" तिचा चेहरा लालबुंद झाला.

प्रभाकरही कांहीं मूर्ख नव्हता. त्यास सर्व पटत होतें; परंतु अंतरांतील मूर्खपणाची तेढ अजून कायम होती. सुंभ जळालें तरी पीळ कायमच रहातो.

" मग मला काय कर म्हणतेस ? मी तुला काय कमी करतों आहे ? अन्न, वस्त्र, दागिने—"

" हा साडेतीन हात देह पोसण्यास तुमच्या अन्नवस्त्राची जरुरी नाहीं. वडिलांची एक कपर्दिकही न घेतां, माझ्या अंगांत असलेल्या कलेच्या जिवावर माझेंच नव्हे तर तुमचेंहि संरक्षण मी करीन एवढा मला आत्मविश्वास आहे. मला तुमच्याकडून तुमच्या प्रेमाशिवाय कसलीहि अपेक्षा नाहीं. फक्त तुमच्या प्रेमाच्या जोरावर, झोंपडींतसुद्धां, मी श्रीमंतींत वाढलें असतांही, आनंदानें आयुष्य कंठिलें असतें. "

प्रतिभेचा चेहरा घामानें नुसता डवडवून गेला. हृदय पिळवटून, दुसऱ्याचें हृदय पिळवटणारे ते शब्द प्रभाकर ऐकत होता. एखाद्या अपराध्याप्रमाणें त्यानें खालीं मान घातली होती ती वर उचललीच नाहीं.

प्रतिभा पुढें बोलूं लागली—

" अजून जर तुम्ही आपला पूर्वक्रम असाच चालविलात व जर माझ्या मनोवृत्तींनीं उचल खाऊन माझें पाऊल वांकडें पडलें–माझा अधःपात झाला, तर त्याला देवाच्या दरबारांत, नीतीच्या न्यायासनासमोर सर्वस्वीं आपण जबाबदार आहांत. या क्षुद्र दुतोंडी जगाची पर्वा मला नाहीं..."

प्रतिभा रडण्याच्या बेतांत होती...तिला पुढें बोलवत नव्हतें. ती तारवटलेल्या स्थितींत आंत गेली व धाड्कन् धरणीवर तिनें अंग टाकलें. प्रभाकर अश्रुपूरित व पश्चात्तापदग्ध नजरेनें ती गेलेल्या वाटेकडे पहात होता.

**अधःपात**

ऑगस्ट १९३३

# "सोल्दाद"

खेमा कार्तेलाच्या[1] दारांत पहारा करीत होता. त्याच्याकडे पाहिलें म्हणजे अगदीं कसेंसेंच वाटे. त्याची भव्य पण वृद्धापकाळामुळें थकूनभागून वांकलेली शरीरयष्टी पाहिली म्हणजे कित्येक काळ ऊन्हवाऱ्याशीं व पाऊस-पाण्याशीं झुंजत उभ्या असलेल्या पडक्या भिंताडाची आठवण होई. तारुण्यांत त्याच्या भरदार छातीस अगदीं ठाकठीक बसणारा त्याचा खाकी युनिफॉर्मचा कोट त्यास आतां इतका सैल होत होता कीं, त्यांत आणखी एक खेमा सहज मावला असता. थोरामोठ्या पण विपन्नावस्थेस पोंचलेल्या व्यक्तीचें दैन्य त्याच्या जुन्या वैभवनिदर्शक चिन्हांनीं जसें जास्त प्रतित व्हावें तसे त्याचे कपडे त्याचें दैन्य दर्शवण्यास पूर्ण समर्थ होते. पन्नास ठिकाणीं भोकें पडलेला लांडा कोट आणि तुमान ठिकठिकाणीं उसवली होती. तरुणपणांतील गुलगुलीत गालांवरचे ते कल्ले आणि ओंठांवरील तराऊन वाढलेल्या मिशा आतां शरीरांतील जोम निघून गेल्यामुळें गलितधैर्य होऊन व पांढुरता धारण करून निचेष्ट पडल्या होत्या; गुळगुळीत डोक्यावरच्या टोपींतून मागच्या बाजूस शेंडीचे कांहीं केंस बाहेर डोकावत होते. कानशिलांवरील शिरा अगदीं तट्ट फुगल्याप्रमाणें उठून दिसत होत्या. आणि त्याचा मुळचाच काळा रंग काळजीच्या काजळीनें जास्त काळवंडला होता. पायांतल्या वहाणा आतां बऱ्याच झिजल्या होत्या. पण सुंभ जळला तरी पीळ कायम राहावा त्याप्रमाणें अजूनही थोब्या करकरत होत्या. लष्करी शिस्तींत सगळें आयुष्य गेल्यामुळें

---

१ पोलीसचौकी.

त्याचा जमिनीवर होणारा पदाघात तालांत पडत होता. खांद्यावर टाकलेली बंदूक त्यानें डाव्या हातांत सांवरली होती, व उजव्या हातानें तो फिरून फिरून घाम पिळीत होता.

पुष्कळशा फिती लटकविलेला एक अधिकारी जवळ येतांच तो पवित्र्यांत उभा राहिला व त्यानें नेहमीप्रमाणें हांक दिली.

" अझाऽऽऽऽऽर्मश् "

आंतून दोन तीन सोल्दाद[२] आपल्या प्रमुख[३] काबासहीत धांवत बाहेर आले. शिरस्त्याप्रमाणें लष्करी सलामी झडली व तो गर्विष्ठ अधिकारी उर्मटपणें आंत शिरला. जातांना त्यानें तुच्छतेनें त्या शिपायांकडे पाहिलें. जणुं काय ते आपले गुलामच !

खेमाचा चेहरा आज पार उतरून गेला होता. फक्त आठ दिवसांची रजा मंजूर करण्यासाठीं त्यानें आज वरिष्ठांची पाय धरून विनवणी केली. परंतु त्यांस कनिष्ठांच्या कर्मकटकटीनें कान किटवण्याचें काय कारण ? खेमाचा रजेचा अर्ज नामंजूर झाला. त्याला ही रजा एकाद्या श्रीमंताप्रमाणें करंजाळें अगर बागच्या खाऱ्या थंड हवेंत मजेंत घालवावयास नको होती. त्याचा म्हातारपणीं व नवस–सायासांनीं झालेला एकुलता एक मुलगा रवळू, आज आठ दिवस झाले तापानें नुसता फणफणत होता. त्याची योग्य शुश्रुषा त्याच्या एकट्या आईकडून इतर घरकामासुळें होणें शक्य नसल्यामुळें त्याला ही रजा हवी होती.

हातीं पैसा नसल्यामुळें स्वतःच्या पोटास चिमटा घेऊन व इतरांच्या थट्टे-कडे लक्ष न देतां आपले जुनेच कपडे वर्षानुवर्षें वापरून त्यानें आपल्या लाडक्या रवळूस पंचवीस तोळ्यांचें चांदीचें काण व वीस तोळ्यांचे दोन वाळे केले होते, ते विकून तूर्त त्यानें औषध चालू केलें आणि वैद्य डॉक्टरांचे उंबरठे लाचार मुद्रेनें झिजविण्यास त्यानें सुरवात केली.

---

२ सोल्जर, शिपाई. ३ नाईक.

कालची रात्र अत्यंत काळजीची गेली. खेमा व त्याच्या बायकोनें अगदीं पापणीस पापणी न लावतां अलोचन जागरणानें देवाचें नांव घेत घालविली. खळू निचेष्ट पडला होता. श्वासोश्वासानें त्याचें पोट किंचित् वरखालीं होत होतें आणि हाच काय तो आशेचा आधार त्यांना वाटत होता. पहांटेच्या समयीं खळूनें डोळे उघडले. त्याच्या आईनें लगबगीनें चुडल्यांच्या आगीवर सातूचें पाणी गरम करून त्याला थोडें पाजलें व त्यामुळें खळूला थोडी हुशारी आली. खेमास आनंद झाला व त्या भरांत त्यानें कुठल्याशा देवचारास कोंबड्याचा बळी देण्याचा नवस बोलून दाखविला.

त्याला वाटलें आज आपण घरींच रहावें. न जाणो योग्य शुश्रुषेच्या अभावीं आपल्या लाडक्यास पुन्हां तापदेखील भरायचा.

पण पोट पुढें असलें तरी पाठीवर सारखे आसूड उडवीत असतें. कामावर-न जातां जर आपण घरीं राहिलों तर आपल्या नोकरीवर गदा येईल, आणि नोकरी गेली तर मग खाणार काय?

मेलेल्या मनानें खेमा कामास हजर झाला. ठरल्या वेळीं त्याचा पहारा सुरू झाला.

उन्ह अगदीं अंग भाजीत होतें. वैभवाच्या उच्च शिखरावर आरूढ झालेला सूर्यनारायण अधिकारमदानें धुंद झाल्यामुळें गरीब विचारें निरपराधी जग आपल्या तापानें होरपळत आहे याची फिकीर करत नव्हता. आणि तसल्या त्या उन्हांत खेमा आपलें कर्तव्य बजावीत होता. आंत अंगांत आणखी दुसरा कपडा नसल्यामुळें त्याचा तो लांडा कोट चिंब भिजला होता. त्यानें बंदूक उभी केली, व तो जरा भिंतीस टेकला. कोटाच्या बाहीनें त्यानें आपल्या कपाळा-वरचा घाम पुसण्याचा प्रयत्न केला, पण तो निष्फळ ठरला. आधींच घामानें भिजलेली ती बाही आणखी पाणी शोषण्यास समर्थ नव्हती. कपाळावरचा घाम तसाच ओघळत राहिला.

दमलेलें शरीर कोठें टेकलें कीं ग्लानी आल्यासारखें वाटतेंच, आणि खेमानें तर सारी पूर्वरात्र जागून काढली होती. त्याचा जीव अगदीं श्रांत झाला होता.

टेकलेल्या जागेवरच त्याचे डोळे त्याची इच्छा नसतांनाही झांकूं लागले, त्यानें डोळे उघडण्याचा शिकस्तीचा प्रयत्न केला, परंतु तें त्याच्या हातीं नव्हतें. त्याला ग्लानी आल्यासारखें वाटलें, नव्हे आलीच ग्लानी.

एकदोन मिनिटें याच अवस्थेंत गेलीं असतील—

—तोंच पुष्कळशा फिती लटकावणारा तोच अधिकारी ठराविक वेळीं आला-पण त्याला सलामी देण्यास खेमाचें शरीर आणि मन कुठें होतें त्याच्या ताब्यांत ?

तो अधिकारी अगदीं जवळ आला, त्यानें अगदीं हृदयभेदक नजरेनें खेमाकडे पाहिलें, पण खेमाचे डोळे मिटलेच होते-त्यानें खेमाच्या दंडास धरून त्याला गदगदून हलविलें.

एका क्षणांत खेमा ह्या जगांत आला, त्यानें डोळे उघडले, तो कावराबावरा झाला. अधिकाऱ्याच्या डोळ्यांतील अंगारानें त्याचें हृदय अगदीं भाजून निघालें-त्याचा घसा कोरडा पडला-त्याच्या तोंडांतून शब्दच उमटेना. तरी पण सर्वशक्ती एकवटून तो ओरडलाच.

" अझाऽऽऽऽमंश्."

नेहमींप्रमाणें सलामी झाली, पण—

त्याच दिवशीं सायंकाळीं बोर्डावर नोटीस लागली.

" खेमा नाईक सतरकार, सोल्दाद नंबर ७३, कोंपांजी तिसरी—वरिष्ठांचा अपमान केल्याबद्दल तीन महिने कैद."

—आणि त्याच दिवशीं कामावरून सुटतांच त्याला तुरुंगांत पोंचवण्यांत आलें.

—आणि त्याचा लाडका रवळू ? जगाच्या तुरुंगांतून सुटून जाण्याची तो तयारी करीत होता !

" सोल्दाद "

डिसेंबर १९३५

# क्षयाची भावना

आज शनिवार. आज जयंत पणजीहून यावयाचा होता. परंतु आतां तो यावयाची वेळ टळून गेली होती. नेहमीं तो पांचसहांच्या सुमारास घरीं येई. आज मात्र रात्रीचे आठ वाजले तरी त्याचा पत्ता नव्हता. प्रत्येक शनिवारीं तो पणजीहून घरीं येई, व रविवारची सुटी घरच्या प्रेमळ मंडळीच्या सहवासांत घालवून परत सोमवारीं परत जाई. ह्या नेमांत कधींच म्हणण्यासारखा फरक झाला नाहीं. निदान गेल्या वर्षापासून, म्हणजे सुधेशीं त्याचा विवाह होऊन ती घरीं आल्यापासून तरी त्यानें आपल्या घरीं येण्यांत खळ घातली नाहीं. परंतु कालच्या शनिवाराऐवजीं तो रविवारीं घरीं आला. आणि आजच्या शनिवारींहि तेंच.

सुधेस मात्र यामुळें एक निराळीच शंका भेडसावूं लागली. ती जों जों जास्त विचार करूं लागली तों तों तिला आपल्या विचारांत सत्यतेचा आभास होऊं लागला.

इतके दिवस घरांतच रमणारें जयंताचें मन आतां बाहेर रमूं लागलें असावें, असा सुधेनें कयास बांधला व त्यास बळकटी आणणारे तर्क ती लढवूं लागली. कोळसा उगाळून पांढऱ्या रंगाची पैदास थोडीच होणार! आपणच जाणून बुजून संशयपिशाच्च आपल्या मानगुटीवर बसवून घेतल्यावर नीट विचार कुठले सुचावयास! रंगाचा चष्मा वापरून आपण सत्य रंगांत जग पहाणार म्हणून कसें चालेल?

जयंत आतां येणें शक्य नसल्यामुळें घरच्या मंडळीनें जेवण आटोपलें. सुधा पण सासूबरोबर जेवावयास बसली पण नेहमींप्रमाणें तिला जेवण गेलें

नाहीं. आज जयंत येणार म्हणून बरीच उंची मासळी पैदा करण्यांत आली होती व त्याचे घमघमीत पदार्थ पण करण्यांत आले होते. परंतु ताप आलेल्या माणसाची रुची जशी बिघडते तशी या विकल्पाग्नीनें तिची रुचीच नव्हे तर मनस्वास्थ्यसुद्धां पार बिघडवून टाकलें होतें.

जेवण आटोपून मंडळीची निजानीज झाली. सुधापण अंथरुणावर पडली. पण दोरी लावून सोडलेला भोंवरा जसा आपल्याच भोंवतीं गिरक्या घेतो तसें तिचें मन आपल्याच विचाराच्या केंद्राभोंवतीं गिरक्या घेऊं लागलें.

दुसरा दिवस उजाडला. निदान कालच्या खेपेसारखा जयंत आतां तरी येईल अशी सुधेस आशा वाटत होती. आतां स्वारी आली कीं रुसावयाचें, फुगावयाचें व न येण्याच्या कारणाचा पुरता छडा लावावयाचा अशी तिनें मनाशीं गांठ बांधली; परंतु जयंत आतांहि आला नाहीं. सुधेस आतां चिंता वाटूं लागली व या चिंतेबरोबरच निरनिराळें तर्ककुतर्कांचें संशयपिशाच्च तिच्या मनाभोंवतीं पिंगा घालूं लागलें. बायकांच्या स्वभावाची एक अशी मौज असते कीं त्यांच्या मनोविकारांत मत्सरास अग्रस्थान असतें. सुधेस-सुद्धां जयंताच्या प्रकृतीविषयीं काळजी वाटण्याऐवजीं त्याच्या या वर्तनाविषयीं संशयच जास्त आला.

त्या दिवशीं संध्याकाळीं सुधा खिडकींत उभी होती. सूर्य मावळण्यास अजून अवकाश होता. थोड्या वेळानें तो पश्चिमेच्या महालांत जाणार होता— " किती वक्तशीर आणि प्रेमळ आहे हा सूर्य ! एक दिवससुद्धां आपल्या प्रियतमेच्या दर्शनास जाण्यास चुकत नाहीं, नाहीं तर जयंत, आठवड्यांतून एक दिवससुद्धां त्याला वेळेवर येतां येत नाहीं. " सुधेच्या मनांत असे विचार झरकन् येऊन गेले; जणूं काय वळवाच्या पावसाची सरच.

आतां जयंत येत नाहीं अशी सुधेची जवळ जवळ खात्रीच झाली; पण तरीसुद्धां तें वेडें हृदय अजूनहि त्या आशेंतच गुंगत होतें.

आणि असल्या मनुष्याच्या वेड्या आशेची परमेश्वरासहि कधीं कधीं अनुकंपा वाटते.

जयंत अचानक साडेपांच वाजतां आला. त्याचा चेहरा पार काळवंडून गेला होता व मुखावरची कान्ती मावळली होती. सुधेस वाटलें यांनीं

रात्रींचें कुठें तरी जागरण बिगरण केलें असावें. तिच्या विकल्पांस व संशयास तो एक वळकट आधार मिळाला. मुद्देमालाचा ऐन गड्डा हातीं आल्यावर प्रतिपक्षास जसें स्फुरण चढतें तसें सुधेस झालें. आपण केव्हां एकदां या विषयाचें सूतोवाच करतों असें तिला वाटूं लागलें.

जयंत कपडे काढून बसतो न बसतो, इतक्यांत तिनें प्रश्नांची सरबत्ती करण्याच्या रोखानें विचारलें.

'डोळे लाल आणि तारवटलेले दिसतात ? रात्रीं जागरण झालं वाटतं ?'

'हो, रात्रीं झोंपायला सहजच दोन वाजले.' जयंत शांतस्वरानें व निर्विकार मुद्रेनें म्हणाला.

'कुठं गेलां होतां काल ?'–जरा वेळानें तीच म्हणाली.'काल तुम्हीं येणार, निदान आज सकाळीं तरी याल म्हणून आम्हीं तुमची वाट पाहिली.' सुधेचा तुसडा स्वर कायम होता. वादळाच्या मारानें झाडें उन्मळलीं म्हणून डोंगर हलत नाहीं; संशय विकल्पाच्या वाऱ्यांनीं सुधेचें हृदय हादरलें म्हणून तिच्या प्रश्नाच्या सवरत्तीनें जयंताचें चित्त विचलित झालें नाहीं. तो मघांसारखा शांत व निर्विकार बसला होता.

'काल काकोड्यास जाणें भाग पडलें, जत्रा होती ना तिथें काल! सहजच हो ना करतां झोंपायास दोन वाजले.' जयंत उत्तरला.

प्रतिस्पर्धी अगदींच थंड प्रकृतीचा असल्यामुळें सुधेस पाहिजे होतें तें जमेना. तरी पण मघांचीच वृत्ति कायम ठेऊन ती म्हणाली.

'मग नाच गाणं झालं वाटतं कलावंतिणीचं ?'

'हो तर! तो मुख्य कार्यक्रम तिथला म्हणेनास. तें झाल्याशिवाय कसें राहील ? त्यांतून जत्रेचा दिवस. खरंच काकोडें कलावंतांचा गांव आहे असं म्हणतात तें खोटें नाहीं. रात्रीं गाणें किती सुंदर झालं म्हणून सांगूं ? मी तर एरव्हीं मुलखाचा अरसिक, परंतु मीसुद्धां रंगून गेलों त्यांत.' जयंत उत्तरला. त्याचा चेहरा या संभाषणानें खुलला व डोळे कालच्या त्या आठवणीनें विस्फारित झाले. सुधेच्या अंगाचा या भाषणानें भडका उडत होता, व ती तो तितक्याच संयमानें दाबीत होती.

'आणि झोंपलां कुठं ?' तिनें श्वास रोधीत विचारलें.

"दुर्गा कलावंतिणीच्या बंगल्यावर!" जयंतानें उत्तर दिलें. "खरोखरच बंगला अगदीं छान हवाशीर जागीं बांधला आहे तिनें. सगळ्या सुखसोयी अगदीं जय्यत केल्या आहेत तिथं."

सुधा अगदीं सर्दच झाली. मांस खाल्लें म्हणून कोणी हाड गळ्यांत बांधीत नाहीं. जयंताचें मन व्यसनांनीं इतकें का मेलें आहे? तिला काय बोलावें हेंच सुचेना. तरीपण धुसपुसत कांहींशा त्राग्यानें ती म्हणालीच.

"प्रकृतीस हीं जागरणें चांगलीं कां? मुद्दाम असें जत्रांस फिरून जागरणांनीं प्रकृति बिघडून घेण्यांत काय सुख आहे देवास ठाऊक." यापेक्षां जास्त स्पष्ट तें ती काय बोलणार?

"सुधे, असें मूर्खासारखें काय बोलतेस? मीं मुद्दाम चैनीकरतां जत्रेला गेलों होतों असा का तुझा समज आहे? ते काकोडकर डॉक्टर तुला माहीत आहेत ना? त्यांचेंच औषध मी घेत होतों हेंही तुला ठाऊक आहे. त्यांनीं एकदां मला पूर्णपणें तपासण्याकरतां आपल्या नव्या यंत्रसामुग्रीनें सुसज्ज अशा आपल्या काकोडेंच्या दवाखान्यांत बोलावलें होतें. काल ते पणजीस आले होते, तेच म्हणाले चल म्हणून. तोंपर्यंत मला काकोड्यास जत्रा आहे म्हणून माहीत देखील नव्हतें." जयंत नेहमीच्या शांत स्वरानें उत्तरला.

त्याच्या प्रकृतीचें मान, डॉक्टरचा अभिप्राय वगैरे विचारण्यापूर्वीच स्त्रीसुलभ, विखारलेल्या अंतःकरणानें व फाजील जिज्ञासेनें तिनें विचारलें.

"मग कालच्या शनिवारीं घरीं न येतां रविवारींसे आलांत?"

"डॉ. काकोडकरांनीं त्या दिवशीं आपण पणजीस येणार असें सांगितलें होतें." सुधेचे संशयाचे शैल जयंताच्या साध्या आणि समर्पक उत्तरानें कोसळले.

"आणि दुर्गा कलावंतिणीच्या बंगल्यावर झोंपायला कां जाणं झालं?" मनांत रुखरुखणारा एकच प्रश्न तिनें बोलून टाकला. तिला हायसें वाटलें.

दुर्गा कलावंतीण ही डॉ. काकोडकरांची मावस बहीण. तिच्याच बंगल्यांत त्यांनीं आपला दवाखाना थाटला आहे. व तेहि तिथेंच रहातात."

सुधा जागच्या जागीं थिजली. तिला आपलीच लाज वाटूं लागली. तिला पश्चात्ताप झाला व आपलें तोंड लपवावेंसें वाटूं लागलें.

" डॉक्टर काय म्हणाले ? त्यांनीं तपासलं कां ? " सुधेनें उत्सुकतेनें पण अधिऱ्या हृदयानें प्रश्न केला–तिचा कंठ सद्गदित झाला होता.

" त्यांचं म्हणणं मला क्षयाची भावना झाली आहे. " जयंत सावकाश उत्तरला.

" आं ! " सुधेचा चेहरा चिंतेनें व काळजीनें निष्प्रभ झाला.

" भिण्याचं कांहीं कारण नाहीं म्हणाले ते. नुसत्या औषधानेंच बरें करतों म्हणून त्यांनीं मला आश्वासन दिलें आहे. अधिकच झालें तर कोरड्या हवेंत चार महिने घालविले म्हणजे झालें. "

सुधा रडूं लागली–पतीच्या काळजीबरोबरच, असल्या निष्पाप उघड्या व सरळ अंतःकरणाच्या माणसाविषयीं आपण मनांत संशयास थारा दिल्या-बद्दल तिला दुःख वाटूं लागलें. व अपराधाबद्दल तीव्र पश्चाताप पण वाटूं लागला.

सरळ हृदयी व प्रेमळ जयंतास वाटलें कीं तिच्या कोमल हृदयास आपल्या आजाराच्या बातमीनें पराकाष्ठेचें दुःख झालें असावें. त्याला वाटलें आपण ही बातमी तिला सांगावयास नको होती. त्याला आपल्या या आडमुठेपणाचा राग आला. त्यानें तिला जवळ ओढली व हृदयाशीं आंवळून धरलें. सुधा त्याच्या छातीवर मान ठेऊन फुलून फुलून रडत होती व जयंत तिला समजावीत होता. त्याचेहि डोळे पाण्यानें भरून आले व दोन अश्रू तिच्या गालांवर पडले. जणूं काय जयंताच्या प्रेमाश्रूंनीं सुधेचें हृदय शुद्ध झालें. अगदीं साफ धुवून निघालें.

**क्षयाची भावना**

सप्टेंबर १९३३

# पहिलें पाप

रात्रीच्या आठांची इगर्जीची घंटा ऐकतांच मुरारी उठला. त्याच्या चेहऱ्यावर समाधानाचें स्मित झळकलें. सारा दिवस पावसाच्या मारांत तारीची होडी वल्हवून तो दमला होता. त्याचें कुडतें आणि लंगोटी देखील पावसानें भिजविली होती. अजून थोडा थोडा पाऊस पडतच होता. आकाशांत मत्त कुंजरांच्या टक्करा चालूच होत्या आणि त्याचे प्रतिध्वनी रात्रीच्या प्रशांत वातावरणांत मधून मधून निनादत होते.

आज दोन तीन दिवस पावसानें असा कहर चालविला होता कीं सांगतां सोय नाहीं. त्यांत आणि वाऱ्यानें आपलें मित्रत्व स्मरून त्यास साथ दिलेली! मग नदीस पूर यावयास कुठचा उशीर! पाऊस हें प्राणिमात्राचें जीवन असलें तरी त्यानें आज आणि दोन दिवसांत कितीतरी जीव घरांदारांस मुकविले होते. अन्नपाण्याविना पशुपक्ष्यांचें जीवन संपुष्टांत आणलें होतें. कित्येक जनावरें पुरांतून वहात होतीं, आणि दिमाखानें डुलणारीं प्रचंड झाडें पाण्याच्या ओघाबरोबर वाहून जात होती. आजच जरा कुठें पावसास दया आली अन् नदीचें पाणीही जरा उतरलें.

मुरारीस आज फार श्रम झाले होते. थंडीच्या कडाक्यांत आणि पावसाच्या पुरांत भिजत ओल्यानें वल्हवणें म्हणजे कांहीं थट्टा नव्हती.

त्यानें होडी जरा पाण्याच्यावर ओढली व गुराचें दावें खुंटास बांधावें त्याप्रमाणें त्यानें होडीच्या नाळेची दोरी सोडवून एका भल्या थोरल्या झाडाच्या पाळास बांधली व प्रेमानें आपल्या त्या पनेळास, त्या लहानग्या होडीस पाहिलें. पनेळास डोळे असते तर त्यास त्या मुरारीच्या नजरेंत

आपल्याविषयीं कृतज्ञता, प्रेम, वगैरे कितीतरी भाव तरळतांना दिसले असते.

आतां पाऊस बंद झाला होता. त्यानें डोकीवरची कांवळ काढली व झटकून एका दगडावर ठेवली आणि मुंजीस खोंवलेली विडी काढून तो झुरके मारूं लागला. थंडीनें आंखडलेल्या शरीरांत ऊब येतांच त्यानें आपली कांवळ उचलून हातांत घेतली व तो चालूं लागला. त्याचें घर तेथून बरेंच दूर होतें.

नदीकांठावरून वर भाटांत येतांच चांदण्या रात्रींच्या त्या धूसर प्रकाशांत त्याला दुरून कोणीसें लगबगीनें येतांना दिसलें. निर्भयपणें नेहमीं वावरणारा मुरारी देखील जरा चरकला. भूत तर नव्हे?––का देवचार? बुधवार रविवारीं म्हणे देवचार संचाराकरतां बाहेर पडत असतो. त्यानें आपल्या हातांतली काठी घट्ट धरली व तो तेथेंच माडाच्या बुंध्यास टेंकून बसला. क्षणार्धांत ढगांच्या फटींतून पृथ्वीवर चंद्रप्रकाश पडला. जमीन प्रकाशित झाली आणि त्याबरोबरच त्याच्याही डोक्यांत जरा प्रकाश पडला. कोणीतरी पावसाच्या माऱ्यानें बेजार झालेली व वाऱ्याच्या थंड झुळुकांनीं कुडकुडणारी स्त्री त्याच्याच रोखानें येत होती. आणि तिच्या कांखोटीस कसलेंसें गांठोडें होतें.

मुरारीच्या मनांत पुष्कळ विचारतरंग येऊन गेले–कोणी जीव द्यावयास तर नदीकाठीं आली नसेल? मग बरोबर गांठोडें कसलें? हं बरोबर–एखादी स्त्री आपल्या पातकांचें जिवंत स्मारक तर गंगार्पण करण्यास आली नसेल ना? हो तसेंही असेल!

आणि या विचारांबरोबर त्याच्या अंगावर सरकन् कांटा उभा राहिला. तो उठला आणि एका माडाच्या आड झाला–ती बाई किनाऱ्यावर येतांच थांबली. तिनें आपलें गांठोडें जमिनीवर ठेवलें व ती चांदण्याच्या त्या अस्पष्ट अशा धूसर प्रकाशांत आजूबाजूस न्याहाळूं लागली. मुरारीची खात्री झाली. ही बाई आज कांहीं तरी अमानुष प्रकार करणार.

तारीचा पनेळ बांधलेला पहातांच ती चरकली. होडीवाला घरीं तर गेला नसेल ना? मग आपणांस पैलतडी कोण नेऊन ठेवील?

माडाच्या चुडतांतून वाट काढीत आलेल्या चंद्रकिरणाच्या प्रकाशांत तिच्या चेहऱ्यावर उमटलेला असहाय्यतेचा भाव मुरारीस दिसला.

तिला आठवण झाली–हो मुरारीचीच ती तार होती. तिला आशा वाटली. मुरारी इथंच कुठं तरी जवळपास असेल. तिनें मोठ्यानें हांक मारली. “ मुरारी ऽऽऽ!!! ”

प्रशांत वातावरणांत ते शब्द निनादले.

माडाआड असलेल्या मुरारीस ते शब्द परिचित वाटले. तो आवाज त्याला ओळखीचा वाटला. चंद्रा तर नव्हे! छे. पण ती इतक्या रात्रीं इथें कशाला येईल?

“ कोण मला हांक मारते? ” मुरारीनें विचारलें.

“ कोण, मुरारी इथंच कारे होतास तूं? मी अगदीं आवाज फुटेपर्यंत जोरानें तुला हांक मारली. मला ओळखलं नाहींस का? मी चंद्रा! ”

“ कोण? चंद्रा? ” मुरारी जवळ जवळ ओरडलाच. त्याला आश्चर्याचा एक झटकाच बसला.

“ इतक्या रात्रीं तूं कुठं चाललीस? ” मुरारीनें प्रश्न केला.

“ माशेलांत औषध आणण्याकरितां मी वैद्यबुवांच्या घरीं गेलें होतें. पण ते घरीं नव्हते. ते येईपर्यंत प्रथम उशीर लागला, आणि त्यानंतर पावसानें झोड उडवल्यामुळें सारा बांद बरबटला होता. जपून चालतां चालतां ही एवढी रात्र झाली. या वाटेनें घर जवळ पडतें म्हणून या वाटेनेंच आलें. जातांना दुसऱ्या वाटेनें गेलें होतें. ” चंद्रा उत्तरली.

झुलुकांनीं वाहणारा वारा झोतानें वाहूं लागला. स्वर्गाच्या रस्त्यांवर गर्दी करुन राहिलेल्या या काळ्या लोकांनीं वायुराजाच्या हातचा आसूड पाहून काढता पाय घेतला. स्वर्गाचें पृथ्वीस दर्शन झालें. स्वर्गांतल्या चटक चांदण्या डोळे मिचकावून त्यांना हंसूं लागल्या.

चंद्रप्रकाशानें पृथ्वीचें तोंड उजळ झालें, आणि पूर्वस्मृतींच्या आठवणीनें मुरारीच्या चेहऱ्यावर पण स्मित झळकलें. पण तो क्षणार्धांत भानावर आला. “ चंद्रा, तूं ऐकलीसना मघांची आठांची घंटा? मी आतां कायद्यानेंसुद्धां बांधलेला नाहीं. आठानंतर तार वहाण्याची माझ्यावर जबाबदारी नाहीं.” मुरारी तिरस्कारानें म्हणाला.

चंद्राला आश्चर्य वाटलें. मघांशीं सहानुभूतीनें व प्रेमार्द्र दृष्टीनें आपल्याकडे पहाणारा हा मुरारी असा डिंवचलेल्या सर्पाप्रमाणें कां बदलला!

" मुरारी, तूं मला पैलतडी नेऊन लावलंच पाहिजेस." चंद्रा हंसत हुकमी आवाजांत पण लडिवाळपणें म्हणाली.

" म्हणजे ? तुझा हुकूम मानण्यास तुझा कांहीं नोकर नाहीं मी, कीं तूं सांगशील तसें नाचावयास तुझा नवराही नाहीं. " मुरारी कठीण स्वरानें व तिच्याकडे भेदक नजरेनें पहात म्हणाला.

चंद्रा हंसली—अगदीं लाडीकपणें हंसली आणि मुकाट्यानें होडींत जाऊन बसली. मुरारी कितीतरी वेळ भाटांतच विचार करीत उभा होता.

" मुरारी ये ना रे ! मला घरीं पोंचायला रात्र नाहीं का होणार ? तूं कांहीं मला घरापर्यंत सोबत करण्यास येणार नाहींस. "

तरीही मुरारी स्वस्थच उभा होता. त्याचे विचार त्याला कुठें तरी वाहवून नेत होते. पूर्वस्मृतीचा रम्य चित्रपट त्याच्या नजरेपुढून जात होता.

" मुरारी ये ना !" चंद्रानें केंविलवाण्या नजरेनें व स्वरानें म्हटलें. चंद्रप्रकाशांत तिचें कारुण्यपूर्ण तोंड व भरलेले डोळे व घसा दाटल्यामुळें घोगरा झालेला आवाज ऐकून मुरारीचें हृदय हललें. एकाद्या मंत्रमुग्ध नागाप्रमाणें तो मुकाट्यानें किनाऱ्यावर गेला. त्यानें होडीची दोरी सोडली, होडी पाण्यांत ढकलली व तो आंत जाऊन बसला.

होडी किनारा सोडून बरीच दूर गेली. मुरारीच्या दमदार वल्ह्यांनीं होडी जोरांत चालली होती. चंद्र डोक्यावर आला होता—सगळीकडे अगदीं सुंदर स्वच्छ चांदणें पडलें होतें.—चंद्रप्रकाशानें चकाकणारें नदीचें रुपेरी पाणी सृष्टिदेवतेच्या हिरव्या शालूच्या किनारीसारखें शोभत होतें. दूर दिसणारे सत्तरीचे पर्वत ध्यानस्थ ऋषीमुनींप्रमाणें दिसत होतें.

चंद्राला कवटाळणें आपल्या हाताबाहेरचें काम आहे हें जाणून समुद्र त्याचें प्रतिबिंब आपल्या हृदयांत सांठवीत होता, आणि समुद्राप्रमाणेंच मुरारीही चंद्रास कवटाळणें देवानें आपल्या हातीं ठेवलें नाहीं, लग्नानें चंद्रा दुसऱ्याची झाली या जाणिवेनें तिचें प्रतिबिंब डोळ्यांवाटे हृदयांत सांठवीत होता. पाण्याच्या वरून दिसणाऱ्या शांत प्रवाहाप्रमाणें मुरारीही वरून शांत दिसत होता. चंद्रभेटीकरतां तळमळणारा सागर आपली तळमळ व धडपड लाटांनीं, लहरींनीं, पाण्याच्या प्रवाहावरील सूक्ष्म आंदोलनांनीं व्यक्त करीत होता. पण मुरारी—त्याला हें भाग्य लाभत नव्हतें.

" चंद्रा हें औषध कुणाकरतां नेतेस?" मुरारीनें भानावर येऊन विचारलें.

" ते आजारी आहेत ना?" चंद्रानें उत्तर दिलें.

" कोण? देमू आजारी? आणि केव्हांपासून?" मुरारीनें विचारलें.

" हो–झाले पंधरा दिवस–प्रथम ताप साधाच असल्यामुळें–" चंद्रा त्याला देमूची, आपल्या नवऱ्याच्या आजाराची खबर सांगत होती–पण मुरारी ती कुठं ऐकत होता? त्याचें लक्ष निराळ्याच गोष्टींत होतें. देमूची आठवण होतांच त्याच्या विचारांना भलतीच दिशा मिळाली. त्याला आपल्या गतायुष्याचा चित्रपट आपल्या नजरेसमोरून धांवत आहे कीं काय असा भास झाला.

त्याचा सुंदर जीवनपट, त्यांतील सुखाशांचीं सुंदर चित्रें, सगळें सगळें कांहीं नष्ट होऊन गेलें होतें. त्याच्या दृष्टीनें एक प्रकारें देमूनेंच त्याच्या आयुष्याचा पट फाडून, अगदीं चिंध्या करून टाकल्या होत्या. हा देमू जर सैतानासारखा मधेंच उपस्थित झाला नसता तर समोर बसलेली चंद्रा त्याची झाली असती. बाळपणापासून जोपासना करून वाढविलेल्या त्याच्या आकांक्षा सुफलित झाल्या असत्या–देमूची बेगडी श्रीमंती पाहून व त्याच्या तेजानें दिपून चंद्राच्या त्या थेरड्या बापानें आपल्यासारख्याच पन्नाशी उलटलेल्या म्हाताऱ्या बिजवरास, त्या देमूस चंद्रा दिली आणि—

मुरारीचें, विचारचक्र इथेंच थांबलें–विचारांच्या तंद्रींत त्याचें वल्हें इतक्या जोरांत बसलें कीं होडी एकाच बाजूला जास्त कलंडली व तिच्यांत पसाभर पाणी आलें.

" मुरारी मला बुडवण्याचा का रे तुझा बेत आहे?" चंद्रा हंसून म्हणाली.

" तुला मी काय बुडवणार? तुझ्या त्या थेरड्या बापानें त्या म्हाताऱ्या देमूशीं लग्न लावून नाहीं तरी तुला बुडवलेंच आहे!" मुरारी भेदकपणें म्हणाला.

" बरं बरं, बुडवूं दे." चंद्रा जरा वेडावून आणि फुरंगटून म्हणाली.

"पण खरंच विचारतों चंद्रा, देमूंत तुला काय अधिक वाटलं म्हणून तूं त्याच्याबरोबर मुकाट्यानें लग्न लावलेंस? हो माझ्यापेक्षां तो वयानें मात्र मोठा होता. अगदीं माझ्या बापापेक्षांही मोठा!" मुरारी हेटाळणीनें हंसला.

"मला आणभाक दिली असतांनासुद्धां तूं त्याच्याबरोबर लग्न लावलंस." मुरारीनें सुस्कारा सोडला.

चंद्राची मान खालीं होती–तिची पाठ मुरारीकडे असल्यामुळें तिच्या डोळ्यांतला अश्रुप्रवाह त्याला दिसला नाहीं. अंतःकरणांतला विचार तो वडवडत होता; त्यामुळें चंद्राच्या हृदयास यातना होतील हें त्याला कळत होतें. पण त्याच्या भावना शिखरास पोंचल्या होत्या. साऱ्या जगास तो विसरला होता.

"आणि कळलं ना तुला चंद्रा, ती देमूची श्रीमंती कुठली होती ती ? बापानें एक शेताचा तुकडा ठेवला होता, तो या दिवट्यानें विकला आणि त्या पैशाच्या नादानें तुझ्या बापाला त्यानं मारलं आणि तुला ही अशी बुडवली–तुझ्या लग्नास पांच वर्षें झालीं आणि इतक्या अवधींत एकही लेकरूं तुझ्या घरीं खेळूं नये ? हेंच ना तुझें गृहसौख्य ? " मुरारी सूडाच्या समाधानानें हंसला.

"मुरारी, पुरे झालं बावा तुझं पुराण ! मला असा कां छळतोस ?" चंद्रा केविलवाण्या स्वरानें म्हणाली.—

मुरारी भानावर आला. त्याला वाईट वाटलें. बोलावयास नको होतें तें आपण बोललों याची त्याला जाणीव झाली.

कांहीं क्षण शांततेंत गेले. चंद्राच्या उन्मादकारी प्रकाशांत व चंद्राच्या उन्मादकारी सौंदर्याच्या सान्निध्यांत त्याच्या भावना पुन्हां उचंबळून आल्या. पैलतीर अगदीं जवळ होतें.

"चन्द्रा, कल्पना कर ! या पाण्याच्या धारेवर ही मी होडी अशीच सोडली आणि तुमचा तिघांचा सूड घेण्याकरतां मीं तुला शीलभ्रष्ट केली तर तूं काय करशील ? या कृत्याचा मला कोण जाब विचारील ?"

मुरारीनें भावनावेगानें खरोखरच वल्हें होडींत टाकलें. व्याघ्राची क्रूरता त्याच्या नजरेंत सामावली गेली होती. सावजाशीं निर्दयपणें खेळणाऱ्या हिंस्रपशूची वृत्ति त्याच्यांत अवतरली होती.

"काय ग ? काय करशील ?"

चन्द्रा स्वस्थच होती.

मुरारी खरोखरच पुढें सरकला. चंद्राची त्याच्याकडे पाठ होती. त्यानें तिचे मागून दंड पकडले व तिला आपल्या पुढ्यांत अलगद ओढली, आणि आपल्या दांडगट दंडांत इतकी आंवळली कीं चन्द्राच्या तोंडांतून एक अस्पष्टशी किंकाळीच बाहेर पडली.

—आणि त्यासरशी मुरारीचे हात ढिले पडले. चंद्रा नागिणीसारखी धुसपुसत होती.

" मुरारी ! मेल्या, तुला भाऊ मानून तुझ्या होडीवर आलें, तुझ्यावर विश्वास टाकला–पण तूं इतका–मांग हृदयाचा असशील अशी माझी कल्पना नव्हती. प्रत्यक्ष वहिणीशीं तूं हा अतिप्रसंग केला आहेस—"

" चन्द्रा क्षमा कर—मला क्षमा कर—मीं क्षणभर भावनावश झालों—मी स्वतःला विसरलों–" मुरारी खालच्या मानेनें म्हणाला. त्यानें वल्हें घेतलें व तो वल्हवूं लागला.

" मुरारी, मुरारी, काय केलेंस तूं हें ?" चंद्रा स्फुंदून स्फुंदून रडूं लागली. आणि तें पाहून मुरारीस मेल्याहून मेलें होऊन गेलें. होडींतून उडी घेऊन जीव द्यावा असें त्याला वाटलें.

" चंद्रा क्षमा कर ! या पातकाबद्दल तूं सांगशील तें प्रायश्चित्त घ्यायला मी तयार आहें—"

" तुला प्रायश्चित्त ! नदींत जीव दिलास तरी तुझें पातक धुवून जाणार नाहीं. लक्षांत ठेव, अगदीं मरेपर्यंत लक्षांत ठेव कीं, तूं महापातकी आहेस—"

होडी किनाऱ्यास लागली होती. मुरारीनें उतरून होडी धरली. चंद्रा उतरली, व मुकाट्यानें चालूं लागली. तिनें वळूनसुद्धां मुरारीकडे पाहिलें नाहीं. मुरारीच धांवून तिच्यापाशीं गेला–होडीची दोरी गुंतवून ठेवण्याचें देखील त्याला भान राहिलें नाहीं.

" चंद्रा, चंद्रा, मला क्षमा कर ! माझ्या सबंध आयुष्यांतील हें पहिलेंच व शेवटचें पाप आहे–तूं क्षमा केलीस असें म्हटल्याशिवाय मी तुला जाऊं देणार नाहीं—" त्यानें तिची वाट दोनही हात पसरून अडवली.

" तुझं काळं तोंड जिवंत असेपर्यंत फिरून मला दाखवूं नकोस. चल नीघ ! " चंद्रा तिरस्कारानें म्हणाली.

" चंद्रा माझें तोंड मी तुला पुन्हां कधींही दाखवणार नाहीं; पण त्यापूर्वी एकदांच तुझ्या तोंडून 'क्षमा केली' हे शब्द निघूं देत–चंद्रा, माझ्याविषयीं थोडा सहानुभूतीनें विचार कर ! मी तुझ्या पायां पडतों–तुझा माझा स्नेह संबंध एकदांच आठव. "

मुरारीनें तिच्या पायावर खरोखरच डोकें ठेवलें. चंद्राच्या डोळ्यांतून अश्रु ओघळले, पण मुरारी उठण्याच्या अगोदरच तिनें ते मोठ्या सावधगिरीनें पुसले.

" मुरारी ऊठ ! " चंद्रा म्हणाली. तिचा गळा भरला होता. तिला बोलवत नव्हतें. पूर्वस्मृति तिलाही जाचत होती.

मुरारी उठला. त्यानें चंद्राकडे पाहिलें. तिच्या डबडबलेल्या डोळ्यांतील भाव त्याला कळला नाहीं. आपण वाट अडवून तिला त्रास दिला आणि त्यामुळेंच तिच्या डोळ्यांत पाणी आलें, असाच त्यानें आपला समज करून घेतला. तो बाजूस झाला. चंद्रा मंदगतीनें निघून गेली. क्षणोक्षणीं अदृश्य होत जाणाऱ्या तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे तो आ वासून पहात होता. पुन्हां आपणास ती मूर्ति पहावयास मिळणार नाहीं अशी त्याला प्रेरणा झाली. त्यानें ती उभी असलेल्या जागेवर अश्रूंचा अभिषेक केला.

आणि वाचेनें बोलल्याप्रमाणें जिवंत असेपर्यंत त्यानें चंद्राला तोंड दाखविलें नाहीं. त्याचा पनेळ पाण्याच्या ओघाबरोबर वाहत जाऊन कुणालासा मिळाला, आणि मुरारीचें काय झालें हें कुणालाच कळलें नाहीं. आसपासचे लोक मात्र त्याचा गोड व मोकळा स्वभाव, परोपकारी व कामसू वृत्ति, निर्व्यसनीपणा इत्यादि गोष्टींच्या आठवणी काढून हळहळत असत.

**पहिलें पाप**

नोव्हेंबर १९३५

# असूयेची मजल

आकाशांतील चंद्रसूर्यांत जरी पुष्कळ फरक असला तरी आमच्या रवि-शशींत तो नव्हता. रवीच्या गमनानंतर शशीचें आगमन होतें परंतु तोही न्याय येथें लागू नव्हता. कॉलेजच्या वातावरणांत ते दोघे सख्खे चुलतभाऊ सारख्याच तेजानें बरोबर चमकत होते. दोघांनींही केव्हांच पहिला वर्ग सोडला नाहीं. परीक्षेच्या निकालांतसुद्धां त्यांचीं नांवें अगदीं जवळ जवळ असावयाचीं. मॅचच्या स्कोअरमध्यें तेंच. आणि कुठल्याही चळवळींत अगर चढाओढींत तीच स्थिति.

पण एका गोष्टींत मात्र त्या दोघांत विरोध होता. रविकान्त उघड्या स्वभावाचा व बडबड्या होता. थोडासा तुसडेपणाहि पण त्याच्या अंगीं होताः आपल्या बोलण्यानें अगर कृतीनें कोणाचें हृदय दुखावेल कीं नाहीं याची त्याला विशेष फिकीर नव्हती. परंतु शशिकांत मात्र चंद्राप्रमाणें शांत, स्निग्ध व प्रेमळ अंतःकरणाचा होता. आपल्या अत्यंत सहज घडलेल्या कृतीनें अगर बोललेल्या शब्दांनीं कोणास वाईट वाटेल कीं काय ही जाणीव त्याच्या हृदयांत नेहमीं जागृत असे. कदाचित दुसऱ्याचें मन दुखविण्यास जर त्याची कृति कारण झाली तर त्या दुखविलेल्या व्यक्तीची क्षमा मागून त्याचा गैर-समज दूर केल्याशिवाय त्याला चैन पडत नसे.

एवंच आकाशांत अगणित तारकासमूहांत चंद्रसूर्य दृष्टींत भरतात तसेंच कॉलेजांत हे दोघे चुलतबंधु गुणसमुच्चयानें इतरांच्या नजरेंत भरत. त्यांच्या पेक्षां अभ्यासांत हुशार विद्यार्थ्यांची उणीव कॉलेजांत नव्हती; अगर उत्कृष्ट खेळाडूंची पण तेथें वाण नव्हती. लेखन व वक्तृत्वांत त्यांच्या तोडीचे

पुष्कळ जण होते; परंतु स्वैंपाकांत ज्याप्रमाणें सर्व मीठमसाल्याची गरज असते, एकच जास्त अगर कमी असून चालत नाहीं, तसेंच सर्व गुणांचा योग्य मिलाफ झाला असला म्हणजे त्या व्यक्तीचें विशेष तेज पडतें.

यंदाचें त्यांचें शेवटचें वर्ष होतें. यंदां बी. ए. ची परीक्षा सुखरूपपणें पार पडली म्हणजे जन्मापासून मरणापर्यंत पाठीस लागलेल्या पोटाचा प्रश्न सोडवण्याचा त्यांचा विचार होता, आणि म्हणूनच त्यांचा अभ्यास जोरानें चालू होता.

गोव्यांत जी एकत्र कुटुंबपद्धति प्रचारांत आहे तसल्याच एका कुटुंबांत रविकांत–शशिकांताचा जन्म झाला. घरची स्थिति जरी फारशी समाधान-कारक नव्हती तरी पण त्यांच्या वडिलांनीं मोठ्या कष्टानेंच या दोघांस मुंबईसारख्या खर्चाच्या ठिकाणीं ठेवलें होतें. एरव्हीं सहजासहजीं त्यांस हा खर्च झेंपण्याजोगा नव्हता. परंतु माड होऊन नारळ मिळण्यास हातभर कवाथे पुरून पांच सात वर्षें तरी त्याची काळजीनें जोपासना करावी लागते. हें नित्य व्यवसायांतील भाटकार लोकांचें तत्व त्यांच्या नजरेसमोर असल्या-मुळें हें जरासें शक्तीबाहेरचें काम त्यांनीं अंगावर घेतलें होतें.

चंद्रसूर्याची उत्पत्ति केव्हां कशी झाली, बरोबरच कीं आगेंमागें झाली हें कुणास ठाऊक? पण रविकांत शशिकांताचे जन्म जवळ जवळ एका महिन्यांतच झाले. रविकांत एका महिन्यानें वडील होता.

दोघांहि मुलांचें कोडकौतुक, शिक्षण वगैरे बरोबरीनेंच झालें. जुन्या पद्धतीस अनुसरून शशिकांताचे वडील आपल्या मुलाकडे विशेष लक्ष न देतां रविकांताकडेच जास्त देत, तर रविकांताचे वडील शशिकांताची जास्त काळजी घेत. त्यामुळें त्यांच्या लाडांत अगर शिस्तींत रतिभरही अंतर पडलें नाहीं. श्रीगणेशाच्या धड्यापासून कॉलेजच्या शेवटच्या वर्षापर्यंत–बी. ए. पर्यंत दोघांनीं बरोबरच मजल मारली होती. लहानपणापासून हे दोघे रामलक्ष्मणाची जोडी म्हणून गांवांत प्रसिद्ध होते. रामलक्ष्मणाप्रमाणें या दोघांच्या वयांतही फार थोडें अंतर होतें व बंधुभाव व अकृत्रिम प्रेमपण तसेंच वास करीत होतें.

परंतु शैशवावस्थेंतील हा बंधुभाव, हें अकृत्रिम प्रेम तारुण्याच्या वर्षाकालांत तसेंच कायम रहावयास पाहिजे होतें.

हल्लीं शशीस एक नवा नाद लागूं पहात होता. त्यास वाचनाची मुळचीच आवड आणि या वाचनाबरोबर लेखनाचें व्यसनही लागत चाललें होतें. विख्यात लेखकांचें सुंदर सुंदर लेखन पाहून आपणही कांहींतरी लिहावें असें त्यास वाटूं लागलें. श्रीमंत ऐदी माणसांप्रमाणें आपण नुसतें दुसऱ्याचें लेखन वाचून तृप्त व्हावें हें त्यास पसंत वाटेना. दुसऱ्या व्यक्तीच्या लेखनापासून आपण जो आनंद चाखला तो तितक्या प्रमाणानें जरी नाहीं तरी शक्त्यनुसार आपण फुल ना फुलाची पाकळी म्हणून परत केला पाहिजे असें त्यास वाटूं लागलें.

पाण्याचा ओघ विभागला म्हणजे त्याला पूर्वीसारखा जोर रहात नाहीं. लेखनाचा हा नवा नाद लागल्यापासून शशिकान्तचें अभ्यासाकडचें लक्ष कमी होऊं लागलें, परंतु अभ्यासांत पडलेली ही उणीव दुसऱ्या प्रकारानें भरून निघूं लागली. शशिकान्त लेखक म्हणून ओळखला जाऊं लागला.

रविकान्ताचा अभ्यास मात्र पूर्वीप्रमाणेंच किंबहुना त्याहीपेक्षां उत्तम तऱ्हेनें चालला होता. स्कॉलरशिपचीहि कडेकोट तयारी तो करीत होता.

परीक्षा आतां अगदीं जवळ आली होती. फक्त एका महिन्याचा काय तो अवधि होता. शशिकान्तहि आतां अभ्यासाकडे लक्ष पुरवूं लागला होता. परंतु वर्षानुवर्षें नांगराच्या फाळास पारख्या झालेल्या जमिनींत पावसाच्या दिवसांत तात्पुरती कमाविशी केली म्हणून चांगलें पीक थोडेंच येणार!

शशिकान्त अभ्यासास बसला असतांना रविकान्त तेथें आला.

"शशी! चलतोसना बाहेर?" त्यानें विचारलें,

"नाहीं रे! हें बघ मला हा पॅरिग्राफ आतां वाचून संपवावयाचा आहे. पण तूं कुठं चाललास?"

"जरा पोस्टांत एक पत्र टाकावयाचं आहे, आणि–"

"हो बरी आठवण झाली, तूं पोस्टाचं नांव काढलंस म्हणून; हें बघ, जरा माझं काम कर."

शशिकान्तानें टेबलाच्या ड्रावरमधून एक जाडसा लखोटा काढून रविकान्ताच्या हातीं देत म्हटलें.

" हें जरा रजिस्टर पोस्टानें पाठव बरं."

" कोणालारे बुवा हें ? " रवीनें लखोटा हातांत घेत प्रश्न केला.

" कला मासिकाच्या चढाओढीकरतां मीं पाठवतोंय ही गोष्ट." शशी नवोढा कुमारिकेच्या सहजसुलभ लाजेनें म्हणाला.

"अस्सं का लेखक महाराज !"

रविकान्तच्या या उद्गारांत कौतुकापेक्षां हेटाळणीचाच स्वर जास्त ध्वनित होत होता असेंच शशीस वाटलें.

"अरे पण लखोटा बंद केला नाहींस !"

"अरे इकडे गोंद नाहीं माझ्याजवळ. पोस्टांतच तूं तो डकवून बंद कर म्हणजे झालं."

खिशांत लखोटा घालीत रविकान्त बाहेर पडला.

मनुष्याच्या मनाची ठेवणच अशी एक विचित्र असते कीं त्यास दुसऱ्याच्या कसल्याही वस्तूचा आनंद आपण उपभोगावा असें वाटतें आणि तोही होतां होईतों दुसऱ्याच्या नकळत.

रविकान्तनें आपली इच्छा दर्शवली असती तर शशीनें मोठ्या आनंदानें त्याला आपली गोष्ट वाचण्यास परवानगी दिली असती. परंतु रवीनें तशी परवानगी मागितली नाहीं एवढें खरें. मात्र रस्त्यांत पोंचतांच आतांपर्यंत दाबून ठेवलेली त्याची उत्कंठा दुप्पट जोरानें प्रज्वलित झाली. म्युनिसिपल गार्डनमध्यें एक स्वच्छ बांक पाहून त्यानें तेथें आसन ठोकलें व तो ती वाचूं लागला.

"खरोखर सुंदर उतरली आहे लघुकथा. पहिलें बक्षिस मिळण्यालायक आहे." तो आपल्याशींच पुटपुटला.

आणि कारण नसतांना याच वेळीं त्याच्या मनांत असूयेचा प्रादुर्भाव झाला. " शशीला, जर या गोष्टीस पहिलें बक्षिस मिळालें तर त्याचा दर्जा माझ्यापेक्षां कितीतरी पटीनें वाढेल नाहीं ? "

रविकान्ताच्या हृदयांत पडलेली असूयेची ठिणगी विकारांच्या वाऱ्यानें जास्त जास्त धुमसूं लागली व तो काळाकुट्ट धूर शब्दरूपानें बाहेर पडूं लागला.

त्याला अंतःचक्षूंसमोर शशीकान्तची ती मूर्ति दिसूं लागली. ‘ सारे लोक एक उत्कृष्ट लघुकथालेखक म्हणून त्यास मान देत आहेत. पुढेंमागें साहित्यसंमेलनाचें अध्यक्षस्थान त्यास मिळेल आणि आणि...’

शशिकांतची वैभवपूर्ण कीर्तियुक्त मूर्ति त्यास हिणवतांना दिसूं लागली.

अंतःकरणांत धुमसणारा असूयाग्नि प्रज्वलित झाला, आणि त्यांत प्रेम, बंधुभाव इत्यादि सात्विक मनोविकार जळून खाक झाले.

रविकांत उठला व पोस्टाच्या दिशेनें चालूं लागला. पण त्यापूर्वी त्यानें कोठेंशी खोडाखोड केली, आणि कायसें लिहिलें, तेव्हां कोठें त्याचा जीव थोडा शांत झाला.

तो जेव्हां परत आला तेव्हां शशीनें त्याला विचारलें.

“ केलीस ना रजिस्टर ? ”

“ हो ! ही बघ ना पावती. ”

खिशांतून पावती काढीत त्यानें हे शब्द उच्चारले खरे, पण बोलतांना त्याचा स्वर कातर झाला व चेहरा पण काळवंडला.

परंतु अभ्यासांत गर्क असलेल्या शशीस त्याची दाद नव्हती.

रीतसर परीक्षा आटोपतांच ते घरीं आले. वाटेंत आगगाडींत कामाशिवाय दोघांचें विशेष संभाषण झालें नाहीं. दोघांचेहि चेहरे कष्टी दिसत होते. कारणें मात्र भिन्न होतीं. रवीचे पेपर उत्तम गेले होते, परंतु त्याच्या खिन्नतेचें कारण कांहीं समजण्याजोगें नव्हतें. शशीच्या खिन्नतेचें कारण एक तर त्याचे पेपर चांगले गेले नव्हते; आणि दुसरें—तेंच दुसरें कारण त्याच्या मनास जास्त त्रास देत होतें.

परीक्षेच्या मंडपांत दैवसुयोगानें ते चुलतबंधु अगदीं जवळ जवळ बसले असूनही रवीनें त्याला शक्य असूनसुद्धां बिलकुल मदत केली नाहीं.

शशीला रवीची ही कृतीच जास्त त्रास देत होती. रवीनें—आपल्या प्रेमळ रवीनें आपल्याशीं असें वर्तन कां करावें हें कोडें त्यास उलगडत नव्हतें.

“चांगले गेले आहेत नारे पेपर ? ” शशीच्या वडिलांनीं रवीला प्रश्न केला.

" माझे तर छान गेले आहेत काका ! " रविकान्त विजयी मुद्रेनें म्हणाला.

" आणि तुझे शशी ? "

शशीनें खिन्न मुद्रा करून मान खालीं घातली.

" यंदाच असं काय झाल रे बुवा ? " त्यांनीं प्रश्न केला.

" काका, शशीनें यंदा नीट अभ्यासच केला नाहीं." रविकान्त म्हणाला.

" पण कां रे ? यंदाच नवीन असं काय घडलं ? "

" शशी लेखक झाला आहे. लेखनापुढें अभ्यासाची काय पर्वा !" रविकान्त हेटाळणीच्या स्वरानें म्हणाला.

" अस्सं, आतां उलगडा झाला." काका म्हणाले.

आणखी ते कांहींच बोलले नाहींत. पण त्या शब्दांनीं शशीच्या हृदयास अनंत यातना झाल्या. तो रडकुंडीस आला व आपलें रडें दिसूं नये म्हणून तेथून झटकला.

पण जातां जातां त्याच्या कानावर ओझरते शब्द पडले. काका बोलत होते.

" यंदा याची पास होण्याची आशा नाहीं तर ? वर्ष फुकट घालविलं नाहीं म्हणजे मिळविली. "

शेवटीं परीक्षेचा रिझल्ट लागला. परीक्षेपासून रिझल्टपर्यंतचा कालावधि विद्यार्थ्यांस किती असह्य होतो याची कल्पना विद्यार्थीदशेंतून गेलेल्या प्रत्येकास असतेच. रविशशीसही तो तसाच वाटला.

आजच मुंबईहून तार आली होती. आणि तारेंत एवढाच मजकूर होता.

" रविकान्त फर्स्टक्लास पास. "

शशीचें नांवही त्या तारेंत नव्हतें. परंतु शशीला अजून आशा वाटत होती. आपण फर्स्टक्लास पास न झालों तरी निदान तिसऱ्या वर्गांत तरी पास होऊं.

परंतु दुसऱ्याच दिवशीं शशीचा हाही समज चुकीचा ठरला. पास झालेल्या मुलांच्या यादींत त्याचें नांव नव्हतें.

निराश झालेल्या शशीस अजून एक अंधुक आशा होती. निराशेच्या भयाण अंधेरांत आशेचा एकच काजवा किंचित् लुकलुकत होता.

परीक्षा तर गेलीच. निदान लघुकथांच्या चढाओढींत जर आपणास पहिलें बक्षिस मिळेल तर...? निदान अयशस्वितेचा कलंक धुवून तरी निघेल.

आणखी दोन दिवसांनीं "कला" मासिकाचा अंक आला. शशिकांतच्या लघुकथेस पहिलें बक्षिस मिळालें होतें. पण—?

त्याची मालकी मात्र दुसऱ्याकडे गेली होती.

याचा अर्थ एवढाच कीं शशिकान्तच्या लघुकथेवर लेखकाच्या नांवाच्या जागीं "शशिकान्त मधुसूदन वोरकर" याऐवजीं पुढील नांव छापलें होतें.

"धोंडू काळूराम शेवडे."

शशी अगदीं आश्चर्यमूढ झाला—आपल्या गोष्टीवर फालतू इसमाचें नांव कसें छापलें गेलें? त्याला आश्चर्यातिरेकानें वेड लागावयाची पाळी आली. धोंडू काळूराम ही व्यक्ति त्याच्या पूर्ण परिचयाची होती. त्याला धड मराठी वाचतां सुद्धां येत नव्हतें. मग गोष्ट लिहिण्याचें तर दूरच.

शशीनें आपल्या आठवणीस शीण दिला. त्यानें गोष्ट कोणासच वाचावयास दिली नव्हती मग त्यावर धोंडूचें नांव कसें आलें? फक्त रविकांतकडे पोष्टांत टाकण्यास दिली होती. मग—?

'आपला रवी इतक्या हीन अंतःकरणाचा का आहे?' छे! छे! त्याला तो विचार सहन झाला नाहीं.

तो अंक घेऊन शशी वेड्यासारखा उभा होता. इतक्यांत रविकांत आला.

"रवी, पाहिलंस का हें?" गोष्टीवर बोट ठेवीत शशीनें विचारलें.

"ऑं? म्हणजे धोंड्यास का बक्षिस मिळालं?" आश्चर्यातिरेकाचा आव आणून रविकांत म्हणाला. "आणि तूं पाठवली होतीस तिचं काय झालं?

शशी केंविलवाण्या नजरेनें त्यांच्याकडे रोखून पहात होता. त्याच्या डोळ्यांतून घळघळ अश्रू वहात होते. आणि—

रविकांताचें तोंड त्या अश्रूंनीं पार धुवून गेल्याप्रमाणें क्षणोक्षणीं जास्त कळाहीन व निष्प्रभ दिसत होतें—

**असूयेची मजल**

ऑक्टोबर १९३४

# पाप आणि पुण्य

विसुबाबांचें नांव साऱ्या गोमंतकांत अगदीं आबालवृद्धांच्या तोंडीं खेळत होतें. त्यांनीं केलेलीं परोपकारी कृत्यें त्यांचें नांव अजरामर करण्यास समर्थ होतीं.

पण विसुबाब पापी कीं पुण्यवान ? या प्रश्नाशीं आलें कीं, माझें मन घोटाळ्यांत पडतें. एक वेळ असें वाटतें कीं, ते पुण्यवान गृहस्थ होऊन गेले; पण जग—आणि त्यांतल्या त्यांत कुत्सित जग—काय म्हणतें याकडे लक्ष दिल्यास त्याच्या इतका पापी मनुष्य दुनियेंत कोणी नाहीं असें म्हणावें लागतें.

त्याचा इतिहास असा होता.

विसुबाब पांच वर्षांपूर्वीं निवर्तले. गृहस्थ अगदीं पाऊणशें वर्षें जगला. प्रकृतीनें अगदीं मरेपर्यंत चांगला व धडधाकट होता, आणि मरतांनासुद्धां अगदीं शांत चित्तानें एखाद्या साधकाप्रमाणें हंसत त्यानें प्राण सोडला. विसुबाबांचा मजवर फार लोभ होता. दहनाकरितां आम्ही जेव्हां स्मशानांत गेलों तेव्हां त्यांचें तें हंसतमुख पाहून हें विसुबाबांचें प्रेत आहे कीं ते जिवंत आहेत याची भ्रांति पडत होती.

पातकी मनुष्य पश्चात्तापाच्या इंगळ्या डसत असतांना आणि मरतांनासुद्धां इतका हंसतमुख असूं शकेल का ?

दहनाकरितां आलेले एक दोन हलक्या जिभेचे टीकाखोर म्हणाले सुद्धां— " कायहो हा वेरड ! जन्मभर पातकें करून मरतांनासुद्धां हंसत हंसत मेला ! "

विसुबाब मूळचा गरीब. मी त्याला माझ्या वालपणापासून ओळखतों. माझे वडील सांगत कीं, बालपणीं कुळवाड्यांच्या पोरांबरोबर गुरें वळविण्यांत व उनाडक्या करण्यांत कांहीं वर्षे घालविलेला विशा नशीबाच्या जोरावर एवढ्या महत्पदास चढला होता.

विसुबाबांचें शिक्षण अगदीं बेताचें—व्यवहारापुरतें होतें. पोर्तुगीज ट—फ करतां येत होतें तेवढेंच. वाचनाचा नाद त्यांस नव्हता; परंतु बहुश्रुतपणा त्यांच्या अंगीं भरपूर होता.

पुरुषाचें नशीब म्हणजे वळिवाचा पाऊस ! सुभाषितकारांनीं " देवो न जानाति कुतो मनुष्यः " असा शेरा नशिबाच्या बाबतींत दिला आहे तें खोटें नाहीं.

वाऱ्यानें पाचोळा उडून जावा व त्याखालीं लपविलेलें डबोलें अचानक सांपडावें तसें विसुबाबांचें झालें. वाऱ्यानें पाचोळा उडून जरी त्यांना डबोलें सांपडलें नाहीं तरी वाराच एका अर्थी त्यांचें भाग्य उदयास आणण्यास कारणीभूत झाला.

एक दिवस ते कुठ्ठाळच्या तारीनें मडगांवाहून परत येत होते. त्यावेळीं मडगांव शहर आजच्या इतकें भरभराटीस आलेलें नव्हतें. आगशीच्या जवळ तारीची होडी पोंचली. कुठूनशी एक वाऱ्याची " मोळी " आली कुणास ठाऊक; पण होडी जरा एकाच बाजूस कलंडली. होडींतील मंडळी घावरून या बाजूची त्या बाजूस झाली व एकाच बाजूस जास्त वजन झाल्यामुळें होडी लवंडली व तिच्यांतील उतारू पाण्यांत पडले.

आणि नेमकें याच वेळीं विसुबाबांची भाग्यरेषा त्या अघनाशिनी नदीच्या पृष्ठभागावर उदयास पावली !

तार बुडतांच जो तो आपापला जीव वांचविण्याची धडपड करूं लागला. विसुबाब बालपणांत कुळवाड्यांच्या पोरांबरोबर उनाडक्या करतांना पोहवयास शिकले होते. सर्व पोरांत त्या वेळीं विशाचा पहिला नंबर असे. ही पोहण्याची कला या वेळीं त्यांच्या उपयोगी पडली. चार हात मारून

त्यांनीं किनारा गांठला व ते कपडे पिळित असतांना त्यांची नजर समोर गेली. कोण पोहून येत होते तर कोणी कायमची जलसमाधि घेऊन अघ-नाशिनीचा तळ गांठला होता. होडी बुडालेल्या ठिकाणीं मात्र एक व्यक्ति अजून गटंगळ्या खात होती. विसुबावास तिची दया आली. ते पुनः पाण्यांत उतरले व अल्पावधींत त्यांनीं बुडणाऱ्या इसमास हात दिला व हळुहळू त्याचा भार आपल्यावर घेऊन पोहत पोहत त्यांनीं किनारा गांठला.

बुडणारा इसम एक बडा युरोपियन अधिकारी 'होता. किनाऱ्यास पाय लागतांच विसुबावांचे त्यानें अगदीं मनःपूर्वक आभार मानले. विसुबावांस मोडकेंतोडकें पोर्तुगीज येत होतें व त्या अधिकाऱ्यास पण अर्धेंमुर्धें कोंकणी अवगत होतें. आणि यामुळें दोघांसही एकमेकांचें संभाषण साधरणपणें कळलें म्हणावयास हरकत नाहीं.

जातांना त्यानें विसुबावांस आपली घड्याळाची मूल्यवान सांखळी नजर केली व आपलें नांव व हुद्दा सांगून पणजीस येतील तेव्हां भेटण्यास बोलावलें.

विसुबाव एक दिवस पणजीच्या बाजारांत आंबे विकण्याकरितां म्हणून गेले होते. पाटीवाल्या बायांस ते त्यांनीं विकले व ते परत फिरले. त्यांना वाटलें आपण जाऊन आपल्या त्या नवपरिचित अधिकाऱ्यास भेटावें. पण मुद्दाम भेटण्यास गेलों तर बोलणार काय त्यांच्याशीं? व तशांत गेलोंच तर आपल्यास काय लाभ होणार? आपणांस कदाचित् ते नोकरी देऊं शकतील; पण ती करण्याचें ज्ञान, पोर्तुगीज शिक्षण आपणांस कुठें आहे? छे नकोच ती!

याच विचारांत ते चालले असतांना मागून येणाऱ्या घोड्याच्या गाडीनें घंटा वाजवून त्यांना इषारा दिला. रस्त्याच्या एका बाजूस सरत त्यांनीं वळून पाहिलें. त्या गाडींत त्यांचा तो परिचित युरोपियन अधिकारी होता.

दोघांची दृष्टादृष्ट झाली. तो युरोपियन अधिकारी गाडी थांबण्यापूर्वींच जवळजवळ उडी टाकून उतरला व विसुबावांच्या खांद्यांवर आपले हात ठेवीत म्हणाला—

" सिंजोर विसुबाव ! ओळख विसरलांत वाटतं ! "

अत्यंत आग्रहानें त्यानें विसुबावांस आपल्या उजव्या बाजूस बसविलें व गाडी चालू झाली.

पांच मिनिटांत गाडी त्यांच्या सुंदर व भव्य बंगल्याच्या पोर्चमध्यें येऊन उभी राहिली. आगतस्वागत मोठ्या प्रेमानें केल्यावर साहेबांनीं आपल्या पत्नीस पोर्तुगीजांत कांहींसें सांगितलें. त्याबरोबर साहेबाची पत्नी अगदीं विसुबावांसमोर आली व तिनें त्यांच्याशीं हस्तांदोलन करीत कोंकणींत म्हटलें,

" सिंजोर कामत, तुमचे आमच्यावर अनंत उपकार आहेत ! तुम्ही माझं सौभाग्य राखलं आहे. तुमचं कोणतंही काम असल्यास मला सांगा, त्या येशू ख्रिस्ताच्या दयेनं आमच्या हातांत सत्ता आहे. तुमचं कोणतंही काम आम्ही करूं शकूं. "

विसुबाव नम्रपणानें म्हणाले, " सिंजोर, तुमची कृपा आमच्यावर असली म्हणजे झालं. आणखी आम्हांस कांहीं नको. आमची स्थिति तुमच्या लक्षांत असली म्हणजे आमच्यासारख्या गरिबांचं तुम्ही कसंही हीत कराल".

विसुबावांनीं त्यांची खुशामत केली.

साहेब आपल्या पत्नीशीं अस्सल पोर्तुगीजांत कांहीं बरेंचसें बोलले. विसुबावांना त्यांतील कांहींच उमगलें नाहीं.

साहेबांची पत्नी युरेशियन होती. तिला बरेंच कोंकणी येत होतें. तिनें दुभाष्याचें काम पत्करलें. साहेबाचें बोलणें ती विसुबावांना कोंकणींत सांगूं लागली.

" हें पहा सिंजोर कामत, तुम्ही माझ्यावर जे अनंत उपकार केले आहेत त्यांची अल्पशी फेड करण्याची सुसंधि मला देवानं आणून दिली आहे. " जरा वेळ थांवून ते म्हणाले, " कामत, माझ्या हातीं एक कंत्राट आहे, तुम्हांला पाहिजे असेल तर तें मी जमवून देईन. हें कंत्राट फार किफायतशीर होईल असा माझा अंदाज आहे; कारण वशिल्याच्या पत्रांचा माझ्याजवळ नुसता ढीग पडला आहे. "

राजानें प्रसन्न होऊन कोषागारांतलें पाहिजे तितकें द्रव्य नेण्यास सांगावें व आपणाजवळ तें बांधून नेण्यास नेसत्या लंगोटीशिवाय काहीं असूं

नये, म्हणजे जें कांहीं वाटेल तें या वेळीं विसुबावांस वाटलें. निष्कांचन माणूस कंत्राट कसलें घेणार बोडक्याचें? तरी पण आशा माणसांस कुठं सोडते आहे! विसुबावांनीं भीत भीत विचारलें,

" कसलं कंत्राट साहेब? "

" सरकारी युरोपियन लष्करास जेवणखाण पुरवायचं. जेवण म्हणून विशेष नाहीं. तांदूळ, मांस, दारू व पान आणि किरकोळ काय पाहिजे असेल तें. तें सगळं तुम्हांस कंत्राटचीं कलमें वाचतांच कळेल आणि याबद्दल सरकारकडून पंचवीस हजार रुपये वार्षिक मिळण्याची व्यवस्था मी करतों." साहेब म्हणाले.

विसुबाब जरा दचकले.

त्यांना दचकण्यास दुहेरी कारण होतें–एक म्हणजे आपल्यासारखा गरीब माणूस हें एवढें जोखमीचें व पैशाचें काम कसें करूं शकणार आणि दुसरें म्हणजे, आपण हिंदु असून लष्करास मांस–आणि तेंही गोमांसच असणार तें–कसें पुरवायचें! ती गोहत्या आपल्या मस्तकीं पर्यायानें का होईना नाहीं का बसणार? विसुबाब दिङ्मूढ झाले. धरलें तर चावतें आणि सोडलें तर पळतें, अशा परिस्थितींत ते येऊन पडले.

शेवटीं साहेबच पत्नीमुखानें परत बोलले,

" कामत, तुम्हीं विचारांत पडूं नका. तुम्हांस जर कोणती अडचण असेल तर ती मला सांगा. शक्य झाल्यास मीं निवारण्याचा प्रयत्न करीन. या कंत्राटांत मासिक निदान चारपांचशें रुपये तुम्हांस नफा होईल, म्हणूनच मी तुम्हांस आग्रह करतों. "

" साहेब! " विसुबाब जरा घुटमळले.

पण शेवटीं त्यांनीं साहेबांना आपले विचार सांगून टाकलेच.

" कामत! किती वेडी तुमची कल्पना! कल्पना करा कीं, तुम्ही हें कंत्राट नेलं नाहीं तर आणखी पन्नासजण ' मला द्या, मला द्या, ' म्हणत येतील आणि त्यांपैकीं एखाद्यास मी तें देईन. या कंत्राटावर तो गबर होईल, लष्करास मांस मिळेल, सगळं कांहीं सुरळीत होईल. तुम्ही कंत्राट नेलं नाहीं म्हणून गाई मरावयाच्या बंद होतील का? नाहीं ना? झालं तर मग! चार पैसे तुम्हाला मिळाले तर तुमचीं पोरंबाळं सुखी होतील.

तुमच्यासारख्या कुटुंबवत्सल गृहस्थास पैसा मिळाला तर तो सत्कार्यीं पडेल म्हणून म्हणतों. बाकी भांडवलाविषयीं तुम्ही चिंता करूं नका. एक तृतीयांश रक्कम तुम्हास आगाऊ मिळेल अशी मी खास व्यवस्था करतों. ''

विसुबाव अगदीं विमूढ स्थितींत स्तब्ध उभे होते. साहेबाचा युक्तिवाद त्यांना पटत होता; पण त्यांचा निर्णय होईना. एखाद्या वस्तूवर दोन परस्परविरोधी समान आकर्षणें असलीं कीं, ती वस्तू अगदीं त्याच जागीं रहाते असा पदार्थविज्ञानशास्त्राचा एक सिद्धांत आहे. विसुबावांस एका बाजूस पैशाचा मोह तर दुसऱ्या बाजूस मनावर वर्षांनुवर्षे झालेले हिंदु संस्कार आड येत होते.

" सिंजोर कामत, मीं एक गोष्ट विचारतों तुम्हांला. तुम्ही स्वतः कांहीं गाई मारण्यास जात नाहीं. तुम्ही दुसऱ्या एखाद्यास मांसापुरता स्पेशल करार करा कीं झालं काम ! '' साहेब बोलले.

साहेब, याचं उत्तर मी उद्यां सांगतों. मला जरा विचार करण्यास थोडी फुरसत द्या. ''

विसुबाव साहेबाचा निरोप घेऊन घरीं आले.

तो दिवस त्यांनीं विचारांत घालविला. आणि शेवटीं त्यांचा निश्चय झाला. त्यांना वाटलें, खरंच, साहेब म्हणतात तें कांहीं खोटं नाहीं. हें कंत्राट जर मीं घेतलें नाहीं तर दुसरे पन्नासजण पुढें येतील, गोवध व्हावयाचा तो होईल, लष्करास मांस मिळावयाचें तें मिळेल, सगळें कांहीं होईल; पण माझ्या गरिबाच्या घरीं चालून आलेली—नव्हे साहेबांनीं वाट दाखवून आणलेली लक्ष्मी मात्र मला पारखी होईल. पण दुसरा कोणी तिस्मारखा तें चैनींत उधळील आणि—

शेवटीं त्यांचा निश्चय झाला व ते साहेबांस जाऊन भेटले.

हें कंत्राट विसुबाबांकडे तो साहेब असेपर्यंत पांच सात वर्षे राहिलें आणि या अवकाशांत त्यांनीं जवळ जवळ पन्नास हजार रुपये मिळविले.

पैशाकडे पैसा जातो तें कांहीं खोटें नाहीं. माझा एक श्रीमंत मित्र म्हणतो कीं, एकदां व्यापाऱ्याकडे दहा हजार रुपये भांडवल जमण्यास काय तो उशीर लागतो, मग तो पैसाच आणखी पैसा आपोआप उत्पन्न करतो.

विसुवाबांचें तसेंच झालें. सात वर्षांनीं त्यांचें कंत्राट संपलें; परंतु त्यांच्या-जवळ जमलेल्या भांडवलावर त्यांनीं तऱ्हतऱ्हेचीं कंत्राटें घेण्यास सुरवात केली. निरनिराळ्या धंद्यांत भांडवल गुंतविलें व अल्पावधींत ते लक्षाधीश बनले.

संतति व संपत्ति त्यांना पुष्कळ लाभली.

त्यांनीं मिळविलेल्या अफाट संपत्तींतून त्यांनीं दानधर्मही बराच केला. त्यांनीं अनेक देवळांचे जीर्णोद्धार केले. लोकोपयोगी सार्वजनिक संस्थांस उदार हाताने त्यांनीं मदत केली. अनाथांकरितां अनाथालयें, अपंगांकरितां रुग्णालयें, विद्यार्थ्यांकरितां शिष्यवृत्त्या ठेवल्या, व आपलें शेष आयुष्य पूर्ण सुखासमाधानानें व्यतीत करून शेवटीं हंसत हंसत आनंदानें प्राण सोडला.

सारें दुतोंडी दांभिक जग मात्र,—प्रथम त्यानें पापानें पैसा मिळविला व त्याचीच ही वाढ, असें म्हणे व एखादे वेळीं विसुवाबांकडून त्याचें काम झालें नाहीं, त्याला मदत मिळाली नाहीं कीं त्यांच्यावर टीकास्त्र सोडीत असे.

आणि मला मात्र याचा कांहींच उलगडा होत नसे. भगवान श्रीकृष्णांनीं पुजलेल्या परम पवित्र गोमातेच्या मांसाच्या चिखलांतच विसुवावांच्या वैभवशिखराचे दगड पुरले आहेत, असें माझें कट्टर हिंदु मन म्हणे तर लगेच दुसरें मन म्हणे,

मग ? त्यांत काय वाईट झालें ! विसुवावांनीं हें कंत्राट घेतलें नसतें तर एखादा ख्रिश्चन अगर मुसलमान या कंत्राटावर लक्षाधीश झाला असता व चैनींत सारा पैसा उधळीत राहिला असता आणि मग त्यापासून आमच्या समाजाचें कोणतें हित होणार होतें ? विसुवावांनीं केलेलीं सत्कृत्यें व त्यांनीं त्यायोगें केलेली समाजसेवा पाहिली म्हणजे मला वाटे—विसुवाब खरोखरच पुण्यवान मनुष्य होऊन गेले.

**पाप आणि पुण्य**

मार्च १९३४

श्री. रघुनाथ ज. सामन्त, बी. ए.

यांचीं लौकरच प्रसिद्ध होणारीं

तीन पुस्तकें.

## काव्य-तरंग

मराठी उत्कृष्ट कवितांचा नोटेशनसह

संपादिलेला संग्रह

मार्च १९३६ मध्यें प्रसिद्ध होईल

## उपकारी माणसें

( स्वतंत्र सामाजिक कादंबरी )

जून १९३६ अखेर

प्रसिद्ध होईल.

## तारांगण

( चिमुकल्या चांदण्यांचा संग्रह )

श्री. सां. घ. कंटक

यांच्या कौटुंबिक कथांचा संग्रह

## कणसाचे दाणे

श्री. भा. वि. वरेरकरांच्या विस्तृत

प्रस्तावनेसह एप्रिल १९३६

मध्यें प्रसिद्ध होईल.

गोमन्तकीय कथालेखक

व्यं. अ. पै रायकर

यांच्या विहंगम, यशवंत, वगैरे

मासिकांत प्रकाशित झालेल्या व

अप्रकाशित निवडक कथांचा

पहिलाच संग्रह

## कारंजाचे तुषार

लवकरच प्रसिद्ध होईल.

मध्यप्रांत सरकारनें, शाळा लायब्ऱ्यांस

मंजूर केलेला काव्यसंग्रह

## ❀ नन्दादीप ❀

गोमन्तकीय कवि

दामोदर अच्युत कारे

यांच्या निवडक, रसपूर्ण भावगीतांचा

संग्रह. प्रो. वा. म. जोशी यांची

प्रस्तावना. उंची अँटिक कागद,


मनोहर छपाई. किंमत १। रु.

# Visso Trading Company


**Science & Laboratory apparatus**


**BOMBAY 4.**

## शाळा व कॉलेजना लागणारें




## शास्त्रीय सामान.







**उच्च मा॑ल**



**माफक दर**







तसेंच डॉक्टर, फारमसी वगैरेना लागणारें सामान

Thermometers, Precision Balances

यांचा भरपूर स्टॉक असतो.

पत्ताः—

**४६२, सँडहर्स्ट रोड, गिरगांव, मुंबई.**

Telephone No. **42205**

## हें त्रैराशिक सोडवायला विलायती पंडित नको !

आपलीं बालकें सशक्त, सुदृढ व आनंदी असावींत अशी प्रत्येक कुटुंब-वत्सल गृहस्थाची इच्छा असते. तसेंच दारीं आलेल्या पाहुण्याचें उत्तम रीतीनें स्वागत व्हावें, असेंही तुम्हांस वाटतें. परंतु ऐनवेळीं घरांत तयार पदार्थ नसल्यानें तुमची धांदल उडते. मुंबईहून गांवाला तुमच्या मातृ-भूमीस गेलां म्हणजे शेजाऱ्यांस व मित्रमंडळीस 'प्रेमाची भेट' म्हणून काय न्यावें असा तुम्हांस पेंच पडतो. वरील सर्व वेळीं तुम्हांस समाधान देण्यास आम्ही आपल्या सेवेला सदैव तयार आहों.

**आमच्याकडे मिळणारीं खास बिस्किटें—**

| | | |
|---|---|---|
| **मनोहर** | **मिल्क** | **जिंजिर** |
| **नवजीवन** | **व्हॅनिला** | **लेमन** |
| **मक्रम** | **फॅमिली** | **मस्का बटर** |
| **सुरती बटर** | **केक्स** | **इ. इ.** |

### गोमन्तक हिंदु बेकरी,

**गिरगांव, गायवाडी, मुंबई नं. ४**

---

## डी. जी. हलनकर आणि कंपनी

**टेलर्स आणि आऊटफीटर्स**

' अमीन नर्सरी ' जवळ,

विठ्ठलभाई पटेल रोड,

**गिरगांव मुंबई.**

---

## पणजींत मुंबई

मुंबईचा सुप्रसिद्ध इराणी चहा, केक्स, पुडींग, खारीं बिस्किटें व अस्सल तुपाचे खाद्यपदार्थ मिळण्याचें गोव्यांतलें एकच ठिकाण

म्हणजे

## काफे सेंत्राल

( हिंदु बेकरी )

**पणजी–नवीन गोवें**

अद्यापूर्वी

# आजचा संसार

गोड व लुसलुसीत करण्याकरतां

## संसार–साहित्य–सदन

२६४ चर्निरस्ता, गिरगांव मुम्बअी.

येथून संसारास लागणारें अेकूण अेक साहित्य विकत घ्या.

चालक—

**आ. स. देसाअी आणि बन्धु.**

---

गिरगांवांतील अत्यंत लोकप्रिय आणि फारच माफक भावानें माल विकणारी एकच बेकरी

## भारत हिंदु बेकरी

**कांदेवाडी, मुंबई नं. ४**

सर्व तऱ्हेचीं बीस्किटे व केक्स, घाऊक व किरकोळ आमच्याकडे मिळतात

---

मुंबईतील कमींत कमी बाजारभावांत सर्व प्रकारचीं देशी–विदेशी औषधें पुरविणारे

**ड्रगिस्ट व केमिस्ट**

बाहेरगांवच्या आर्डरी वक्तशीर व काळजीपूर्वक पोंचविण्याची व्यवस्था होते.

## एस्. रॉय आणि कंपनी

**ठाकूरद्वार मुंबई नं. २**

## श्री. जयवंतराव सरदेसाई यांच्या

# सुखाचे क्षण

### या पहिल्या कथासंग्रहाविषयीं लोकमत

**केसरी**—श्रीयुत सरदेसाई यांच्या ठिकाणीं वर्णन करण्याची हातोटी व सूक्ष्मावलोकनशक्ति विलक्षण आहे हें दिसून येतें. 'रावबांचं ऋण' या कथेंतील रावबा सावकाराच्या निष्ठुरता, थापेबाजी वगैरे गुणांनीं त्यानें शेक्सपियरच्या 'मर्चंट ऑफ व्हेनिस' मधल्या शायलॉकलाही मागें टाकलें आहे.

**लोकशक्ति**—लघुकथांची भाषा साधेपणाच्या सौंदर्यामुळें उठून दिसते. लघुकथासंग्रह वाचण्यांत गेलेल्या 'क्षणां'कडे पाहिलें असतां संग्रहाचें नांव सार्थ वाटतें.

**नवाकाळ**—प्रादेशिक वाङ्मय म्हणून या संग्रहाचें महत्त्व आहे. गोमन्तकांतील वातावरण या कथांत सर्वत्र आढळतें....वाचकांचें कुतुहल वाढत राहील व त्यांची समाधानकारक परिणति होईल अशीच कथानकाची मांडणी आहे.

**विविधवृत्त**—तरुण वाङ्मयसेवकांत 'सुखाचे क्षण' या कथासंग्रहाचे लेखक श्री. जयवन्तराव सरदेसाई हे प्रसिद्ध आहेत. रा. जयवन्तराव सरदेसाई यांची भाषा अगदीं साधी व सहजमधुर आहे. तींत कोठेंही कृत्रिमता नाहीं....श्री. सरदेसाई यांच्या अंगीं कथालेखनास लागणारे गुण उत्कटत्वानें वसत असल्याची साक्ष "सुखाचे क्षण" वाचून कोणाही वाचकास सहज पटण्यासारखी आहे.

**प्रतिभा**—रावबाचं ऋण व सेवकांचा संसार यांतील स्वभावरेखन अचूक व परिणामकारी आहे.

**सहविचार** (बडोदें)—"सुखाचे क्षण" या संग्रहांतील सर्वच कथा निरनिराळ्या दृष्टीनें रमणीय आहेत. कथांची भाषा सहजसुन्दर व क्वचित

अलंकारीक आहे. प्रसंगाचें थोडक्यांत पण चित्तवेधक वर्णन करण्याची त्यांची हातोटी अपूर्व आहे.

**विहंगम** ( नागपूर )—या संग्रहांतील बहुतेक सर्वच कथा अगदीं घर-गुती वातावरणांत प्रत्यहीं घडणाऱ्या लहानसहान प्रसंगांवर आधारलेल्या असल्यामुळें प्रत्येक वांचकाला त्यांत जिव्हाळा प्रतीत होतो....एकंदरींत हा कथासंग्रह उत्कृष्ट झालेला असून वैशिष्टयपूर्णही आहे.

**प्रभात** ( गोमन्तक )—त्यांच्या कथा ठराविक सांच्यांतून वाहेर पड-णाऱ्या नाहींत व त्यामुळें 'सुखाचे क्षण' वाचतांना इंद्रधनुष्य पहात असल्याचा किंवा दोनचार रागाचे सूर एकाच पदांत मिश्र करून म्हणणाऱ्या गवयाचें गाणें ऐकत असल्याचा वाचकाला अनुभव येतो.

**भा. वि. वरेरकर**—गोमन्तकाच्या काव्यभूमींतील जीवात्म्याचें अंतरंग प्रस्तुत लघुकथांइतक्या सहृदयतेनें आणि वास्तवतेनें इतर कोणत्याही लेखकानें यापूर्वी चित्रित केलें नाहीं असें म्हणण्यास मला यत्किंचितही संकोच वाटत नाहीं.

**वि. स. खांडेकर**—श्री. जयवन्तराव सरदेसाई यांच्या ठिकाणीं कथा-लेखनाची विकास पावणारी शक्ति आहे हें सहज दिसून येतें. यशस्वी कथालेखक म्हणून ते महाराष्ट्रास परिचित होतील यांत संदेह नाहीं.

**प्रो. वा. म. जोशी**—'सुखाचे क्षण' वाचून क्षणभरच नव्हे तर बराच काळ सुख झालें. कथासंग्रह सुन्दर व वाचनीय आहे.

**लोकशिक्षण**—त्यांतून शेवटल्या तीन गोष्टींत–हृदयाचें असमाधान, खुनी, रावबांचं ऋण,–चित्रित केलेले गोमन्तकीय जीवनाचे पैलू नमुनेदार असून, या कथा लघुकथा या दृष्टीनेंही वैशिष्ट्ययुक्त आहेत.

**गोमन्तक** ( मुंबई )—श्री. जयवंतरावांच्या कथांत जिव्हाळा बराच आढळतो. कित्येक सुंदर कल्पना मधून मधून विखुरलेल्या आहेत. त्यांनीं भाषेवर बरेच श्रम घेतले आहेत.

१३८८

३४/-